# माणूस

## चित्र, वार्ता पुस्तक

१ ऑगस्ट १९७३

१ रुपया

एका खुनाची कथा
सांगताहेत ॲड.
माधव कानिटकर



श्याम जोशी

भिवा सरांनी जे सांगितले होते ते त्याच्या शब्दात सांगू लागला. त्याची ग्रहणशक्ती बघून सर थक्क झाले. तो अडखळत नव्हता. चुकत नव्हता. त्याला मध्येच थांबवून सरांनी विचारले,

'तू पाठ करून आलास?'

'नाही.'

'इकडे ये. हा खडू घे....फळचावर काढून दाखव....'

'सर' पुढच्या बाकावर काही हात वर झाले. तसे मागच्या बाकावरीलही अनेक हात वर झाले. अनेक आवाज उठले, अनेक चेहरे भयभीत झाले. चिंताग्रस्त झाले. हे पाहून सर अवाक् झाले. त्यानी एका मुलाला विचारले, 'तू हात वर का केलास?'

'त्याला थांबवा. त्याला थाबवा.' अनेक भयभीत आवाज उठले.

'का? का? त्याची हुशारी सहन होत नाही?' सरांनी विचारले.

'नाही. नाही. सर तो महार आहे.' अनेक आवाज.

'महार? आंबेडकर, होय तू महार आहेस!'

'होय. महार म्हणजे काय सर....?

सरांना काय उत्तर द्यावे हे कळेचना. क्षणभरच थाबून सर म्हणाले........

'आंबेडकर....पुढे या....फळचावर काढून दाखवा.'

'सरांचा' रुद्रावतार पाहून मुले घाबरून गेली. तरी एक मुलगा उभा राहिला.

'माझं फराळाचं फळचामागे आहे. ते घेण्याची परवानगी द्या.'

'घे.' सर वैतागून म्हणाले. अशी सर्व मुले पटापट उठू लागली. बाके लोटून, रेटारेटी करीत फराळाचे डबे घेवू लागली. बाकावर येवून बसताना बाकाच्या टोकापासून दूर सरकून बसू लागली. सर्वच धास्तावले, अस्वस्थ झाले होते.

त्यांची ती भित्री धडपड, त्यांचा तो दुर्बळ भ्याड रागसंताप, त्याचे स्पर्श होवू नये म्हणून सरकून बसणे, भिवाच्या आत काहीतरी जळत होते. वेदना देत होते. रडचासारखे अंत.करणभर पसरत होते. चिड येत होती. वैताग येत होता. उदास उदास वाटत होते. मारामारी करावी असे वाटत होते. गोष्टीतल्या राक्षसासारखे डोंगरायेवढे व्हावेसे वाटत होते.

'या...ससे एकमेकाला बिलगून बसलेत. या. वाघ आहात. वाघासारखे या....' सर म्हणाले.

उदास व्याकुळ झालेला भिवा पुढे येऊ लागला. बाकाचा आधार घेण्यासाठी हात उतावीळ होत होते. पण हात आधारासाठीही बाकाला टेकता येत नव्हते. जखडल्यासारखे, बांधल्यासारखे वाटत होते. तो अवघडल्या अंगाने हळूहळू पुढे आला. बाकाजवळ गेला. खडू हातात घेवून त्याने वर्गाकडे तोड केले. सर्व मुलांकडे पाहिले. आणि त्याच्या व्याकूळ अत.करणातून गहीवर घेऊन शब्द बाहेर पडले...

'नाऊ, लिसन मी...लिटल बॉय....'


बाबूराव बागूल यांच्या लेखणीतून उतरलेल्या

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कथा

माणूस चित्र वार्ता पुस्तक । १५ ऑगस्ट अंकात

# माणूस चित्र वार्ता पुस्तक

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहसंपादक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

| दिनांक | किंमत | अंक |
|---|---|---|
| १ ऑगस्ट १९७३ | एक रुपया | दुसरा |

महाराष्ट्रात घरगुती नावे (हाऊसहोल्ड वर्ड्स) झालेली जी दांपत्ये आहेत त्यात जोग दांपत्याचा समावेश होतो.
जोगांच्या कामाचा व्याप अवाढव्य. महाराष्ट्र बँक, रोटरी क्लब, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी एक ना दोन. त्यात जोगांची 'मुक्तद्वार मनोवृत्ती.' घरी वा बँकेत त्यांना भेटण्याची वेळ वगैरे काही ठरलेली नाही. कोणीही केव्हाही भेटतो. सर्वांचे तेथे स्वागत आहे.
असा एकूण प्रकार म्हणजे घरगुती जीवनात सगळी गडबड, धांदल. सौ. जोगांनी हे सारे स्वीकारले आहे. दोघेही पुरोगामी, सुधारक घराण्यामधले. दोघांचेही व्यक्तिमत्त्व ताजे, सौम्यच. सहसा कोणत्याही प्रसंगात संपूर्णपणे न अडकणारे. काहीसे अलिप्त पण आर्जवी.
सौ. जोग म्हणजे जोगांच्या प्रचंड कार्यातील 'इनर व्हील !' सहसा लक्षात न येणारे पण खूप महत्त्वाचे.
दोघांच्या मुद्रेवरील समाधान वैभवी वाटचालीचे आहे तसेच ते समरसतेचे, कृतकृत्यतेचे आहे.

**श्री. चिं. वि जोग । सौ. कमल जोग**



## मुक्काम पुणे
## यांच्या हाती बँक सुखरूप आहे.






महाराष्ट्र बँक या इमारतीत होती तेव्हा या बँकेशी व्यवहार केलेले लोक अद्याप हयात आहेत. या बँकेची वाढ व विस्तार याविषयी अचंबा व्यक्त करणारेही लोक अजून भेटतात. तिच्या मध्याच्या प्रचंड स्वरूपाचे प्रतीक अशी ही बँकेची बाजीराव रस्त्यावरील नवी टोलेजंग इमारत.

हा विस्तार आपोआप झालेला नाही. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, नियोजनाच्या अंतर्गत झालेले महाराष्ट्राचे औद्योगिकरण ही कारणे तर आहेतच. पण ही अनुकूल पार्श्वभूमी इतर महाराष्ट्रीय बँकांनाही होतीच. त्यांच्या तुलनेने महाराष्ट्र बँकेची वाढ फार वेगवान ठरते.

कोणतीही संस्था विकसित तेवढ्याच प्रमाणात होते की जेवढ्या प्रमाणात त्या संस्थेचे चालक विकसित होतात. (ऑर्गनायझेशन्स ग्रो अँज फार अँज मेन बिहाईंड देम ग्रो) या आल्फ्रेड स्लो यांच्या सिद्धान्ताची साक्ष महाराष्ट्र बँकेच्या प्रगतीवरून पटते.

'दी बँक ऑफ महाराष्ट्र लि.' या एका लहान बँकेचे मॅनेजर या नात्याने तीस वर्षापूर्वी (१५ जुलै १९४३) बँकेत आलेले श्री. चि. वि. जोग आज उभ्या महाराष्ट्राचे बँकर म्हणून रास्तपणे ओळखले जातात. या तीस वर्षांत त्यांचे हुद्दे मॅनेजर, जनरल मॅनेजर, चेअरमन, कस्टोडियन आणि आता चेअरमन अँड मॅनेजिंग डायरेक्टर असे कितीही बदलले तरी महाराष्ट्र बँकेशी त्याचे असलेले नाते एकच राहिले. शिवाय आपल्या व्यवसायाच्या मर्यादा सांभाळून ते काही व्यापक अर्थाने महाराष्ट्राशी समरस झाले. समाजाची आर्थिक स्थिती आहे तशी गृहीत धरून त्या अनुरोधाने व्यवहार मर्यादित करण्याची इतर बँकांची पद्धत जोगांनी ठामपणे नाकारली. महाराष्ट्राच्या आर्थिक, औद्योगिक विकासाला गती देण्याचे आपले खरे काम आहे हे त्यांनी सदैव दृष्टिसमोर ठेवले व त्यादृष्टीने महाराष्ट्रातील अनेक सामाजिक शैक्षणिक कार्याच्या मागे महाराष्ट्रबँकेचे सामर्थ्य उभे केले.

अशा भविष्यदर्शी आणि उपक्रमशील भूमिकेतून महाराष्ट्राची सेवा करणारे पहिले आर्थिक प्रशासक म्हणून जोग यांची नोंद भावी काळात होईल.

सावधपण आणि सहानुभूती यांची फलदायी सांगड जोगांनी आपल्या कामात घातली. प्रश्नाच्या सर्व बाजू ध्यानात घेतल्याशिवाय ते निर्णय घेत नाहीत. व्यक्तिगत रागलोभापासून प्रत्येक प्रश्न वेगळा काढून त्यावर उपाय योजना करण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे. चुकणारी माणसे, चुकवणारी माणसे, यशस्वी माणसे, अपयशी माणसे असे असंख्य नमुने पाहून त्यांचा माणसावरील विश्वास ढळलेला नाही तर अधिक डोळस झाला आहे, जीवस झाला आहे.

महाराष्ट्र बँक त्यांच्या हाती सुखरूप आहेच. पण त्यांच्या मागून त्यांच्या जागी येणाराच्या हातीही ती सुखरूप राहील अशी नेटकी व्यवस्था त्यांनी लावली आहे.

खऱ्या नेतृत्वाचे हेही एक महत्त्वाचे लक्षण असते. महाराष्ट्रात कार्यकर्त्यांची, कर्त्या विद्वानांची व अग्रदूतांची जी दैदिप्यमान परंपरा आहे त्या परंपरेचे निशाण खांद्यावर वागवीत जोग यांचा प्रवास अद्याप चालू आहे. तो तसाच चालू राहो.




नॉन–कॉंट्रोव्हर्शियल म्हणून महाराष्ट्रात ओळखले जाणारे चिं. वि. जोग यांच्या गौरवपर समारंभात, महाराष्ट्रातील अलिकडच्या काळातील सर्वात मोठी कॉंटोव्हर्सी झाली हा एक विरोधाभासच



डॉ. वि. म. दांडेकर
पदरचे काही सांगणार नाही
पण कोणी मला पदरी
बाळग शकणार नाही.

चिं. वि. जोग
षष्टयब्दिनिमित्त दीड वर्षाच्या उशीराने
कार्यक्रम झाला–पण असा गाजला
की पुढील दीड वर्ष पुरावा.

अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण
महाराष्ट्रातील विद्वानांवरच्या
लेखाची सुपारी कोणाला ?
लक्ष्मणशास्त्री जोशी की रामभाऊ जोशी ?




# मुक्काम मुंबई

छाया : मोहन नावेलकर

रांगडा मुंबईकर
कशासाठी ?
तेलासाठी, तुपासाठी, गव्हासाठी
ज्वारीसाठी....साठी...साठी....

झोपडपट्टीत महापौर सुधीर जोशी
बूट खराब तर होणार नाहीत ?






आठवडा किती दिवसांचा असतो ? मुंबईतील गिरणीकामगारांना पडलेला प्रश्न.

## यशस्वी संप

मुंबईच्या गिरणभागात गेला महिनाभर ह्या प्रश्नावर रण माजले आहे. इंटक प्रणीत राष्ट्रीय गिरणी कामगार संघाने गिरणी मालक संघाशी सात दिवसांच्या आठवड्याबाबत करार केला आहे. ह्या करारानुसार मुंबईतल्या गिरणीकामगारांना १८९६ पासून मिळत असलेली समाईक सुटी मिळणे बंद होणार आहे. प्रत्येकाला पाळीपाळीने साप्ताहिक सुटी मिळून नेहमीच्या सुटीच्या दिवशीही गिरण्या सुरू राहाणार आहेत. वर्षातले तीनशे पासष्ट दिवसही गिरण्या सुरू राहाणार. ह्या योगे कापड उत्पादनात १५% वाढ होईल. सुमारे सव्वा लाख जादा कामगारांना काम मिळेल आणि शिवाय प्रत्येक कामगाराला चार टक्के पगार वाढही मिळेल. मध्याच्या वीजकपातीनंतर ही योजना त्वरित अमलात येणार आहे.

आयटक, सिटू, लाल बावटा वगैरे (व भारतीय मजदूर संघही) ह्या योजनेला विरोध करीत आहेत. त्यांच्या मते कामगारांच्या एकत्रित येण्याला, संघटित होण्याला पायबंद बसावा म्हणून समाईक सुट्टीला काट देण्याची ही योजना मालकांनी आखली आहे. त्यांच्या हातातले बाहुले बनलेल्या इंटकनी तिला मान्यता देऊन कामगारांचा विश्वासघात केला आहे. शिवाय १५% उत्पादनवाढीच्या मोबदल्यात ४% पगारवाढही त्यांना मान्य नाही. हा करारही कायम स्वरूपाचा नाही तर तो गरज भासल्यास धुडकावून लावणे मालकांना शक्य होईल अशीही त्यात तरतूद आहे. साहजिकच, आजची उत्पादनवाढीची गरज संपल्यावर, ह्या योजनेमुळे नव्याने भरती झालेल्या सव्वा लाख कामगारांना बेकारीच्या खाईत लोटायलाही मालक मागेपुढे पाहणार नाहीत ! ही सार्थ भितीही परवा विरोधकांच्या सभेत सर्वश्री यशवंत चव्हाण, कां. निटणीस आदिनी बोलून दाखवली. १५ जुलैला विरोधकांनी ह्या योजनेविरुद्ध पुकारलेला लाक्षणिक संप यशस्वी झाला हे मात्र निःसशय ! मग होमिग आणि रजनीभाई काहीही म्हणोत !




सेक्रेटरिएट जिमखाना

खुली टेबलटेनिस स्पर्धा.
अंतिम सामन्यापूर्वी :
– दिलीप लाखाणी (रमेश मंत्रींसारखा दिसणारा) विरुद्ध
– नीरज बजाज (रमेश मंत्रींसारखा न दिसणारा)
सामना बजाजने जिंकला.
खुल्या स्पर्धातला बजाजचा या वर्षातला हा तिसरा विजय.

## निवडणूका – एक उत्सव

जूनमधील कॉलेज प्रवेशाची झुंबड आता ओसरली आहे. दोन तीन कॉलेज पावसाळे पाहिलेल्या विद्यार्थ्यांच्यात सध्या चर्चेचा कोणता विषय असेल तर तो म्हणजे निवडणुका. पोस्टर्स, पताका, पत्रिका, रंगीबेरंगी गाड्या, कोपऱ्या कोपऱ्यात भरलेल्या – उधळलेल्या सभा, चर्चा–हाणामाऱ्या, नंतर मिरवणूका, हार, तुरे... अगदी लोकसभा – विधानसभेच्यावेळी जसे वातावरण तापलेले असते तसे वातावरण सध्या कॉलेजविश्वात आहे. आमच्या मुंबईच्या छायाचित्रकाराने जे. जे. स्कूल मधील निवडणूकांची टिपलेली ही दोन-चार चित्रे.





पायरी न सोडता प्रचार




प्रचाराच्या दोन पद्धती

एक : 'माझे ऐका' पद्धत
दुसरी : 'सांगते ऐका' पद्धत

आम्ही सगळं करतो
तुम्ही फक्त मतं द्या –
आणि पाहा !





# स्मरण गाथा

१६ जुलै १९७३. मुंबईतील साहित्यसंघाचे डॉ. भालेराव सभागृह. संध्याकाळी ६। वाजता, गो. नी. दांडेकरांच्या आगाऊ गाजलेल्या स्मरणगाथेचा प्रकाशनसोहळा. माडगूळकर, बाबासाहेब पुरंदरे, प्रा. व. दि. कुलकर्णी असली भातबर पाहुणेमंडळी; शिवाय बिनपावसाचा दिवस; त्यामुळे चांगल्यापैकी गर्दी.

व. दीं. नी आपल्या प्राध्यापकी भाषणात, ' रुळांशिवाय दांडेकरांची गाडी धावते ' म्हणून दांडेकरांचे कौतुक केले. वर, इतर लेखनात वाहवत जाणारे, गहिवरणारे दांडेकर ' स्मरणगाथे 'त विस्मयजनक संयम दाखवतात असे सांगितले.

आपले संकल्पित भाषण व. दीं.नीच उरकले अशी लाडिक तक्रार बाबासाहेब पुरंदऱ्यांनी केली. तरीही, मराठी भाषेतील हे अद्वितीय आत्मचरित्र आहे; सत्याला सौंदर्य असते हे मूर्तिमंत साकार करणारा हा ग्रंथ आहे; तीस वर्षांच्या आयुष्यात दांडेकरांना एकही अचूक गुरु भेटला नाही—ते स्वताच स्वतःचे गुरु आहेत; अशी मौलिक माहिती त्यांनी पुरवली.

' हा झरा—मूळचाच खरा ' असा दांडेकरांचा गौरव माडगूळकरांनी केला, आणि भाषणाच्या ओघात, सामान्यतः कोणताही साहित्यिक आपल्या समकालीन साहित्यिकाचे साहित्य आधाशीपणे वाचत नाही; पण खरेच सांगतो, ' स्मरणगाथा ' हे पुस्तक पूर्ण होईपर्यंत मला खाली ठेववले नाही अशी कबुलीही दिली.


गो. नी. दांडेकरबुवांनी सांगितले : काहीजण मला नाटकी म्हणतात, ढोंगी म्हणतात; पण काही चांगले वाचले—पाहिले की माझ्या मनाचा घडा भरू लागतो, डोळे झरू लागतात—त्याला मी काय करू ?

दांडेकरांनी साठ वर्षात शंभरावर पुस्तके लिहिली. ' स्मरणगाथे 'त एकही पुस्तक न लिहिलेल्या, फरफटणाऱ्या दांडेकरांचे चित्र पाहायला मिळते. छपराखालती बसलेल्या दांडेकरांची पुढील गाथा आपल्यासमोर उलगडली आहे.



' मराठीतील एक अद्वितीय आत्मचरित्र ' आणि त्याचा लेखक

समकालीन लेखकाचे असूनही स्मरणगाथा संपूर्ण वाचल्याची कबूली देताना — माडगूळकर



**स्मरणगाथेच्या योगे कित्येक शतकांनी गाथेचे 'ओरिजनल रायटर' संत तुकारामांना पृथ्वीतलाचे 'स्मरण' झाले. त्यांच्या भेटीची ही धावती चित्रकथा....**

# भेट-गाथा

श्रीनिवास प्रभुदेसाई




एक वेळ बेकार इंजिनीयरना नोकऱ्या देता येतील. पण 'बेकार' मंत्र्यांचे काय करावे?
दर सोमवारी संध्याकाळी उपास करायची संधी सरकारनी मागे घेतली. हे बरे नाही. मग आम्ही उपास तरी केव्हा करावा देवा?


बुडलो तरी
नाक वर!
हैग न्यायालयाचा निर्णय
कार्डवर
वनस्पती
तूप मिळेल
पुढच्या आठवड्यात
कार्डवर नवरे मुलगे
मिळणार आहेत म्हणे!
अफगाणीस्थानचे
'राजे' साहेब
सुस्वागतम्!

# एक ऑगस्ट

श्री. ग. मा.

:※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※:

## स्वदेशी आणि बहिष्कार

—लोकमान्य टिळक

बहिष्काराचे तत्त्व पाच वर्षे देशाने इमाने-इतबारे पाळले तर युरोपात लढाई उत्पन्न झाल्याशिवाय राहात नाही. आजचे सारे राजकारण व्यापाराच्या खुंटाभोवती घुटमळत आहे. युरोपातील प्रत्येक प्रबळ राष्ट्र जगातील बाजारपेठा काबीज करण्यासाठी रात्रंदिवस धडपडत आहे. हिंदुस्थानची बाजारपेठ इंग्रजानी सर्वस्वी व्यापून टाकली आहे ही गोष्ट युरोपातील प्रत्येक बलाढ्य राष्ट्राच्या मनात शल्यासारखी बोचत आहे. आपल्यात इंग्रजांशी लढण्याचे सामर्थ्य नाही, तेव्हा इंग्रजांशी लढण्यास जे समर्थ आहेत त्यांना तरी आपण चिथावू या. हिंदुस्थानची बाजारपेठ इंग्रजांच्या मगरमिठीतून सोडवून जर्मनांच्या अगर अमेरिकनांच्या हातात काही काळ आपणास देता आली तर इग्रज लोक त्याच्याशी वर्दळीवर आल्यावाचून खात्रीने राहणार नाहीत. आणि इंग्रज लोक कोठेतरी बाहेर भांडणात गुतल्यावाचून आपणास आपले हातपाय पसरण्यास अवकाश मिळावयाचा नाही. हिंदुस्थानच्या बाजारपेठेतून इंग्लडला हुसकावून देऊन जर्मनीला आत घेतल्यास तोही एक दिवस आपली मानगुटी धरल्यावाचून राहणार नाही हे खरे आहे. परंतु बहिष्कारास स्वदेशीची जी जोड देण्यात आली आहे ती हे भावी सकट टाळता यावे म्हणूनच देण्यात आली आहे. स्वदेशीच्या सहाय्याने परदेशी व्यापाऱ्याच्या दाढेतून जेवढा प्रांत आपणास सोडविता येईल तेवढा सोडविण्यात कसूर करावयाचीच नाही. परंतु आज आपणास स्वदेशी सर्वांगपरिपूर्ण करता येणे शक्य नाही. तेव्हा स्वदेशीच्या कक्षेबाहेर राहणाऱ्या मुलुखातून इग्रजांची हकालपट्टी करणे आपणास अत्यवश्य आहे. बहिष्काराने शत्रूच्या शत्रूस चिथविणे व स्वदेशीने आपले घर दुरुस्त करणे असा हा दुहेरी डाव आहे. काट्याने काटा काढल्यानंतर तो काही कोणी आपल्या पायात रुतवून घेत नाही. बहिष्कार हे नैमित्तिक कर्म आहे; स्वदेशी हे नित्यकर्म आहे. शत्रूच्या घरात यादवी माजविणे अगर शत्रूच्या शत्रूस उत्तेजन देणे एवढाच आत्मोद्धाराचा मार्ग दुर्बलाना नेहमी मोकळा असतो. सुदोपसुंदांची कथा हे या तत्त्वाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. सुंदोपसुदांचे मरण फक्त त्यांच्या परस्पराच्या हाती होते. तिसरा कोणीही त्यास मारण्यास समर्थ नव्हता. तेव्हा त्या उभयतांमध्ये कलह उत्पन्न करणे एवढाच उपाय देवाच्या हाती उरलेला होता. सर्व जग पादाक्रांत करू पाहाणाऱ्या युरोपातील बलाढ्य राष्ट्रांची आज सुदोपसुदांच्या सारखीच स्थिती आहे. ते आपापसात लढतील तरच मरतील. नाहीतर सर्व जग गिळून टाकतील. तेव्हा त्यांच्या आहारी पडलेल्या किंवा पडण्याच्या बेतात असलेल्या राष्ट्रांनी या दुनियेस लुबाडू पाहाणाऱ्या दरोडेखोरांची आपापसात कलागत कशी लागेल ही चिंता वाहिली पाहिजे. स्वदेशी बहिष्काराच्या शस्त्राचा शहाणपणाने उपयोग केल्यास हिंदुस्थानची बाजारपेठ तिलोत्तमेप्रमाणे हे यादवीचे कार्य हटकून घडवून आणील. ■

:※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※※:

टिळकांनी स्वदेशी चळवळीचा उठाव केला.

आजही या चळवळीची गरज आहे. पण टिळकांच्या काळाप्रमाणे आज स्वदेशी आणि परदेशी वस्तूतला फरक स्पष्टपणे लोकांसमोर मांडता येत नाही ही अडचण आहे.

अगदी पहिली अडचण परदेशी वस्तुंची आपल्यावर पडलेली मोहिनी ही आहे.

एक नक्षलवादी विचाराचा तरुण माझ्याकडे नेहमी येतो. त्याचे मनगटावर एक भारी किंमतीचे घड्याळ मी पाहतो. एकदा मी त्याला सहज विचारले—घड्याळ कुठून घेतले ? किंमत किती ? तीनशे रुपयाच्या आसपास किंमत असलेले घड्याळ त्याला शे-दीडशे रुपयात पडले होते. म्हणजे ते ' स्मगल ' केलेले होते. त्यालाही ते पटले.

चांगली घड्याळे हिंदुस्थानात तयार होत असूनही आपल्याला परदेशी वस्तूंचे असे आकर्षण वाटत असते—अगदी नक्षलवादी युवकानाही.

दुसरा गट राष्ट्रवादी युवकाचा. जनसघाने आपली स्वदेशी योजना जाहीर करून तीन वर्षे उलटली. पण याबाबत प्रत्यक्ष पावले अजून उचलली गेली नाहीत. परदेशी वस्तूवर बहिष्कार टाकण्याची एखादी चळवळ जनसघ हाती घेईल अशी कल्पना होती. पण अजून तरी काही हालचाल नाही. अगदी परवाच्या हुबळी अधिवेशनातही स्वदेशी योजनेच्या पुनरुच्चारापलिकडे काही घडले नाही.

पण समजा जनसंघाने किंवा अन्य कुठल्या पक्षाने परदेशी वस्तूंच्या बहिष्काराची चळवळ हाती घ्यायचे ठरवले तरी खरी अडचण पुढेच आहे.

स्वदेशी आणि परदेशी असा भेदभाव करायचा कसा ?

आतरराष्ट्रीय कपन्यांची जाळी पसरत आहेत. आपल्याकडे अमेरिकन, जर्मन, जपानी कंपन्या येतात, आपल्याही कंपन्या अन्य देशात जातात. कोलॅबरेशन्स वाढत आहेत. भारत सरकारचे धोरण काहीही असो. अगदी गरज नसलेल्या हॉटेलाच्या धंद्यातही ही कोलॅबरेशन्स आता मान्यता पावली आहेत. ओबेरॉय—शेरेटन या हॉटेलच्या उद्घाटनाला आमच्या अर्थमंत्र्यांनी यावे याचा दुसरा अर्थ काय ? एकीकडे ही कोलॅबरेशन्स घातक असतात असे बोलायचे आणि दुसरीकडे त्यांचेवर सरकारी वरद

हस्तही ठेवायचा हा दुटप्पीपणा संतापजनक आहे. तरी तोही आपण खपवून घेत आहोत. परदेशी पाहुण्यासाठी हे करावे लागते हा फक्त वरवरचा देखावा आहे. वर्षभरातली या हॉटेलाची रजिस्टरे तपासली तर परदेशी-यापेक्षा आपलीच बडीबडी मंडळी तेथे या नाही त्या कारणास्तव जाऊन आलेली, जात असलेली दिसतील. हा अगदी टिळक-गांधींच्या स्वदेशी चळवळीचा खून आहे पण तोही आपण उघडया डोळ्यांनी पाहण्या-इतके निर्ढावलो आहोत.

तेव्हा या कोलॅबरेशन्सवर बहिष्कार टाकणे हाही स्वदेशी चळवळीचा आजचा मार्ग ठरू शकत नाही. कारण सामान्य लोकांच्या आवाक्यात येणारे हे क्षेत्रच नाही. बहुतेक कोलॅबरेशन्स उची वस्तूच्या निर्मितीतली आहेत किंवा अगदी औद्योगिक क्षेत्रातील आवश्यक घटकातील आहेत.

अपवाद आहेत. उदाहरणार्थ कोका कोला हे पेय. काही टुथपेस्टस् इत्यादी.

गेल्या आठवड्यात गोखले इन्स्टिटयुट-मधील काही अभ्यासकाशी या विषयावर बोलत होतो. यापैकी सौ. कुमुद पोरे यानी हा मार्ग सुचविला. लोकानी या वस्तू वापरू नयेत असे त्याचे म्हणणे. हवा कशाला कोका कोला? पूर्ण परदेशी किंवा कोलॅबरेशन्स-मधील टूथ पेस्टस्ची यादी जाहीर करावी. लोकांनी या वापरू नयेत म्हणून प्रचार करावा.

मी त्यांना एक अनुभव सागितला. पर-वाच्या भारत-पाक युद्धाच्या वेळी अमेरिकेने आपल्याला दगा दिला, पाकिस्तानची बाजू घेतली, बगालच्या उपसागरात सातवे आरमार आणले यामुळे तरुण संतप्त झालेले होते. साधना कार्यालयात एक बैठक झाली. अमेरिकेचा कडक निषेध करणारी भाषणे झाली. एक मोर्चा काढण्याचेही ठरत होते. मी सुचविले—एखादी क्रांतिकारक कृती करा. कमीत कमी एखाद्या अमेरिकन वस्तूवर बहिष्कार पुकारा.

पुढे तास, अर्धातास चर्चा होऊनही अशी वस्तू—जी सर्वांना चटकन समजेल, अशी सापडेना. कोका कोलाचे नाव मी सुचविले. पण कुणी ते मनावर घेतले नाही.

तेव्हा आज स्वदेशी—परदेशी असा स्पष्ट फरक दाखवता येत नाही. तरीही आपण परदेशाच्या आर्थिक वर्चस्वाखाली दबले, दडपले जात आहोत. अशी एक सार्वत्रिक भावना आहे. पडितांपासून तो अगदी सामान्यजनांपर्यंत.

नवी स्वदेशी चळवळ यासाठी हवी आहे. पण तिची नेमकी रेघ आखणे फार अवघड होऊन बसले आहे. टिळकाच्या वेळी हे काम सोपे होते. सगळीच साखर, सगळेच कापड पर-देशातून येत होते. त्यामुळे परदेशी कापडांच्या होळ्या, साखर न वापरणे हा कार्यक्रम सार्वत्रिक ठरू शकला. आज हे शक्य नाही. किर्लोस्कराचे कमिन्सशी नाते आहे आणि बिर्लाही रशियात जाऊन कारखाने काढत आहेत. यामुळे स्वदेशी चळवळीची दिशा चुकली तर बुमरँगप्रमाणे हे शस्त्र आपल्या वरच उलटण्याचीही शक्यता आहे.

एक करता येण्यासारखे आहे. स्वदेशी म्हणजे ग्रामीण असे एक नवे समीकरण माडून जे कारखाने, उद्योगधदे शहरात विना-कारण गर्दी करताहेत त्याना खेडेगावात नेण्यासाठी या चळवळीचा उपयोग होऊ शकेल. परदेशी असो, स्वदेशी असो आपले भाडवल शहरात खेळते आहे. याचे ओघ खेड्याकडे वाहून नेणे अवश्य आहे. याबाबत आता राज्यकर्त्यांमध्ये, तज्ज्ञामध्ये, समाज-शास्त्रज्ञामध्ये दुमत नाही. पण हे घडत नाही, केवळ सरकारी प्रोत्साहन कमी पडते असा अनुभव आहे लोकानीच याबाबत आता पुढाकार घेतला तर? उदाहरणार्थ मुबई-तल्या कापड गिरण्या. या मुबईत का असा-व्यात याला कसलेही शास्त्रीय कारण नाही. हलवा या कोकणात, किंवा विदर्भ—मराठ-वाड्यात. हलवल्या जाणार नसतील तर लोक या गिरण्यांचे कापड घेणार नाहीत. याबाबत काही अपवाद असतील तर अभ्यास करून ते अगोदरच ठरवले जावेत, पण अपवाद हा नियम नाही. कापडधदा मुबईहून हलला तर मुंबई केवढी मोकळी होईल! आजचे अनेक प्रश्नही सुटू लागतील. ग्रामीण बकारीवर इलाज सापडेल, खेडी आणि शहरे यांचा ढळलेला समतोल पुन्हा प्रस्थापित होईल, अतिरिक्त केंद्रीकरण थाबेल. अनेक फायदे कापड गिरण्यासारखी इतर कारखानदारीही वेचून वेचून शहरातून खेडेगावांकडे हलवली गेली पाहिजे. ही हलवण्यासाठी स्वदेशी—बहिष्कार चळवळीची जोडगोळी उपयुक्त ठरू शकेल. लोकमताचा असा दबाव निर्माण झाला तर शासनालाही काही तरी करणे भाग पडेल, कारखानदार भांडवलदारही या चळवळीकडे दुर्लक्ष करू शकणार नाहीत. कारण त्यांच्या खिशालाच धक्का बसलेला असेल.

अर्थात हे सोपे नाही. याला केवळ प्रस्था-पित कारखानदारच विरोध करतील असे नाही. मजूर सघटनाही या चळवळीला पाठिंबा देणार नाहीत. एका समाजवादी पुढाऱ्याशी मी यासबधी बोललो. त्याने चक्क सांगितले — 'विचार ठीक. पण आम्ही काही करू शकणार नाही. कारण कामगार संघटनाची आमची सगळी बैठकच यामुळे विस्कटणार आहे.' या बैठकीत अनेकाचे, अनेक हितसबध गुंतलेले कोण या हित-सबधावर पाणी सोडायला तयार होणार? शिवाय कामगारांनाही हे पटणार नाही. कोकणातून आलेला कामगार परत कोकणात जायला तयार नाही. गिरण्या बद पडल्या तरी बेकार अवस्थेत मुबईतच तो कसेबसे दिवस काढेल पण मुबई सोडणार नाही. हा प्रस्था-पित मजूरवर्गाचा विरोधही चळवळीला गृहीत धरावा लागेल. हा विरोध कमी कसा होईल, कामगारसघटना यात पुढाकार कसा घेतील हे पाहावे लागेल. अशी साथ मिळाली नाही तर चळवळ फार पुढे सरकणार नाही, तिचे अर्थही वेगवेगळे लावले जातील.

असे काही घडले, घडवले तर टिळकाचा वारसा आपण पुढे नेला असे होईल. विशे-षत: ही जबाबदारी विरोधी पक्षावर आहे. पर्यायी पक्षाचा दावा करणाऱ्यांवर तर विशे-षच. कारण यामुळे आपला विरोध विधायक स्वरूपाचा आहे हे ते जनमानसावर ठसवू शकतील. आज सर्व अभिक्रम (Initiative) शासनाकडे, शासनकर्त्या पक्षाकडे व विरोध-कांकडे फक्त विरोध नोदविणे, ओरडणे एवढेच प्रतिक्रियात्मक कार्य उरले आहे. हे चित्र पालटेल. अभिक्रम शासनाकडून खेचून घेता येईल. एक स्वयभू, स्वयशासित व आत्मनिष्ठ चळवळ उभी राहील, जिचा जनसामान्याच्या प्रत्यक्ष आचरणाशी, दैनंदिन जीवनाशी काही-तरी सबध पोहोचेल. आज यासाठी काही स्वार्थत्याग करावा लागेल, प्रस्थापित हित-संबधावर पाणी सोडावे लागेल हे खरे. पण एक कालखड यामुळे उजळून निघेल, देशाची घडी बदलण्याचे श्रेय मिळेल, जनतेचे लोपलेले चैतन्य पुन्हा जागे होईल, हे केवढे मोठे यश आहे? ■

# दैव जाणिले कुणी?



लंडनमधील एक खळबळजनक खूनखटला

सादरकर्ते : ॲड. माधव कानिटकर

२९ सप्टेंबर १९३५ ! त्यादिवशी रविवार होता. मिस सुसान हेन्स जॉन्सन नावाची षोडशा एडिनबर्ग रोडने आपल्याच नादात गमतीत चालत होती. वाटेतच तिला नदीच्या पाण्याचा खळखळाट ऐकू आला. समोरच एक छोटासा पूल देखील दिसला. सकाळीच सहज फेरफटका मारण्यासाठी निघालेल्या त्या खट्याळ तरुणीला ते दृष्य रमणीय वाटले. झपाझप पावले टाकीत ती पुलावर आली आणि दोन्ही हाताची कोपरं पुलाच्या कट्ट्यावर टेकून व नाजूक पजे गालावर टेकवून ती खाली वाकून नदीचं पाणी कसं वाहतय ते पाहू लागली. तिचे काळेभोर केस बॉबकट केलेले असून देखील वाऱ्याने पुन्हा पुन्हा विस्कटत होते आणि पाण्याकडे बघत मध्येच ती त्यांना सावरीत होती... सुखाच्या त्या अत्युत्तम क्षणी तिला एक धक्काच बसला. नदीच्या काठी एका दगडाजवळ दिसलेले भयानक दृश्य बघून तिच्या पापण्या भितीने फडफडल्या तोंडातून बाहेर पडणारी अस्फुट किंकाळी तिने प्रयासाने दाबली आणि ओठावर एक हात ठेवून आल्यापावली झपाटल्यासारखी पळत सुटली...

धापा टाकत टाकत ती हॉटेलात घुसली आणि अक्षरश: तिने तिच्या खोलीचा दरवाजा ठोठावण्यास सुरुवात केली.

'आल्फ्रेडऽ ! आल्फ्रेडऽऽ ! दरवाजा उघड आल्फ्रेडऽऽऽ !'

आतून घाई घाईने कडी काढण्याचा आवाज झाला. आपल्या बहिणीची अवस्था बघून आल्फ्रेडने तिला दंडांना धरून आत घेतली आणि तिला हलवीत तो म्हणाला 'काय झाल ग ताई ? घाबरल्येस का एवढी ? तुला कुणी काही केल काय ?'

मिस सुसान जॉन्सनने नकारार्थी मान हालवली. धापा टाकीत तिने विचित्र हातवारे केले. तिच्या टपोऱ्या डोळ्यात पाणी तरळले. 'तिकडे... पुलाखाली... फार भयकर... आल्फ्रेडने तिला चटकन थडगार पाणी पाजले आणि खुर्चीवर तिला बसवीत तो म्हणाला 'नीट साग बघू काय आहे ते. घाबरू नको. मी आहे ना तुझ्याजवळ ?'

'दादा ! नदीच्या काठी एका दगडाला अडकून कागदाची पुडकी पडली आहेत पाण्यामुळे ती उघडली गेली आहेत. आणि त्यात माणसाचे तोडलेले हात, तुकडे केलेले पाय, कातडं, सोललेली कवटी आणि छातीचा पिंजरा, मासाचे गोळे हे सगळं स्पष्ट दिसतय. नदीच पाणी त्या अडकलेल्या छातीच्या पिंजऱ्यातून वाहत पुढे जाताना ताबडलाल होऊन येत होत आणि पुढच्या मोठ्या जलाशयात पुन्हा पूर्वीसारख होऊन वहात होत.'

... आल्फ्रेड जवळ जवळ धावतच पुलावर गेला आणि वाकून पाहू लागला. त्याच्या बहिणीच्या नजरेने तिच्या डोळ्याना धोका दिला नव्हता. जवळच्याच बगलीत घुसून त्याने पोलीस स्टेशनला फोन केला. 'टिर्रिंग, टिरऽऽऽरिंग !'

'डंफ्रीशायर पोलीस स्टेशन प्लिज, सार्जंट रॉबर्ट स्लोन स्पिकींग!'

'साहेब ! कुणाचा तरी खून झालाय ! इथे एडिनबर्ग रोड पुलाखाली मानवी हातापायाचे तुकडे, कवटी, हाडं आणि मास कुणीतरी टाकून दिलय.'

'तुम्ही पुलाजवळच थावा, मी आलोच. सार्जंट रॉबर्ट स्लोन आणि त्याचे पोलीस धडाधड जीपमध्ये चढले. आणि सायरनचा आवाज करीत ती अवघ्या काही मिनिटात पुलाशी आली.

हातत हात घालून, एकमेकाना लगटून चालणारी अनेक आंग्ल जोडपी क्षणभर प्रेम करायला विसरली. सकाळी सकाळीच पोलीस ? आल्फ्रेड जॉन्सन तत्परतेने पुढे झाला आणि सार्जंट बरोबर हस्तांदोलन करीत त्याने त्याना आपली ओळख करून दिली आणि पुलावर वाकून त्यांना ती जागा उजव्या हाताच्या बोटाने दाखवली. झाल ! काय आहे ते पहाण्यासाठी लोकही त्याच्या मागोमाग वाकून पाहू लागले. जाणारे येणारे त्याच्या पाठीवरून ओणवून पाहू लागले. फौजदारी उत्सुकता ही अशी असते. ती सगळ्या जगात असते. कारण ती मानवी मनातच असते. मुबईत पश्चिम रेल्वेची लोकल संध्याकाळी उपनगरात थावली म्हणजे उतरणारे पुढचे मागच्यांना मागेच ढकलतात आणि गाडी सुटेल या भीतीने मागचे पुढच्यांना पुढे ढकलतात तसा प्रकार त्या पुलावर सुरू झाला. त्या गर्दीतून स्वत:ला सोडवून घेऊन नदीचा काठ आणि उच रस्ता याना जोडणारा जो तिरकस बधारा होता त्यावरून अगदी हिंदी सिनेमातल्या हीरोला शोभेल अशा तऱ्हेने घसरत सार्जंट स्लोन खाली गेले. त्याच्या पाठोपाठ धडपडत हवालदार सुद्धा गेले. ढोपरापर्यंत पाण्यात उतरून त्यानी पहाणी केली. त्या कागदाच्या पुडक्याचा कागद वर्तमानपत्राचा होता. अक होता 'सडे ग्राफिक अँन्ड न्यूज' चा. पुडक्याला हात न लावता त्यांनी तो हातातल्या छडीच्या टोकानी थोडासा उकलला. एका स्त्रीचा खून झाला असावा कारण पुडक्यात एक ब्लाऊज होता. आणि ब्लाऊजमध्ये दडाचे तुकडे आणि मासाचे ४ तुकडे होते त्याच्या जरा पुढे एका उशीच्या अभ्र्यात हाताचे फक्त पजे, माड्याचे तुकडे, घुटग्या घालचे दोन पाय– त्यांची एक दोन बोटे तोडून मांसात टाकलेली– असे हाड मिश्रित मासाचे एकूण ९ तुकडे होते.

सार्जंट स्लोन हबकले. असा भीषण प्रकार त्यांनी इतक्या वर्षांच्या पोलीस खात्यातील नोकरीत कधी पाहिला नव्हता. स्वत:ला सावरून घेत ते धैर्याने पुढे गेले. तिथे एका चादरीत मासाचे १७ तुकडे आणि चामडी काढून टाकलेला ताबडालाल छातीचा भाग– ज्याचा मानेकडचा भाग तर अगावर शहारे आणणारा दिसत होता. रक्त गोळा झालेल. मांस आक्रसलेल. त्या पिंजऱ्याजवळच पाय कापून अल्लद ठेवलेले होते. सार्जंट आणखी पुढे सरकला. अरे बापरे ! वर्तमान पत्राच्या मोठ्या कागदात मासाचे तुकडे, बोटांचे तुकडे, आणि चामडी काढून टाकलेल्या दोन कवट्या. त्याचे डोळे फोडलेले. एकाही कवटीला नाक नाहीच. एका कवटीचा ओठाजवळचा भाग उघडा– चार खालचे दात पाडलेले (की पडलेले ?) जणू ती कवटी त्याना सांगत होती 'साहेब ! बघा, आम्ही कुठल्या मरणानी मेलो ते !' एक नव्हे दोन खून झालेले होते तर ! या दुसऱ्या पुडक्याच्या वर्तमान पत्राचे नाव त्यांनी वाचले. ५–६ आणि ७ सप्टेंबर १९३५ ची ती वर्तमानपत्रं होती., नाव होतं 'डेली हेरॉल्ड' त्याना थोडा वेळ अगोदर सापडलेल्या 'संडे ग्राफीक अॅंड न्यूज' या वर्तमानपत्राची तारीख होती १५ सप्टेंबर १९३५. म्हणजे हे खून सप्टेंबर किंवा १४ सप्टेंबरला किंवा ४ ते १४ च्या दरम्यान झाले असले पाहिजेत. पण सप्टेंबरनंतर नक्की नाही. सार्जंटने तावडतोब पुढचे काम सुरू केले. त्याने आजुबाजूच्या वस्तूंची काळजीपूर्वक पहाणी केली. अगदी जवळच पेंढ्याचे पुजके पडलेले– अडकलेले होते– मासाच्या तुकड्यात सुद्धा होते. वाहत्या पाण्यात हिरव शवाळं यायच्या ऐवजी पेंढा ? अच्छा ! म्हणजे रत्नागिरीहून आंब्याची करंडी एस. टी. ने मुंबईला



डॉक्टर रक्स्टन आपल्या मुलीला घेऊन फिरायला निघालेले नाहीत. तर बाथरूममध्ये पडलेल्या त्या दोन प्रेतांची विल्हेवाट लावताना तिचा त्रास होऊ नये म्हणून आपल्या मित्राच्या घरी तिला पोचवायला निघाले आहेत.

याची तशा पद्धतीने हे छिन्नविछिन्न मानवी देह पाण्यात टाकून दिले होते तर. एक लहान मुलाचा वुलन स्वेटर मिळाला. त्याला गवत चिकटलेलं होतं. नासलेल्या आणि सडलेल्या शारिरांच्या वेगवेगळ्या अवयांबरोबर या सगळ्या वस्तूंचा पंचनामा केला गेला. त्या सामाना-सकट ते पोलीस स्टेशनला आले. आल्याबरोबर त्यांनी वेगवेगळ्या पोलीस स्टेशन्सला फोन करून 'दोन व्यक्ती एकदम नाहिशा झाल्याची काही तक्रार आहे का ?' याबाबत तपास केला आणि नकारार्थी उत्तर आल्यावर 'हीच खबर पुढच्या पोलीस स्टेशनला द्या आणि विशष काही कळल्यास माझ्याशी संपर्क साधा' अशी सूचना देऊन ठेवली. ते सामान त्यांनी वैद्यकीय तपासणीसाठी डॉ. गिल्बर्ट मिलर लेक्चरर इन पॅथॉलॉजी, एडिनबर्ग युनिव्हर्सिटी यांच्याकडे पाठवले. त्याची उत्तरीय तपासणी केली ती प्रा. जॉन ग्लॅस्टर : फॉरेन्सिक सायन्सचे प्राध्यापक; ग्लॅसगो युनिव्हर्सिटी यांनी. त्यानंतर सार्जंटने फोन लावले ते दैनिकांच्या संपादकांना. त्यांना ही बातमी मुद्दामच प्रसिद्ध व्हायला हवी होती. कारण अशा बातम्या वाचून गुन्हा करणारा इसम मनातल्या मनात हबकतो. त्याची नेहमीची



**दुर्दैवी इझाबेला...**
**बिचारीला काय कल्पना, की**
**सॉलिसिटरबरोबरची तिची मैत्री**
**तिला इतकी महागात पडेल म्हणून...**

वागणूक वदलते. त्याचं अस्वस्थ मन त्याच्या तोंडूनच त्याची काळी कृत्यं वदवतं आणि तो पोलिसांच्या जाळ्यात लवकर सापडतो आणि गंमत अशी की ज्या वर्तमानपत्राच्या कागदात ते मानवी देहांचे तुकडे सापडले होते त्या डेली हेराल्डनेच ठळक मथळा देऊन ही बातमी छापली.

'मानवी क्रौर्याची परिसीमा! चामडी सोलून, तुकडे करून शरिरे पाण्यात टाकली. पोलीस तपास चालू आहे. – या याबावतीत असे समजते की येथील एडिनबर्ग रोड पुलाखाली काल सकाळी छिन्न विछिन्न केलेली दोन मानवी शरिरे पोलीसांना सापडली. ही प्रेते १ पुरुष व स्त्री यांची असावीत असे सर्वत्र बोलले जात आहे व पोलीसांचाही अंदाज तोच आहे.

२, डाल्टन स्क्वेअर, लँचेस्टर या अलिशान इमारतीच्या दुसऱ्या माळ्यावर डॉक्टर ब्यूक रक्स्टन देखिल यावेळी डेली हेराल्डचा ताजा अंक चाळत होते. त्यांची पत्नी व नौकराणी– मिसेस इझावेला रक्शटन आणि मिस मेरी रॉजर्सन– या दोघी गेले काही दिवस बेपत्ता होत्या. त्यांची दुसरी स्त्री नोकर त्या खोलीची साफसूफ करीत होती. तिला उद्देशून डॉक्टर रक्शटन मोठ्याने म्हणाले, 'अगं हे पाह्यलस काय आलंय ते पेपरला? पुलाखाली दोन छिन्न विच्छिन्न केलेली प्रेतं सापडली! बरं झालं त्यातला एक पुरुष आहे असं पोलीस म्हणतात. काय घावरलो होतो मी. मला वाटलं माझ्या बायकोची आणि मुलांच्या आयाची तर नसतील ना! म्हणतात ना मन चिंती ते वैरी न चिंती! एवढं बोलून डॉक्टर खूप मोठ्यानी हंसले. का कोण जाणे त्यांचं ते हसणं तिला जरी चमत्कारिक वाटलं तरी देखील हंसल्यासारखं करून मिसेस ऑक्सले नावाची ती मोलकरीण म्हणाली, 'चला! तुमचं आपलं काहीतरीच डॉक्टर.?

कोण होते हे डॉक्टर ब्यूक रक्शटन? इंग्रज? छेः छेः अगदी शंभर टक्के भारतीय. मुंबईचे. त्यांचं मूळ नाव होतं बुख्तीयार रूस्तुमजी रतनजी हकीम. मुंबई विश्वविद्यालयाचा एम्. बी. बी. एस. नंतर हा महत्त्वाकांक्षी तरुण उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेला. तिथे लंडन युनिव्हर्सिटीचा B. M. ( Bachelor of Medicine ) झाला. इंडियन मेडिकल सर्व्हीसतर्फे बसारा आणि बगदाद येथे त्यांनी उत्तम सेवा बजावली. वस्तुतः डॉ. रक्शटन आणि मिसेस रक्शटन ही लग्नाची नवराबायको नव्हतीच. तिचं मुळचं नाव होतं कुमारी इझाबेला कीर. वयाच्या अवघ्या अठराव्या वर्षी या लावण्यवतीला आपल्या सौंदर्याचे महत्व कळले होते. सौंदर्य पैशाच्या मागे आणि पैसा सौंदर्याच्या मागे हा या जगाचा नियमच आहे. ही कुमारी इझाबेला लौकरच व्हॅन एस नावाच्या धनाढ्य माणसाबरोबर हिंडू फिरू लागली आणि एकदिवशी चक्क सौ. व्हॅन एस बनली. या सुखी जीवनात देखील सौ. इझाबेला दुःखी बनली. कारण तिचे यजमान रूबाबदार आणि बुद्धीमान नव्हते. उगाच बंगल्यात बसून सबंध दिवस काय करायचं? म्हणून तिने एका उंची हॉटलात नोकरी पकडली. तिथे तिने डॉ. रक्शटनला प्रथम पाहिले आणि तिची अवस्था प्रथम तुज पाहता...! अशीच झाली. महत्वाकांक्षी, बुद्धीमान, उच्च शिक्षित, उंचा पुरा, रुबाबदार सुट टापटिपीने घालणारा हंसतमुख, बोलता बोलता चांगला विनोद करणारा, कधी कधी तिच्या सौंदर्याची स्तुती करणारा हा पुरुष तिला आवडला. दोघांनी

एकमेकांना वेड लावले. प्रेमाचे नाजुक धागे भराभर गुंफले गेले आणि उन्मादाच्या भरात एक दिवशी ती चक्क उजळ माथ्याने डॉ. रक्स्टनच्या बगल्यावर येऊन राहिली ती अखेरपर्यंत. पुढे मिस्टर व्हॅन एस ने तिच्यापासून घटस्फोट घेतला. आणि एकमेकांशी विवाहबद्ध न होताच ती दोघ नवराबायको सारखी (!) तशीच एकत्र राहू लागली. या सबधापासून त्याना तीन गोजीरवाणी मुल झाली लोक श्रीमती इझाबेलाला सौ. रक्स्टन सबोधू लागले. बुद्धीमान बाप आणि सुदर आईची मुल ती. रस्त्यातून चालताना अशी टेचात चालत की लोकाना या कुटुबाचा हेवा वाटावा.

पण खरा प्रकार तसा नव्हता. किती झालं तरी डॉ. रक्स्टन भारतीय. भारतीय माणसाने परदेशातील सुदरीबरोबर लग्न करू नये हेच उत्तम कारण इथली सस्कृतीच वेगळी. बायको म्हणजे कशी अगदी 'एकच प्याला 'मधल्या सिंधूसारखीच हवी. 'अहो ! ऐकलत का ? आपण सागत असाल तर करते, नाहीतर नाही करणार. मला काय विचारायच त्यात ?' हे इथले आदर्श प्रेमळ सवाद ! तशातच सुदर जोरू सबकी भाबी ! अशा भयकर म्हणी इथे लाल कंदीलच दाखवतात. 'वहिनी, वहिनी ' करीत आपल्या सुदर बायकोपुढे कुणी नाचायला लागला की इथला पती अस्वस्थ होतो. डॉ. रक्स्टन त्याला अपवाद नव्हता. सौ. रक्स्टनना कुणी लिफ्ट दिली की, डॉक्टरसाहेब लगेच घरी येऊन भाडण करीत. 'रस्त्यातून एवढ्या तरुण स्त्रिया चालल्या होत्या, त्यांनी तुलाच का लिफ्ट दिली ?'

'अहो ! पण ऐकून तर घ्याऽऽ!'

'पण–बीण काही नाही. पुन्हा अशी कुणाबरोबर आलीस तर थोबाड फोडून टाकीन. आपल्याकडे काय गाडी नाही ? जाताना घेऊन का नाही गेलीस ?'

एकदा सौ. इझाबेला रक्स्टनने एका पोरसवदा तरुणाच्या कमरेभोवती हात घालून, त्याचा हात हातात घेऊन, त्याच्या खाद्यावर मान टाकून, उत्तम नृत्य केले. त्या सुखाच्या क्षणी तिने डोळे मिटून घेतले. जाताना बायकोबरोबर हसतखेळत गेलेला डॉ. रक्स्टन घरी आल्यावर भडकला. त्याने बायकोच्या कानफटात दिली. तिला हा प्रकार नवीनच होता. 'त्याच्या बरोबर का नाचलीस ? माझ्यापेक्षा वयाने लहान होता म्हणून तो तुला आवडला काय ?'

'नाही ! नाही ! तस नाही. पार्टीमधे कुणी नृत्य करणार का ? अस विचारल तर नकार द्यायचा नसतो म्हणून...'

'बोलू नको जास्ती. माझ्यापुढे बायकोने जास्त बोललेल मला आवडत नाही.' सौ. रक्स्टन नाराज झाली. एकूण काय, हा इडियन डॉक्टर इंग्लडमधल्या स्त्री-पुरुष सबधाशी एकरूप होऊ शकला नव्हता तर. आपल्याकडे आपल्या बायकोला कुणी मित्र असतो, ही कल्पनाच सहन होत नाही पण इग्लडमधे असतो ! आणि या प्रकाराचा कळस झाला तो १९३५ च्या मे महिन्यात. डॉ. रक्स्टन आणि सॉलिसिटर रॉबर्ट एडमडसन या दोघाचा स्नेहसबध अनेक वर्षांचा होता. त्याच्या आई-वडिलानी या लाघवी पोरीला–सौ. रक्स्टनला एकदा सहज म्हटल, 'अग, येत जा की आमच्याकडे कधी कधी. तेवढाच विरगुळा !' आणि अक्षरश: कधी कधी सौ. रक्स्टन एडमडसन कुटुबात बसायला जाऊ लागली. थट्टा, विनोद, चमचमीत खाणं अगदी सहज होत होत. सौ. रक्स्टन आणि तरुण सॉलिसिटर रॉबर्ट एडमंडसन यांच्या मनात तसं काहीच नव्हत. अगदी त्याचे आईवडील आणि बहिणी यांच्या देखत दोघे नुसत्या गप्पा मारत असत. पण या गोष्टी डॉक्टराच्या कानावर गेल्या. एकदा सौ. रक्स्टनला एडमंडसन कुटुबातून घरी यायला उशीर झाला. त्याच अस झाल, बराच वेळ गप्पा मारून झाल्यावर सौ रक्स्टननी घड्याळ पाहिले आणि चमकून उठत ती सॉलिसिटर रॉबर्ट एडमडसनच्या बहिणीला म्हणाली, 'एऽऽऽ! जाते मी आता. ह्यांची घरी यायची वेळ झाली.'

आणि तिचे हात हातात घेऊन तिला जवळजवळ जबरदस्तीनेच खाली बसवीत रॉबर्टची बहीण म्हणाली, 'जाशील गऽऽ! तुला काय काम आहे घरी ! नवरा खोऱ्याने पैसा ओढतोय प्रत्येक कामाला दोन दोन नोकर आहेत आणि म्हणे, हे 'घरी यायची वेळ झाली असेल.' पक्की इडियन झालीस हं तू त्याच्याशी लग्न करून!' दोघीही खळखळून हसल्या आणि सौ. रक्स्टनची ही मैत्रिण तिला परत म्हणाली, 'अग ! तुला सागायला विसरलेच ! सप्टेंबरच्या ६ तारखेला आमच्या फॅमिलीची ट्रीप आहे एडिनबर्गला. तुम्ही दोघ आणि मुल पण या ना ! खूप मजा येईल.'

'सप्टेंबरला ना ! खूप वेळ आहे अजून. डॉक्टरना विचारून सागेन मी तुला. रॉबर्ट, मला जरा घरी ड्रॉप कर ना !'

...सौ. रक्स्टन घरी येण्यापूर्वी कितीतरी अगोदर डॉक्टर घरी आले होते बायको घरात नाही म्हणजे काय ! जसजसा वेळ जात गेला तसतसा डॉक्टराच्या रागाचा पारा वाढत गेला. तशातच सॉलिसिटर रॉबर्टच्या मोटारीतून तिला उतरताना त्यांनी वरून पाहिली. डॉक्टर रक्स्टनचं पित्त खवळलं !

'कुठे गेली होतीस ?'

'सॉलिसिटर एडमडसनकडे.'

'इतका वेळ ?'

'अहो, माझा मित्र आहे तो. बसले जरा वेळ !'

आता मात्र डॉक्टराचे डोकं फिरल. टेबलाच्या खणातला चाकू काढून तो तिच्या दिशेने सरकू लागला आणि किंचाळू लागला. 'मित्रऽऽऽ? बायकोला कधी मित्र असतो का ? हेच धदे करायचे असले तर मारून टाकीन तुला.'

भीतीने सौ. रक्स्टन बेडरूममधे घुसली. तिच्या सहनशक्तीचा आता अत झाला होता. बेडरूममधून तिने पोलीस स्टेशनला फोन केला. दोन मिनिटात पोलीस तिथे येऊन थडकले. त्यानी मुख्य दरवाज्याची कॉल बेल दाबली, "डॉक्टर ! दरवाजा उघडा आम्ही पोलीस आहोत !"

पोलीस म्हटल्याबरोबर डॉक्टरनी दरवाजा उघडला. हवालदारानी आत घुसून त्याच्या हातातला चाकू काढून घेतला. "काय डॉक्टर हे ! तुम्ही एवढे हुशार आणि शिकलेले. देवाच्या कृपेने पैसा खूप मिळतोय. तुम्ही अस वागायच काय ? आता आम्ही हवालदारानी या गोष्टी शिकवायच्या काय ? कुठे आहेत मिसेस ?"

डॉक्टरनी बेडरूमकडे बोट दाखविले आणि तो किंचाळत सुटला, 'हवालदार ! अहो, ती एका सॉलिसिटरला लागू आहे साली. काही शरम आहे तिला ? अशीच वागली तर मारून टाकीन एखाद्या दिवशी तिला.'



**माझं तुझ्यावर खरंच प्रेम आहे, पण कधी कधी माझा राग अनावर होतो...**

मिसेस रक्स्टन बेडरूममधून आवेगाने बाहेर आली. डॉक्टरना मिठी मारून त्यांच्या छातीवर मान घुसळत म्हणाली, 'नाही, डॉक्टर नाही. रॉबर्टचा आणि माझा तसा काही संबंध नाही. तो बिचारा आत्तासुद्धा असंच म्हणाला, 'ट्रीपला येताना डॉक्टरना घेऊन ये' आमचं 'तसं' काही असतं तर तो असं म्हणाला असता का?'

आता मात्र डॉक्टर विरघळला. तिच्या कुशीत शिरून तिच्या गोऱ्या गोऱ्या मानेची त्याने चुंबने घेतली आणि खोल आवाजात तो म्हणाला, 'इझावेला! माझं खूप खूप प्रेम आहे तुझ्यावर. मला कधी कधी काय होतं कळत नाही. एकदम राग येतो! तू माझीच आहेस ना?'

'तुझीच रे राज्याऽऽऽ तुझीच!'

दोन्ही हवालदार भुवया उंचावून एकमेकांकडे पहातच राह्यले. सौ. रक्स्टननी त्यांना सांगितले, 'हवालदार! तुम्ही आता बिनधास्त जाऊ शकता. ह्यांचं हे असंच आहे. रागावले म्हणजे एकदम रागावतात. एरव्ही मनुष्य चांगला आहे!' हवालदार परत गेले.

असाच प्रकार आणखी एकदा घडला.

...डॉक्टरांचा मूड बघून सप्टेंबरच्या ६ तारखेला सौ. रक्स्टनने डॉक्टरांना विचारले, 'अहो ऐकलत का? उद्या सकाळी एडमंडसन कुटुंब एडिनबर्गला ट्रिपला जाणार आहे. आपल्याला बोलावलंय त्यांनी. आठवण आहे ना?'

डॉक्टरांच्या भुवया आक्रसल्या!

'रॉबर्ट येणार असेल!'

'येणार आहे!'

'मला उद्या वेळ नाही. उद्या ऑपरेशन करायचंय एक!'

'मग मी जाऊ?'

'जाऽऽऽ!'

'गाडी घेऊन जाऊ?'

'तुला हवं ते कर. माझं डोकं खाऊ नको!'

डॉक्टरांची मोटर घेऊन सौ. रक्स्टन ट्रीपला गेली. डॉक्टरांच्या मोटारीत होत्या सौ. रक्स्टन, रॉबर्टची बहिण आणि आई, पुढच्या मोटारीत होते रॉबर्टचे वडील आणि रॉबर्ट. 'अडेल्फी हॉटेल' या आलीशान हॉटेलमधे हा लवाजमा उतरला.

...इकडे डॉक्टरचा आत्मा संशयीच होता. संशयात्मा विनश्यती हेच खरं. डॉक्टरनी दुसरी मोटार भाड्यानी घेतली आणि पुढच्या दोन मोटारींचा पाठलाग करीत ते अडेल्फि हॉटेलच्या लगत लपून राह्यले. रात्रीची वेळ. रॉबर्ट आणि त्याची बहीण त्यांच्या सेपरेट खोलीत बराच वेळ गप्पा मारीत होती. शेवटी रॉबर्टने खिडकी लावून घेतली. खिडकीला काचा होत्या. आतल्या बेड लॅंपमुळे काचेवर त्यांच्या प्रतिमा स्पष्ट उमटत होत्या. रॉबर्टच्या बहिणीने केस मोकळे सोडले. त्याच्या देखत फ्रॉक काढून नाईट गाऊन घातला. आणि आपल्या भावाचा मुका घेऊन त्याला मंजूळ आवाजात ती

म्हणाली, 'गुड नाईट!'

आणि डॉक्टर रक्स्टनचा गैरसमज झाला. त्याला वाटलं ही आपली बायकोच बहुतेक. तरुण बहिणीचा इंडियात कुणी मुका घेतला किंवा तिला घऊन दिला तर लोक त्याला मुका मार देतील.

. विमनस्क मनःस्थितीत डॉक्टर रॅश ड्रायव्हिंग करीत घरी परतले. ■

.. आणि तिकडे सार्जंट रॉबर्ट स्लोन कपाळाला हात लावून बसला होता. हे दोन खून केले तरी कुणी याचा अजून पत्ता लागत नव्हता. काय म्हणतील वरिष्ठ अधिकारी. कपाळाला हात लावायची पाळी आली की दैववादी मनुष्य नवी स्वप्न बघतो. प्रत्येक गुन्हेगार गुन्हा करताना एक तरी चूक करतोच. तस पोलीस खात्यात देखील बुद्धीमत्ताच नव्हे तर योगायोग आणि दैव कधी कधी हात देतात. अचानक पोलीस स्टेशनचा कारकून म्हणाला,

'साहेब! मेमो आलाय!'

'कुठून?'

'ग्लासगोहून!'

'काय म्हणतो?'

'तिथल्या 'डेली रेकॉर्ड' या दैनिकात तीन आठवड्यापूर्वी जाहिरात आली होती की कुमारी मेरी जेन रॉजर्सन नावाची मुल साभाळणारी आया अचानक नाहीशी झालेली आहे. सदरहू तरुणी लँचेस्टरमध्ये एका पारशी डॉक्टरकडे कामाला होती.'

...सार्जंट विचारात पडला. इथे कुठे आहे पारशी डॉक्टर? तरी देखील सावधगिरी म्हणून त्यानी त्याच्या फॅमिली डॉक्टरला फोन लावला.

'हॅलो? कोण डॉक्टरसाहेब का!'

'एस्, डॉक्टर स्पिकींग!'

'मी सार्जंट स्लोन बोलतोय'

'बोला साहेब!'

'इथे कुणी पारशी डॉक्टर आहे काय?',

'कामाला आहे साहेब, तुम्हाला माहीत नाही? इथला लीडींग प्रॅक्टीशनर आहे तो. डॉ. ब्युक रक्स्टन मूळचा पारशी आहे तो. बॉम्बेचा!

'थँक्स्'

टेलीफोन डिसकनेक्ट करून सार्जंटने टेलीफोन डिरेक्टरी उघडली; 'मेडिकल' या शिर्षकाखाली त्याना डॉक्टर रक्स्टनचा पत्ता मिळाला: २, डाल्टन स्क्वेअर, लँचेस्टर.

'हवालदार! जीप काढा!'

'बाहेर चाललात साहेब?'

'हाऽऽ! जायलाच पाह्यजे. गल्या जन्मी पाप केलं म्हणून आलो ना पोलीस खात्यात च्यायला अस वाटतं की कुठे तरी कारकून झालो असतो तर बर झाल असत'

'अहो, पण साहेब तुम्ही कशाला उगाच त्रास करून घेता? डॉक्टरनाच बोलवा इकडे. त्याना पोलीस स्टेशन नवीन नाही आहे?'

'म्हणजे?'

'चक्रम आहे तो डॉक्टर. दोनदा त्याच्या बायकोनी फोन केला म्हणून आपले हवालदार त्याच्या घरी जाऊन आले. गेल्या आठवड्यात इथे येऊन धमाल करून गेला. 'डेली एक्सप्रेस'चा अंक येताना घेऊन आला होता. त्या अकात त्या हरवलेल्या मेरी रॉजर्सनचा हसरा फोटो छापला होता. त्याचे पेशंट त्याला थट्टेने म्हणायला लागले 'डॉक्टर, तुम्ही तर नाही ना पळवली या सुदरीला?' तेव्हा चिडला आणि मला म्हणाला 'बघा, या असल्या जाहिरातीमुळे माझ्या प्रॅक्टीसवर परिणाम होतो. माझी बदनामी होते. तुम्ही या संपादकांना असले काही छापायची बदी करा. आता आपण कोण बंदी करणार हो! पेपरवाल्यांनी सरकारविरुद्ध काही छापलं तर बदी घालायची असते. एरव्ही कशाला!'

...डाव्या हाताचा अगठा डाव्या गालावर रोवून त्याच्या जवळचे बोट ओठावर फिरवीत सार्जंट स्लोननी विचारले 'आणखीन काही बोलला?'

'बोलला तर!' तो म्हणाला 'हा तिचा जुना फोटो आहे, ही कसली सुंदरी? माझ्याकडे नोकरीला लागली तेव्हा तिच्या खालच्या जबड्यात चार दात नव्हते! असल्या बाईला मी कशाला पळवीन?...'

सार्जंट स्लोन अचानक चमकले! खालच्या जबड्यात चार दात नव्हते? त्यांना अचानक तो भीषण प्रसग आठवला. २९ मे १९३५ ला एडिनबर्ग रोड पुलाखाली तुकडे तुकडे करून टाकलेली दोन प्रेत सापडली... दोन कवटया... एका कवटीचं तोड उघडं... खालच्या जबड्यात चार दात नव्हते...

उजव्या हातातला पोलीसी दडा डाव्या हातावर आपटीत ते आवेगाने म्हणाले

"मला गेलंच पाह्यजे..."

...इतक्यात बाहेर पुढे लालबत्ती लावलेली आलीशान गाडी सायरन देत थांबली. हवालदारांनी खडाखड सलाम ठोकले. खुद्द सार्जंट स्लोननी कडक सलाम ठोकला. हे होते डेप्युटी कमिशनर ऑफ पोलीस सी. आय. डी. जॉन थॉमस. रुबाबात आतमधे येत त्यांनी सार्जंट स्लोनना विचारले 'यस्. डिअर कुठे चाललास?'

'जरा डॉक्टर रक्स्टनकडे जाऊन येतो. त्याच्याकडे नोकरीला असलेली कुमारी मेरी रॉजर्सन बेपत्ता आहे साहेब!'

...आता मात्र डि. सी. पी. साहेब चमकले. सार्जंटच्या खाद्यावर थाप मारून ते म्हणाले, जा! जा! नाहीतर मलाच जावं लागणार होतं!

'तुम्हाला?'

'हो नाऽऽ! माझ्याकडे त्यानी अर्ज पाठवलाय की त्याची बायको सौ. इझाबेला आणि ही कुमारी रॉजर्सन दोघीही बेपत्ता आहेत आणि त्याच्यामागे सॉलिसिटर रॉबर्ट एडमडसनचाच हात असला पाह्यजे-तरी ह्याची गुप्त चौकशी व्हावी. आता जातोसच आहे तर त्याच्या बायकोची पण चौकशी कर.'

...सार्जंट स्लोनची जीप डॉक्टरांच्या बंगल्याच्या आवारात शिरली तेव्हा डॉक्टरसाहेब घरीच होते. सार्जंटला बघून तो थोडासा घाबरला. स्वतःला सावरून घेत तो म्हणाला 'या साहेब!'

'डॉक्टऽऽर! मला बघून तुम्हाला भीती वाटली?'



...आणि शोकांतिकेला सुरुवात झाली.

'अहो, सज्जन माणसंच पोलीसला घाबरतात. एरवी गुंड-मवाली तुमचे दोस्तच असतात!'

'ओ ऽऽ आय सी ऽऽ! गुड जोक! मी अशासाठी आलो होतो, की ऽऽऽ कुमारी मेरी रॉजर्सन नावाची कुणी तरुण मुलगी तुमच्याकडे नोकरीला होती?'

...आता मात्र डॉक्टर भडकला.

'काय चालवलय काय तुम्ही पोलिसवाल्यांनी? जो तो मलाच का हे विचारतो, हेच मला कळत नाही?'

'तेच मलाही कळत नाही. म्हणून तर खरं काय ते बघण्यासाठी तुमच्याकडे आलो. पण ती कुठे गेल्ये हे तरी तुम्हाला ठाऊक आहे?'

'नाही! नाही ऽऽ ना ऽऽऽ ही! मला काही ठाऊक नाही!'

'११ तारखेचा 'डेली एक्सप्रेस'चा अंक पाह्यलात का?'

'पाह्यलाय मी तो. तेव्हापासूनच तर माझी प्रॅक्टीस धोक्यात आली. आणि तुमच्यासारखे लोक उगाचच आमच्या मागे लागतात.'

उगाच या शब्दावर जोर देत सार्जंट स्लोन म्हणाले.

'आम्ही उगाच कुणाच्या मागे लागत नसतो डॉक्टर. बरं, ते जाऊ द्या, तुम्ही तिची कधी चौकशी केलीत?

'केली तर! तिच्या आई-वडिलांना भेटलो.'

'ते काय म्हणाले?'

'ते माझ्याच गळ्यात पडले. म्हणाले 'तुमच्याकडे नोकरीवर गेली ती आलीच नाही.'

'सगळ्यांनी तुमचंच नाव का घ्यावं बरं?'

'परिस्थिती बरं परिस्थिती. ती नाहिशी होण्याच्या अगोदरच माझ्या लक्षात आलं की ती प्रेग्नंट आहे!'

'तुम्हाला कसं कळलं?'

'डॉक्टर आहे मी!'

'तुम्ही तिला या बाबतीत छेडलत?'

'होय. तिनी माझ्याजवळ कबूल केलंन की ती एका लॉंड्री मालकाच्या प्रेमात पडल्ये आणि तो तिच्याशी लग्न करणार आहे...'

'पुढे?'

'पुढे काय? मी तिला पुढे विचारलं तेव्हा ती मला म्हणाली 'प्ली ऽऽ ज! डॉक्टर मला यातलं काही विचारू नका.' बायका या अशा असतात. स्वतः लफडी करतात आणि दुसऱ्याला लफड्यात आणतात.'

'अरे! बरं झालं बायकांचा विषय काढलात. तुमच्या मिसेस कुठे दिसत नाहीत?'

'ती पण त्यातलीच. मॉल्लिसिटर रॉबर्ट एडमंडसनला लागू होती ती.'

'पण आत्ता ती आहे कुठे?'

'कुठे आहे भगवंताला माहिती. ज्या दिवशी मेरी रॉजर्सन गेली, त्याचवेळी ही पण गेली. मला वाटतं त्या दोघी एकत्र रहात असतील. आणि तो रॉबर्ट त्यांना मदत करीत असेल.'

'आता घरी कामाला कोण कोण आहेत?' डॉक्टर अक्षरशः किंचाळला 'पुष्कळ आहे ऽऽत! त्यांचा काय संबंध? मला हैराण केलंत तेवढं नाही पुरलं?

'त्यांना उद्या सकाळी पोलीस स्टेशनवर पाठवून द्या!'

'आणि नाही पाठवलं तर?'

सोफ्यावरून उठत करड्या आवाजात सार्जंट स्लोन म्हणाले '... तर तुम्हाला भारी पडेल डॉक्टर !'

पोलीस स्टेशनला आल्याबरोबर त्यानी फोन लावला. तो डॉक्टर मिलरना, प्रोफेसर ऑफ फोरॅन्सिक मेडिसिन.

'हॅलो ऽऽ ? त्या दोन प्रेताची तपासणी पूर्ण झाली काय ?'

'मोठ कठीण काम आहे ! एकतर दोघांच्या अवयवाचे तुकडे एकमेकात मिसळलेले आहेत. आणि काटछाट इतकी व्यवस्थित केली की मला वाटतं हे काम कुठल्यातरी निष्णात डॉक्टरनीच केलं असलं पाह्यजे.'

सार्जंट पुन्हा एकदा चमकला. त्यानी दुसरा फोन केला.

'एडिटर, 'डेली एक्सप्रेस' प्लीज !'

'स्पीकिंग !'

'सपादक साहेब, तुमच्या ११ तारखेच्या दैनिकात कुमारी मेरी रॉजर्सन नाहीशी झाल्याची जाहिरात कुणी दिली होती ?'

'तिच्या आईनी !'

'तिला तावडतोब या पोलीस स्टेशनला पाठवा.'

'ती सापडली काय ?'

'नाही, अजून सापडली नाही, पण तिची आई इथे आली तर आम्हाला मदत होईल.'

...मातृहृदयच ते ! अवघ्या १५-२० मिनिटात मेरीची आई धापा टाकीत पोलीस स्टेसनवर आली.

'हवालदार ! बाईना घेऊन जरा आत मधे या.'

बाई आतमधे गेल्या. त्याच्या पुढे त्यानी एक खोका उघडला. आतमधे हात घालून त्यानी एक लहान मुलाचा स्वेटर बाहेर काढला.

'हा स्वेटर ओळखता ?'

'साहेबाच्या मुलाचा !'

'कोण साहेब ?'

'डॉ. रक्स्टन ! त्यांची मुल साभाळीत असे माझी मुलगी. हा स्वेटर घालून तिनी बऱ्याच वेळा त्याचा मुलगा आमच्या घरी आणला होता.'

'आणि हा ब्लाऊझ ?'

'माझ्या मुलीचा !'

'कशावरून ?'

'तिचा वाढदिवस नुकताच झाला. मी कौतुकानी तिला तो स्वत. शिवला.'

'असा ब्लाऊज बाहेर सुद्धा शिवत असतील.'

'तस कस ? ब्लाऊज काढताना आणि घालताना तिला माझी आठवण यावी म्हणून उजव्या हाताच्या काखेत मी माझ नाव विणलय.'

सार्जंटने त्या ब्लाऊजच्या उजव्या हाताच्या काखेत खालून पाह्यले आणि डोक्यावरची टोपी काढून हातात घेतली. त्याचा चेहरा गभीर बनला.

'काय झालं सार्जंट ?'

'काही नाही. मी कळवीन तुम्हाला नंतर. हवालदार ! बाईना सभाळून घरी पोचवा.'

...दुसऱ्या दिवशी सकाळी डॉक्टर रक्स्टनच्या सर्व नोकरांची स्टेटमेंटस सार्जंट स्लोनने घेतली आणि क्षणाचाही विलब न लावता त्यानी डॉक्टर रक्स्टनच्या बगल्यावर धाड मारली. तिथल्या त्याना आवश्यक त्या वस्तु-पत्रे आणि फोटो जप्त केले आणि डॉ. रक्स्टनच्या हातात हातकड्या ठोकत ते म्हणाले, 'डॉक्टर रक्स्टन, सौ. इझाबेला आणि कुमारी मेरी या दोघीचा खून केल्याबद्दल मी तुम्हाला अटक करतो आहे.'

...झाल्या प्रकारानी डॉक्टर रक्स्टन चागलाच भाबावला.

...दुसऱ्या दिवशी सकाळी 'डेली हेराल्ड' 'डेली एक्स्प्रेस' या दैनिकांचा खप दुपटीने झाला. कारण पहिल्याच पानावर हेड लाईन- अगदी आठ स्तभी मथळा होता.

'पुलाखालच्या प्रेताचे रहस्य उलगडले !'

सुप्रसिद्ध डॉक्टर रक्स्टन याना खुनाच्या वहिमावरून अटक !'

-नेता, नट, क्रिकेटियर आणि गुन्हेगार याना बघण्यासाठी लोक का गर्दी करतात हा मानसशास्त्रज्ञाचाच सशोधनाचा विषय होऊ शकेल. दुसऱ्या दिवशी मॅजिस्ट्रेट कोर्टात तोबा गर्दी झाली. ज्याना काही ठाऊक नव्हतं ते देखील त्यात सामील झाले. टाचा उचावून मान हवी तशी वळवून समोरच्या दोन व्यक्तींच्या दोन डोक्यामधून उत्सुकतेने पाहू लागले. कुजबूज, हातवारे सुरू झाले. 'कोण ?'

'डॉक्टर रक्स्टन !'

...बरोब्बर ११ वा. डॉ. रक्स्टनला मॅजिस्ट्रेट समोर उभा केला गेला. दाढी थोडीशी वाढलेली, चेहऱ्यावर थकावट, केस विस्कटलेले, नेक टाय नाही, सूट नाही, रुबाब नाही. पिंजऱ्यात सार्जंट स्लोन उभे होते. मॅजिस्ट्रेट साहेबानी रिमांड अॅप्लिकेशन वाचला.

'डबल मर्डर ?'

'यस सर !'

'काही हत्यार ?'

'अजून मिळालेल नाही.'

...इतक्यात सुदर इग्रजी शब्दांची फैर झडली, 'मिळेल कस ? - कारण वापरलेलच नाही !'...हे होते बचावाचे वकील. त्यानी आक्रमक पवित्रा घेऊन जामिनाचा अर्ज कोर्टाला दिला आणि भाषण सुरू केले 'युवर वर्शिप ! आरोपीला जामिन मिळावा अशी माझी मागणी आहे; कारण पुलाखाली जी प्रेत मिळाली ती. सौ. इझाबेला रक्स्टन आणि कुमारी मेरी रॉजर्सन यांचीच आहेत याला पुरावा नाही. आरोपी एक नामवत यशस्वी, प्रतिष्ठीत डॉक्टर आहे पोलिसांच्या लहरीखातर त्याला पोलीस कोठडीत ठेवण म्हणजे त्याची प्रॅक्टीस नाहीशी करणं, त्याला बदनाम करण असाच होईल. कदाचित असही असेल की कुमारी रॉजर्सन आणि कुणीतरी एक पुरुष याचे खून कुणीतरी केले असतील. वृत्तपत्र काय म्हणतात बघा !' 'त्या दोन प्रेतापैकी एक पुरुष व एक स्त्री असावी असे सर्वत्र बोलले जात आहे आणि पोलिसाचा त्यास दुजोरा आहे.'

...त्याना मधेच थाववीत मॅजिस्ट्रेट म्हणाले 'तुम्हाला काय म्हणायचय ते लक्षात आलय माझ्या. यस् प्रॉसिक्युटर तुम्हाला काही सागायचय ?'

...माझा या अर्जाला कसून विरोध आहे युवरवशिप. हत्यार सापडलं नाही याचा अर्थ ते वापरलेलंच नाही असं नव्हे तर ते सापडेल देखील. पुलाखाली दोन प्रेतं नक्की कुणाची मिळाली त्याचा तपास तज्ञ डॉक्टर्स करताहेत पण त्यातल्या एका प्रेताबरोबर मिळालेला ब्लाऊज कुमारी मेरी रॉजर्सनचा होता याला पुरावा आहे सौ. रक्स्टन आणि कुमारी रॉजर्सन एकाच दिवशी, अचानक आणि दोघी मिळून एकदम नाहीशा झाल्या हा काय प्रकार आहे? काय चमत्कार घडला काय? आरोपीचा गेल्या १–२ महिन्यात पोलीस स्टेशनशी सतत संपर्क आला. नामवत, प्रतिष्ठीत माणसाच्या बायका फोन करून पोलीसची मदत मागवीत नाहीत–पोलीस स्टेशनवर येऊन आरडा ओरड करीत नाहीत...'

...त्याना हाताने खाली बसवीत मॅजिस्ट्रेटसाहेबानी खाली मान घालून आरोपीचा जामिनाचा अर्ज फेटाळला. पोलीस कस्टडी.

...त्याच दिवशी रात्री ११।–२ला डॉक्टरना खास खोलीमधे खुर्चीत बसविण्यात आले. तिथले दृश्य बघूनच डॉक्टर हबकला. बडे-बडे पोलीस अधिकारी युनिफॉर्ममधे त्याच्याभोवती कोडाळ करून बसले होते. अचानक एका अधिकाऱ्याने एक पॉवरफुल बल्ब असलेला दिवा त्याच्या डोळ्यासमोर धरला आणि करड्या आवाजात हुकूम केला '१४ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर १९३५ या काळात तुम्ही काय काय हालचाली केल्यात ते सांगा.' तो प्रकाशझोत डॉक्टरच्या डोळ्याना सोसवेना, त्यांनी डोळे गपकन मिटून घेतले. ताबडतोब दुसऱ्या अधिकाऱ्याने मागून त्याच्या मानेवर जोराचा बुक्का मारला. डॉक्टरला ब्रह्मांड आठवल. त्याचे मागचे केस धरून त्याचा चेहरा दिव्याकडे वळवीत तो ओरडला 'Account your movements between 14th and 30th!' किंचाळत डॉक्टर ओरडला 'मी लिहूनच देतो. चालेल! हवालदार याला कागद आणि पेन द्या!' आता पुढचा दिवा विझला होता एक दोन मिनिट त्याच्या डोळ्या-पुढे अंधार पसरला. नंतर त्याला थोड थोड दिसू लागले. समोरचे अधिकारी दिसले. रडत रडत त्याने 'माझ्या हालचाली' (My Movements!') या शिर्षकाखाली अनेक तावच्या ताव लिहून काढले, त्यात खोडाखोड, दुरुस्त्या केल्या आणि खाली सही करून त्या पोलीस अधिकाऱ्यापुढे ठेवले. अधिकाऱ्यानी ते काळजीपूर्वक वाचले. भुवया उंचावून प्रत्येकाने त्याच्याकडे पाहिले, कुणी अधिकारी कुत्सित हसला; कुणी पाईपमधून धुराचे लोट हवेत सोडले आणि हुकूम सुटला 'हवालदार, याला बंद करा!'

...मधल्या काळात डॉक्टराकडून रिपोर्ट आला. की दोन्ही प्रेते स्त्रियाचीच आहेत.

आता जामीन मिळण्याची उरली सुरली आशा देखील मावळली होती. बिचारा डॉ. रक्स्टन आत गेला तो गेलाच.

...मॅजिस्ट्रेट कोर्टात तारखावर तारखा पडल्या आणि अखेर ही डबल मर्डर केस सेशन कमिट झाली.

२ मार्च १९३६ ला जस्टिस सिंगलटन याच्यापुढे ही केस सुनावणीसाठी आली. कोर्ट माणसांनी फुलून निघालं होत. प्रेक्षकात नामवत डॉक्टर्स, अशिक्षित गुन्हेगार, प्रतिथयश वकील, पोलीस अधिकारी, उत्सुक मध्यमवर्गीय, सरकारी अधिकाऱ्याच्या सुखवस्तू स्त्रिया, लोकप्रिय नटनट्या, वृत्तपत्राचे वार्ताहर ही सगळी मंडळी दाटीवाटीने बसली होती. आरोपीच्या पिंजऱ्यात डॉ. रक्स्टन खाली मान घालून बसला होता. लोक त्याच्याकडे बोट दाखवीत होते. त्याच्या जरा पुढे असलेला साक्षिदाराचा पिंजरा मोकळाच होता. भवितव्यता अनेक व्यक्तिच्या रूपाने त्यात प्रवेश करणार होती. त्या पिंजऱ्याजवळच वकीलाच्या रांगेत प्रथम बसले होते ते सरकारी (सरकारी म्हणजे 'राजा' तर्फे for the crown!) वकील जे सी. जॅक्सन, की ज्यानी आपल्या कुशाग्र बुद्धीमत्तेच्या जोरावर अनेकांना फासावर लटकवले होते त्याच्या उजव्या हाताला बसले होते त्याचे मदतनीस वकील डेव्हीड मॅक्सवेल, हार्टले शॉक्रॉस, मधे थोड अंतर सोडून बसले होते बचावाचे नामवत वकील नॉर्मन बर्केट आणि त्याचे मदतनीस. प्रत्येक वकीलासमोर पुस्तकाच्या थप्पी लागलेल्या. कागदाच्या चळती, कुजबुज, नजरानजर, वातावरण विचित्र बनले होते. लोक कौतुकाने आणि भयभीत उत्सुकतेने त्याच्या हालचाली न्याहाळत होते. कारण दोन्हीकडचे प्रमुख वकील नामवतच होते. हेच बचावाचे वकील पुढे सेशन्स जज्ज झाले म्हणजे अंदाज करा. सरकारतर्फे जॅक्सन आणि बचावातर्फे बर्केट म्हणजे चांगलीच जुंपणार. ज्युरीमधले ९ सभ्य गृहस्थ. हे वातावरण आता असह्य होत होते. बरोब्बर अकरा वाजता शिपायाचा आवाज आला.

'साऽयलेऽऽऽन्स!'

...त्याच्या पाठोपाठ येत होते धीर गंभीर मुद्रा असलेले न्यायमूर्ती सिंगलटन..लोक उभे राहिले आणि न्यायमूर्ती न्यायासनावर बसल्या-वर घाई घाईत खाली बसले.

न्यायमूर्ती सिंगलटन यानी स्थिर मुद्रेने आरोपी, वकीलवर्ग, ज्युरी, आणि पब्लीक, याच्याकडे एक करडी नजर टाकली. समोरच्या टेबलावरचे पेपर्स नीट चाळले आणि डाव्या हाताचा पंजा डाव्या गालावर ठेवून कोपर टेबलावर टेकवून, डोळे मोठे करीत सरकारी वकीलाकडे पहात ते म्हणाले 'यऽऽस्?'

सरकारी वकील काळा झगा फडकवीत आत्मविश्वासाने उभे राहिले आणि त्यानी केस ओपन केली. आरोपी रक्स्टनच पूर्वायुष्य कसं होतं, घटना कसकशा घडल्या, त्याच कौटुंबिक जीवन कस होत, सौ. इझाबेला रक्स्टन आणि कुमारी मेरी राजर्सन याच्या देहाचे तुकडे तुकडे किती आणि कसे पद्धतशीर केले होते, आम्ही काय पुरावा पुढे आणणार आहोत हे त्यानी थोडक्यात पण आर्जवी भाषेत सन्माननीय न्यायमूर्ती आणि ज्युरीतल्या सभ्य गृहस्थाना नीट समजावून दिले आणि सुनावणी सुरू झाली.

सरकारी वकिलानी ठरवून टाकल की प्रत्यक्ष खून सिद्ध करण्या-पूर्वी खुनाची पार्श्वभूमी सिद्ध करायची आणि सरकार पक्षाच्या पहिल्या साक्षीदार म्हणून पिंजऱ्यात प्रथम आल्या सौ. नेल्सन.– डॉ. रक्स्टनची मोठी मेव्हणी. तिने न्यायमूर्तीपुढे अदबीने मस्तक झुकवले. कोर्टातले वातावरण एकदम गंभीर बनले. लोक कान टव-कारून ऐकू लागले.

'मिसेस् नेल्सन, आरोपीला ओळखता?'

'ओळखते म्हणजे? माझ्या धाकट्या बहिणीचे मिस्टर हे!'

'कसा काय चालला होता तुमच्या या धाकट्या बहिणीचा संसार?'

'कधी कधी दोघं फार मजेत असत. कधी कधी भांडणं व्हायची!

भांडण झालं की बहिण कधी कधी माझ्याकडे येऊन राह्यची."

'भांडणाची कारणं काय असावीत बरं?'

'डॉ. रक्स्टन चिडखोर वृत्तीचा आहे. बायकोनी जरा दुरुत्तर केलन की एकदम प्रक्षुब्ध होऊन तो विसंगत आणि वाह्यात बडबड करीत असे '

" ती तुमच्याकडे रहायला आल्यावर आरोपी काय करीत असे.'

'तो अस्वस्थ होत असे आणि तीही अस्वस्थ होत असे. मी मध्यस्थी केली की दोघं परत येत असत. एक वर्षापूर्वी माझ्यामुळेच दोघ एकत्र आली.

'अलीकडच्या काळात असं कधी झालं होत?'

'९ सप्टेंबर १९३५ ला ती सबंध दिवस एडिनबर्गला माझ्याच घरी होती.'

'नवऱ्याशी भांडून आली होती?'

'नाही-नाही! ती ७ सप्टेंबरला एडमंडसन कुटुंबाबरोबर एडिनबर्गला ट्रीपला आली होती. त्यांच्याबरोबर १-२ दिवस हॉटेलमध्ये राहून जाण्यापूर्वी ती मला भेटण्यासाठी आली होती.'

'काही विशेष बोलणं झाल?'

'मला ती सांगत होती की ह्यांच्या डोक्यात आता नवीनच खूळ शिरलय, मी एडमंडसन कुटुंबात जाते-येते ते त्यांना बिलकूल सहन होत नाही. मी दिसायला सुरेख आहे आणि रॉबर्ट एडमंडसन तरुण आहे– सॉलिसिटर आहे म्हणून म्हणे मी त्याच्याशी बोलायच नाही हा कोण मेला उच्छाद! आणि पुन्हा पुन्हा तिच तिच बोलणी ऐकून घेणार कोण? मी ठरवून टाकल की ते काहीही बडबडून देत. ट्रीपला यायचच. अग, उगाचच आयुष्यातली मजा का टाळायची?'

'९ सप्टेंबर नतर पुन्हा तुमची आणि तिची केव्हा भेट झाली होती?'

मिसेस नेल्सनचे डोळे पाणावले डबडबले, 'नाही! आजपर्यंत कधीच नाही...आणि...आणि वर्तमानपत्रात जे काही आलय ते खर असेल तर ती मला पुन्हा कधीच दिसणार नाही.'

.. मिसेस नेल्सनचा या क्षणी सयम सुटला. त्याचा उरोभाग विलक्षण वेगाने वर-खाली होत होता. डोळ्यातून अश्रूपात होत होता. दोन्ही हात लाकडी पिंजऱ्याच्या कठड्यावर घट्ट रोवून त्या नाकानी श्वास आत घेत नाकपुड्या फुगवून 'सू सू' करीत दु.ख दावीत स्तब्ध उभ्या राह्यल्या.

...सरकारी वकिलाना हेच व्हायला हवं होत. भीषण नाट्यातल्या या प्रमुख नटाने चेहरा गंभीर केला. आणि सौ. नेल्सनच्या हातावर हात ठेवत, तिला धीर देत म्हणाले, 'बाई! अस कस बर करून चालेल! मी काय विचारतो त्याची फक्त उत्तरं द्यायची. असं रडायच नाही! काय वाटेल तुमच्या धाकट्या बहिणीच्या मृतात्म्याला!'

सौ. नेल्सननी स्वत.ला सावरले. डोळे पुशीत त्या म्हणाल्या, 'विचारा.'

'आता सागा की, ९ सप्टेंबर नतर काही विशेष घडल?'

'एक दिवस अचानक पोलीस आमच्या घरात घुसले. मी घाबरले. त्यानी माझ्या घराची झडती घेतली आणि आरोपीनी मला लिहिलेली पत्र पचनामा करून ते घेऊन गेले.

'अस्सं अस्सं! मग आता बघा हे पत्र तुमच्याच घरातून पोलीसांनी नेलं?'

'होय?'

'कुणी लिहिलय तुम्हाला हे?'

'आरोपीनी?'

'कशावरून?'

'त्याची सही-हस्ताक्षर ओळखते मी!'

'जरा वाचून दाखवा पाहू.'

'प्रिय, मिसेस नेल्सन,

मनाच्या अत्यत चमत्कारिक विमनस्क परिस्थितीत हे पत्र मी तुला लिहीत आहे. मला वेड लागायची पाळी आल्ये. माझी इझाबेल मला पुन्हा एकदा सोडून गेली आहे तुला आठवतय, गेल्या वर्षी अशीच मला टाकून ती सामानासकट निघून गेली होती. त्यावेळी जाताना मी एडिनला मर्फी कपनीची एजन्सी घेण्यासाठी जात्ये म्हणून सागून ती गेली होती. मला अमाप पैसा मिळत असताना तिला ह्या गोष्टी करायची जरूर आहे काय? जाताना माझ्या नकळत तिने अफाट खर्च करून त्याची बिल न भागवताच ती गेली. ती सगळी बिल हल्ली मी चुकवतो. लोक मलाच विचारणार ना! इकडे मुल आईविना पोरकी झालेली आहेत. त्याचे चेहरे मला बघवत नाहीत मलासुद्धा तिच्याशिवाय झोप येत नाही मी फक्त स्वभावानीच तापट आहे पण आतून मात्र तिच्यावर आणि तिच्यावरच माझ फार फार प्रेम आहे हे तिला कसं समजत नाही? ती मात्र अत्यत लहरी आहे एका रात्रीत कोट्याधीश होण्याची स्वप्न बघत असते ती. माझ्या माहितीप्रमाणे ती बकिंगहॅमला गेल्ये पण माझा व्यवसाय साभाळताना माझ्या नाकी नऊ येतात. त्याच्यात तिचा शोध घेत तिच्या मागे कुठे धावू? माझा उजवा हात सध्या अपघाताने कापला गेला आहे, तो दुखतोय आणि सूजही बरीच आहे. मला कळत नाही ती पुढे करणार आहे तरी काय? माझ जीवन तिच्याशिवाय अशक्य आहे. तिच्याशिवाय घराला घरपण कस येणार? मला कबूल आहे की माझा स्वभाव रागीट आहे पण प्रत्येक वेळी मला राग येईल अशी ती का वागते? पण कशीही असली तरी ती मला आवडते. ती मला हवीच! तिच्याशिवाय माझ्या जीवनाला अर्थ नाही. ती तिकडे आल्ये का? मी इथून एडिनबर्गला थोड्याच दिवसात येतो आहे. बाकी सर्व भेटी अती.

सर्वस्वी तुझाच,

७ ऑक्टोबर १९३५ डॉ. रक्स्टन

'या पत्राला तुम्ही काही उत्तर दिलत?'

'मी–नाही, माझ्या मुलानी आरोपीला कळवल की 'मिसेस रक्स्टन इथे नाहीत. त्याचा शोध घेण्यात आम्ही काही मदत करू शकू असं वाटत नाही कृपया आपण इकडे येण्याची तसदी घेऊ नका.'


'हेच का तुम्ही दिलेल पत्रोत्तर?'

सौ. नेल्सननी दुसरे पत्र हातात घेऊन पाह्यले.

'हो हेच! हे अक्षर माझ्या मुलाचच आहे.'

'द्या ती दोन्ही पत्रं कोर्टाकडे'

पृष्ठ ४६ वर



Prof. Bali

# NOW IT CAN BE TOLD

पंचवीस वर्षापूर्वी गाजलेल्या एका दुर्मिळ पुस्तकाचा अनुवाद

( हप्ता दुसरा )

## ३ : हत्याकांड

त्या दिवशी दिल्लीतील एका चित्रपटगृहात एक चित्रपट चालू होता. त्यात लाहोर शहरातील काही दृश्ये होती. माळरोड, अनारकली, निलागुंबद, ही दृश्ये येताच चित्रपटगृहातील पंजाबी लोक अत्यानंदाने टाळ्या पिटू लागले. 'तो पहा माळरोड' 'ते पहा माझे दुकान' अशा आरोळ्यांनी ते गृह दणाणून गेले. हा उत्साह ओसरल्यावर माझ्या बाजूस बसलेल्या लोकांचे अश्रूंनी ओथंबलेले चेहेरेही माझ्या दृष्टीस पडले. या लोकांच्या पिढ्यान पिढ्या तेथे जन्मल्या होत्या व मेल्या होत्या. त्याच भूमीत ते स्वत: जन्मले होते. तेथेच ते वाढले व वागडले व भाग्यास चढले. आज ती भूमी त्यांना पारखी झाली होती. स्वप्नवत झाली होती. जे शहर श्रीरामचंद्राच्या मुलाने वसविले व दि. १७ ऑगस्ट १९४७ पर्यंत जे त्यांचेच होते ते शहर आज एखाद्या अत्यंत दूरच्या परकी शहराप्रमाणे–मक्का, मदिना याप्रमाणे त्यांना परकी झाले होते. कारण तेथे आज मुस्लिमेतरांना प्रवेश नव्हता.

लाहोर शहर १९१३ सालापर्यंत शांततामय वातावरणात नांदत

होते. डप्युटी कमिशनरच्या अध्यक्षतेखाली, त्यानीच नेमलेल्या वयस्क व प्रतिष्ठित खानवहादुर व दिवाण बहादुरांकडून शहराचा कारभार चाले. म्युनसिपल कमिशनर शीख, हिंदु अथवा मुसलमान कोणीही असो; तो सामान्यत: चागला सपन्न व प्रतिष्ठित असे. त्याचे अगी जातीयतेचा अशही नसे. त्यामुळे सर्व लोक त्याचेकडे आदरानेच पहात. पहिले जागतिक युद्ध संपल्यानतर लोकांना जसजशी राजकीय दृष्टी आली व कांग्रेस कार्यक्षेत्रात उतरली, तसतसा या वातावरणात अनिष्ट असा बदल होत गेला. या सुमारास सामाजिक क्षेत्रात राजकारणाचा प्रवेश झाला. तोपर्यंत सामान्यपणे कोणत्याही कमिटीत मुसलमान अल्पसख्य असत. वर म्हटल्याप्रमाणे यात राजकारणाचे वारे शिरल्यावर गटवाजी सुरू झाली व त्याचा परिणाम एका बाजूस मुसलमान व ख्रिश्चन व दुसऱ्या बाजूस हिंदु व शीख असे दोन समबल गट पडले. अशा स्थितीत विनसरकारी असा लोकनियुक्त अध्यक्ष निवडण्याचा पहिला प्रसग आला. चौधरी शहाबुद्दीन हे मुस्लिम उमेदवार अध्यक्षपदासाठी उभे राहिले. त्यांना फक्त एक मत कमी पडत होते. त्याची भरपाई दयानद वैदिक कॉलेजचे एक प्राध्यापक लालादेवी दयाल याच्या दडपणाने डॉ. हिरालाल या हिंदु सदस्याने केली व चौधरीसाहेब निवडून आले त्यानतर कधीही हिंदु अथवा शीख माणूस अध्यक्ष होऊ शकला नाही जणू मुसलमानास अध्यक्षपदाचा ताम्रपटच दिला गेला होता. चौधरी शहाबुद्दीन यांनी निवडून आल्यावर आपले खरे स्वरूप प्रगट केले. त्यांनी सर्वत्र मुस्लिम वर्चस्व प्रस्थापित करावयास प्रारभ केला. शहराचा कारभार आता राजकीय व जातीय दृष्टीने हाकला जाऊ लागला.

या कमिटीतील डॉ. गोपीचद यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या कांग्रेस सदस्यानी माळरोडवरील सर लॉरेन्स याचा पुतळा हलविण्याचा प्रस्ताव आणला. तेव्हा आजवर अप्रत्यक्ष असलेल्या राजकारणाचा या कमिटीत प्रत्यक्ष प्रवेश झाला. या ठरावाला अर्थातच कसून विरोध झाला. परतु यापेक्षा अधिक म्हणजे प्रातिक सरकारने या घटनेपासून धडा घेऊन हिंदूना अल्पसख्य बनविण्याची योजना तातडीने हाती घेतली व मागे वर्णन केल्याप्रमाणे प्रतिशत ८६ मुसलमान लोकसंख्या असलेल्या लाहोरपासून नऊ मैलाच्या परिघातील खेडी लाहोर म्युनिसिपालिटीत लेखणीच्या एका फटकाऱ्याने समाविष्ट करून टाकली. अशा कृत्रिम रीतीने मुस्लिम वर्चस्व निर्माण करण्याच्या या सरकारी योजनेस हिंदुशिखानी कसून विरोध केला. या नव्या निवडणुकीवर त्यानी बहिष्कार टाकला. काही वेळ कांग्रसवाल्यानीही त्यांना साथ दिली. पण जेव्हा सर्वमंत्रिमंडळ स्थापन होऊन कांग्रेस पक्षीय चौधरी लहरीसिंग एक मंत्री झाले, तेव्हा कांग्रेसवाल्यानी आपले धोरण बदलले. हिंदुशिखानी बहुसख्या कोणाची हे ठरविण्यासाठी पुन्हा शिरगणती करा अथवा शिधा कार्डावरून मोजणी करा अशी सरकारकडे मागणी केली. पण सरकारने तिकडे लक्ष दिले नाही. १९४१ च्या शिरगणतीत हिंदुशिख बहुसंख्य असताही लाहोर कॉर्पोरेशनमध्ये मुसलमानांना वाजवीपेक्षा अधिक प्रतिनिधित्व देऊन, त्याना अल्पसख्य ठरविण्यात आले. असे असूनही कार्यकारी सभासदत्वाचे जागी हमखास आपलीच माणसे निवडून आणणे मुस्लिम पार्टीला कठीण जात असे. एकवेळ केवळ एका मताने सर्व गाडे उलटण्याची वेळ आली होती. पण या खेपेस चौधरी लहरीसिंग यानी डॉ हिरालाल याची भूमिका पार पाडली. या मंत्री महाशयांनी काही हरिजन सभासदाची नेमणूक केली. त्यात सुखलाल नावाच्या माणसाची नेमणूक केली. हा सुखलाल अराष्ट्रीय व मुस्लिम लीग धार्जिणा म्हणून प्रसिद्ध होता. याला वर्तमानपत्रानी विरोध केला, पण ही नेमणूक कांग्रेसमन्त्र्याने केलेली असल्यामुळे हिंदूचे प्रतिनिधित्व सागणाऱ्या कांग्रेसवाल्यानी या नेमणुकीस विरोध केला नाही त्याचा परिणाम हिंदूचे भवितव्यच कायमचे मुसलमानाच्या मुठीत आडकले व लाहोर कॉर्पोरेशन मुस्लिम लीगच्या ताब्यात जाऊन सर्व कार्यकारी सभासद त्याचेच नेमले गेले.

वर थोडक्यात वर्णिलेल्या पार्श्वभूमीवर पुढील काही महिन्यात लाहोर शहराच्या नशिबी जे वाढून ठेवले होते त्याचा अभ्यास आपणास करावयाचा आहे. या कालात नौखाली, मुबई, बिहार आणि कलकत्ता या ठिकाणी जातीय दगलीचा कहर उसळला होता. तरी पंजाबात सर्वत्र शातता नादत होती. लाहोर शहराचे वातावरण नेहमीप्रमाणेच होते. हिंदु, शीख व मुसलमान एकमेकाशी सलोख्याने व खेळीमेळीनेच वागत होते. १९४६ अखेरपर्यंत जातीय तेढीचे यत्किंचितही चिन्ह दिसत नव्हते. या प्रकरणी मी 'ट्रिब्युन' या पत्रात 'पंजाबी बैल' या शीर्षकाखाली एक लेख लिहिला होता. त्यावेळी सर्व जमातीनी त्याचे बरेच स्वागत केले. त्यातील काही उतारे देण्यासारखे आहेत.

'इंग्रजाना 'जॉनबुल' व अमेरिकनाना 'याकीज्' हे नामाभिधान मोठे भूषणास्पद म्हणून दिले जाते. आमच्या पजाब्याना पंजावेतरांनी 'बैल' हे नामाभिधान बहाल केले आहे. भरपूर खाणे, दिवसभर काम करणे, सायकाळी सहल करणे व नतर बेफिकीरपणे रवथ करीत स्वस्थ पडणे, या गुण विशेषांमुळेच त्याना हे महान् नामाभिधान प्राप्त झाले आहे. चिमण्याची चिवचिव, कावळ्याची कावकाव अथवा कुत्र्याचे भकणे याचा, भरपूर खाऊन सुखाने रवथ करीत पडलेल्या बैलावर काय परिणाम होणार?'

पजाब्याची ही वृत्ति पाहून इतर प्रातातील लोक विस्मयाने तोडात बोट घालतात. गुजराथी, बगाली, मद्रासी व कधी कधी महाराष्ट्रीय व बिहारी पुढारी या पजाबी बैलाचे शेपूट पिरगाळून, बरगड्यात ठोसे लगावून त्यास चेतविण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करीत. पण त्याचा काहीही उपयोग न झाल्यामुळे, पंजाब्यानी केलेल्या अतिथ्याची स्तुति करीत ते सतापाने निघून जात. हे खाऊन पिऊन पुष्ट व तजेलेदार असलेले पजाबी पूर्वेकडील व दक्षिणेकडील उपासमारीने रोड व वाळलेल्या बुभुक्षित मंडळीच्या डोळ्यात सलत होते. दक्षिणेकडील उंदीर, ससे, शेळ्या मेंढ्या उपासमारीने तडफडत असता या उत्तरेतील बैलाने मात्र खाऊन पिऊन तुद असावे हा काय न्याय झाला? एक गोष्ट पाहून मात्र त्याची अगदी निराशा होई या पजाबी बळूस कितीही ढोसले, कितीही पिरगाळले तरीही सतापाने वेसण तोडून — चौखूर उधळणे, अथवा समोरच्या बैलावर चाल करणे तर सोडाच पण हा अगदी साहजिक असलेली हालचालही करीत नाही. बदके, कबुतरे, करकोचे याची कोणाच्या तरी नेतृत्वाखाली सघटना असते कोणत्याही दिशस यत्किंचित आवाज झाला अथवा पखाचा फडफडाट

झाला तर सर्वच्या सर्व संघ तिकडे धावतो, नेत्या मागे जाण्याची शिस्त तेही काटेकोरपणे पाळतात. मेंढ्यासुद्धा आपल्या पुढारी मेंढीच्या मागे आंधळेपणाने जात असतात. पण बैलांचा कळप आपल्या बैल पुढाऱ्याच्या मागे जाताना कोणी पाहिला आहे काय ? बैलांना स्वत:चा पुढारी असावा अथवा स्वत: पुढारी व्हावे असे वाटतच नाही. म्हणूनच की काय पंजाबात हिंदुशिखातून अथवा मुसलमानातून देशव्यापी कीर्तिचा एकही पुढारी निघाला नाही. त्यामुळे साहजिकच या प्रांताचे नेतृत्व परप्रांताकडे गेले आहे.

निसर्ग नेहमीच उणीव भरुन काढण्याचा प्रयत्न करीत असतो. या प्रांताला स्वत:चा पुढारी नसला तरी परप्रांतातून आपली मत-प्रणाली पटविण्याच्या महत्वाकांक्षेने अनेक पुढारी नेहमी या प्रांतात येत. हा पंजाबी बैल क्षणैक उत्साहही दाखवी. पण शेवटी बैल तो बैलच ! पुढाऱ्यांची पाठ फिरली की तो आपला नेहमीचा खाणेपिणे, बागडणे व कोणत्याही कोलाहलाकडे लक्ष न देता स्वस्थपणे रवंथ करीत पडणे, हा दैनंदिन कार्यक्रम सुरू करी.

शेजारी उपासमारीने तडफडणाऱ्या प्राण्यास आपल्या अन्नातील काही भाग देण्याइतका हा पंजाबी बैल उदार आहे. पण आपणास जडलेल्या सवयी सोडण्यास मात्र तो कधीही तयार नसतो. पंजाबातून गेली चाळीस वर्षे अन्न टंचाई असलेल्या प्रांतांना अन्न, गरिबांसाठी पैसा व विशेष प्रसंगी पीडितांच्या साहाय्यासाठी स्वयंसेवक पथके परप्रांतांत गेलेली मी पाहिली आहेत. पण परप्रांतांतून मात्र अडचणीच्या वेळीही पंजाबला वरीलपैकी कोणतेही साहाय्य झाले नाही. मात्र परप्रांतीय बकवेखोरांच्या टोळ्या येथे येऊन पंजाबपासून दूर असलेल्या त्यांच्या प्रतिस्पर्धी पक्षाविरुद्ध या पंजाबी बैलांना चेतविण्याचा सारखा प्रयत्न करीत असतात.

नुकत्याच ज्या घटना घडून गेल्या त्या याच मासल्याच्या आहेत. एक गट म्हणत होता कलकत्ता व नौखालीचा बदला आपल्या शेजाऱ्यावर घ्या. नेमके हेच दुसरा गट म्हणत होता. तो म्हणे 'बिहार आणि मुंबईचा बदला घ्या.' असले लुडबुडे यावेळी या कामात अगदी गर्क होते. पूर्वी सुखवस्तु व धष्टपुष्ट पंजाबी इतरांच्या डोळ्यात सलत. आता पंजाबातील शांतता व सुव्यवस्था इतर प्रांताना खुपू लागली. देशाच्या इतर प्रांतातील प्राणी आपल्या पाशवी कृतीने ज्यावेळी एकमेकांच्या रक्ताने न्हात होते अशा वेळीही या पंजाबी बैलाने स्वच्छंदानं व सुखाने बागडावे म्हणजे काय गोष्ट आहे ? पण धन्य त्या पंजाबी बैलाची ! अशाही वातावरणात तो बैलच राहिला व त्याच्या सुखासीन सवयींनीच त्यास या प्रचारानंतरही अचल ठेवले. इतर प्रांतात भयानक घटना घडून तेथील शांतता कलंकित झाली होती. तरी पंजाबवर मात्र यावेळपावेतो तसा ठपका आला नव्हता.

पण हाय ! हाय ! तसे घटित नव्हते.

पूर्वेकडील व दक्षिणेकडील पुढारी पंजाबात अनुयायी मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते. आपआपल्या प्रांतात पुरेसे यश न आल्यामुळे, यापैकी प्रत्येकजण आपआपल्या पक्षाच्या दृष्टीकोनाप्रमाणे दक्षिणेकडील व पूर्वेकडील परिस्थितीची व तेथे घडलेल्या भयानक कृत्यांची वर्णने करून, तेथे राजकीय प्रक्षोभ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होता. अशा प्रकारे प्रतिदिनी या दणकट पंजाब्यांच्या विशाल



या नाट्यपूर्ण कृतीचा मुसलमानांनी फार बाऊ केला

तारतम्य बुद्धीवर आघातावर आघात होत होते. त्यामुळे शेवटी त्याचाही तोल गेला व शांत पंजाबी बैलाचे रूपांतर पिसाळलेल्या वळूत झाले. हा बदल एकाएकी व अवचित झाला व प्रथमच या जातीय हिंस्र पशूने रावळपिंडी परगण्यात थैमान घालून तेथील हिंदू व शिखांचे बळी घेतले. नंतर अमृतसर व लाहोरचा क्रमांक लागला. शेवटी सर्व प्रांतभरच जातीयतेचा नंगा नाच सुरू झाला. रावळपिंडी विभागातील हजारो हिंदुशीख भीतीने गर्भगळित होऊन आश्रयासाठी लाहोरला पळून आले, कित्येक हजार लाहोरमार्गे हरिद्वार, डेहेराडून व दिल्ली विभागात पळून गेले. या दुर्दैवी बांधवांच्या व्यवस्थेचे काम लाहोरच्या हिंदूंनी केले. त्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने प्रामुख्याने भाग घेतला होता. हा हिंदुशिखांवरील हल्ला ५ मार्च १९४७ रोजी सुरू झाला.

मुस्लिमलीगने दोन महिने अगोदर त्यावेळच्या युनिअनिस्ट मंत्रीमंडळाशी असहकार करुन, वरकरणी तटस्थतेचा आव आणून, अंतस्थपणे हिंदु शिखांवर पद्धतशीर आक्रमण करण्याची तयारी चालविली होती. युनिअनिस्ट मंत्रीमंडळाचे मुख्य प्रधान श्री. खिजरहयातखान यांनी आपल्या हिंदुशीख सहकाऱ्यांना न विचारताच आपल्या जागेचा राजीनामा दिला. ही आगामी प्रलयाची खूणच ठरली. मास्टर तारासिंग हे एक धोपटमार्गी गृहस्थ आहेत (होते) त्यांनी याचवेळी एक नाट्यपूर्ण कृती केली. असेंब्लीहॉलसमोर उभे राहून त्यांनी आपली तलवार म्यानाबाहेर काढली. लगेच सरदार स्वर्णसिंग व इतर शीख आमदार त्यांचे भोवती गोळा झाले व त्यांनीही त्यांचे अनुकरण केले. या गोष्टींचा मुसलमानांनी मोठा बाऊ केला.

संध्याकाळी कपूरथळा हाऊसमध्ये हिंदू व शीखांची प्रचंड सभा भरली. या सभेत काँग्रेस व शीख पुढाऱ्यांची भाषणे झाली. सभेचे काम मध्यरात्रीपर्यंत चालले होते. 'मुस्लिम लीग मुर्दाबाद' 'युनिअनिस्ट झिंदाबाद' 'अखंड हिंदुस्थान झिंदाबाद' अशा आरोळ्यात सभेचे विसर्जन झाले. दुसरे दिवशी मुस्लिमलीगने आज्ञा मोडून, बेदरकारपणे एक मिरवणूक काढली. या मिरवणूकीस पोलिसांनी मुळीच अडथळा केला नाही. या मिरवणूकीस उत्तर म्हणून कॉलेज विद्यार्थ्यांनीही संयुक्त मंत्रिमंडळास पाठिंबा देण्यासाठी त्याच

दिवशी मिरवणूक काढली. ती मात्र पोलिसांनी लाठ्यांचा वर्षाव करून, व शेवटी गोळीबार करून उधळून लावली. त्याच दिवशी प्रांताच्या या राजधानीत प्रथम रक्त सांडले. या गोळीबाराचे बळी बहुतेक हिंदू व शीख होते. पंजाबच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांना मुस्लिम लीगबद्दल जिव्हाळा वाटत होता. उलट तेथील हिंदू शीखांबद्दल ते बेदरकार होते.

रावळपिंडी विभागातील राक्षसी अत्याचारामुळे सर्वांना धक्काच बसला. दंगलग्रस्त भागास डे. इ. जनरल ऑफ पोलीस मि. स्कॉट भेट देऊन आले. त्या भागातील जाळपोळ, लुटालूट, खून इ. भीषण व राक्षसी अत्याचार पाहून त्यांचेही अंतःकरण थरारून गेले. २६ मार्च १९४७ च्या सिव्हील अ‍ॅन्ड मिलिटरी गॅझेटच्या अंकात त्यांचे खालील उद्गार प्रसिद्ध झाले आहेत. 'रावळपिंडी जिल्ह्यातील या ग्रामीण विभागात असले रानटी अत्याचार होतील हे माझ्या स्वप्नीही नव्हते. या हिडिस जातीयतेला बळी पडलेल्या निरपराध जनतेबद्दल माझा जीव कळवळला.'

स्कॉटसाहेबानी तितक्याच कठोरपणाने परिस्थितीला तोंड देण्याचा निश्चय केला होता. पण त्यावेळचे राज्ययंत्रच असे मजेदार होते की, १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत म्हणजे फाळणीच्या तारखेपर्यंत ते एकही गुन्हेगार पकडू शकले नाहीत. रावळपिंडीची ही दंगल आता मध्यवर्ती जिल्ह्यात पसरून अमृतसरला भयानक अत्याचार सुरू झाले व ते शहर अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडले. एका अमृतसर शहरात २० मार्च-पर्यंतच्या पंधरवड्यात जाळपोळ, लूट, हत्या इ. प्रकारच्या ९८४ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली होती. वित्तहानीचा अधिकृत आकडा २ कोटी २६ लाखांवर गेला होता. पंजाबात इतरत्रही हिंदु शीख रक्तबबाळ होऊन त्यांच्यापैकी हजारो सर्वस्वास मुकून त्यांची अगदी धूळधाण झाली होती.

रावळपिंडी विभागातील अल्पसंख्यांकावर मुस्लिम गुंडांनी कसकसे अत्याचार केले याचे सम्यग्दर्शन घडविणारी 'रावळपिंडी रेप' नावाची पुस्तिका प्रसिद्ध झाली आहे. प्रांतांतील इतर शहरांबद्दल अशी पुस्तिका प्रसिद्ध झालेली नसली तरी मुस्लिम गुंडांच्या अत्याचारांचे स्वरूप सर्वत्र सारखेच होते.

एप्रिल १९४७ मध्ये अल्पसंख्याकांच्या निर्वासनाला महानदीच्या लोंढ्याचे स्वरूप आले होते. तथापी गुजरात आणि झेलम या जिल्ह्यातील कॉंग्रेस पुढारी अल्पसंख्यांकाना आपल्या ठिकाणास चिकटून रहाण्याचा आदेश देत होते आणि वृत्तपत्रांच्या एका गटाने महात्मा गांधीना पंजाबला भेट देण्याची विनंती केली होती. १५ एप्रिलच्या 'ट्रिब्यून'ने या विनंतीचा उल्लेख करून खरोखरी या भेटीपासून काही लाभ होईल काय, असा प्रश्न उपस्थित केला व त्याचे उत्तर म्हणून 'ट्रिब्यून'ने लिहिले, 'या प्रश्नाचे उत्तर नौखालीचा प्रदेश उत्कृष्टपणे देऊ शकतो. महात्माजीनी या प्रदेशात संचार केला. वृत्तपत्रानी त्याचा गौरव करून हा एक ऐतिहासिक महत्त्वाचा प्रवास आहे इ. म्हणून खूप प्रचार केला. पण या संचाराचा मुसलमानांवर प्रभाव पडला काय? त्यामुळे हिंदूमध्ये विश्वास निर्माण झाला काय? नाही, हेच त्याचे स्पष्ट उत्तर आहे. मग पंजाबातील त्याच्या संचाराने काय लाभ होणार आहे?'

पोलीस आणि न्यायखाते याच्यातील शिस्त लौकरच नाहीशी होऊन पोलीसखात्यात शे. ८५ प्रमाणात असलेले मुसलमान पोलीस मुस्लिम लीग कार्यकर्त्यांच्या हातची बाहुले बनले. त्यांच्यापैकी चांगले म्हणविणारेदेखील अल्पसंख्याकांच्या रक्षणासाठी बोटदेखील उचलीनात. अधिकाऱ्याने स्वजातियांपैकी कोणास अटक करण्याची आज्ञा केली तरी तटस्थ रहात. लौकरच या तटस्थ वृत्तीचे रूपांतर दंग्या-धोप्यात व लूटमारीत प्रत्यक्ष भाग घेण्यात झाले व नंतर पश्चिम पंजाबमधील हिंदु शीख नुसत्या मुस्लिम गुंडांच्याच नव्हे तर सरकारी गणवेषधारी गुंडांच्याही अत्याचारास बळी पडू लागले. पंजाबातील हिंदु शिखांचे सर्वात मोठे हत्याकांड शेखपुरा येथे झाले. ते मुख्यत्वे-करून पोलीस व बलुची सेनेकडून आणि त्याची योजना अधिकार-पदावर असलेल्या काही व्यक्तींनीच केली होती. या हत्याकांडापूर्वी एका मंत्र्याने शेखोपुऱ्यास भेट दिली व चार दिवस आधी तेथून बाहेर जाणाऱ्या साऱ्या वाटांची पोलीस व लष्करी सैनिकांकडून नाकेबंदी करवून बाहेर पळून जाणाऱ्या हिंदुशिखांना परत गावात पिटाळून लावले. गावात दंगाधोपा नसताही भीतीग्रस्त झालेल्या अल्पसंख्याकांना निर्वासन करता येऊ म्हणून कर्फ्यू पुकारण्यात आला व अल्पसंख्याकांना आधारभूत असलेल्या, तिवाना घराण्यातील तेथील पो. सुपरिंटेंडेंटला एकाएकी बदलून, मुस्लिम पक्षपाती म्हणून प्रसिद्ध असलेला एक मिळमिळीत अँग्लो इंडियन डे. कमिशनरच्या जागी नेमला. अशा रीतीने सापळा तयार झाला होता.

या भडक्यास आटोक्यात आणण्यासाठी पंजाबचे राज्यशासन काय करीत होते? आणि कॉंग्रेस पक्षाने बनविलेले मध्यवर्ती मंत्रिमंडळ या अल्पसंख्याकांच्या रक्षणासाठी काय करीत होते? त्यांनी आपण काय करणार आहो याचे वर्णन करून धीर देणारी वक्तव्ये करण्या-पलीकडे अधिक काहीही केले नाही, असे त्यांच्या कृतीवरून म्हणता येते. हिंदु शिखांनी शिष्टमंडळे नेली, विनंत्या केल्या, निर्वाणीच्या तारा केल्या. वृत्तपत्रांनीही आपली पराकाष्ठा केली. तथापी त्यावेळी अवश्य असलेला लष्करी कायदा काही घोषित करण्यात आला नाही.

२६ मे १९४७ ला दंगे दडपून टाकण्यासाठी सैन्याचे चार विभाग म्हणजे सुमारे पाऊण लक्ष सैनिक पंजाबमध्ये पाठविण्यात आले आहेत, असे घोषित झाले. पुढे असे आढळून आले की, एक तर ही सैनिक संख्या बरीच फुगवून सांगितली होती व दुसरे यांपैकी बहुसंख्य सैन्य मध्यवर्ती मंत्रिमंडळातील लिगी मंत्र्याच्या आग्रहावरून व कॉंग्रेसी मंत्र्याच्या दुबळेपणामुळे, पश्चिम पंजाबातील दंगलग्रस्त विभागात न ठेवता ते पूर्व पंजाबात ठेवले होते.

तातडीच्या वेळी सैनिकांची पाठवणी किती द्रुतगतीने करता येते याचे प्रात्यक्षिक लाहोरला व इतर ठिकाणी करण्यात आले. पण जनतेत विश्वास उत्पन्न करण्यास त्याचा काहीही उपयोग झाला नाही. पंजाबच्या गव्हर्नरने परिस्थिती आटोक्याबाहेर जात आहे हीच गोष्ट मुळी निग्रहाने नाकारली आणि हे सहाजिकच होते कारण कोणीही सरकारी अधिकारी स्वतःचे अपयश कधीच कबूल करीत नसतो. यावेळी पंजाबातील अधिकाऱ्यांना 'जडलेल्या रोगावर उपाय करण्याऐवजी रोग होऊ न देणेच बरे' या सुंदर सिद्धांताची आठवण होऊन त्यांनी पश्चिम पंजाबातील दंगेखोर गुन्हेगारांना शासन करण्याऐवजी पूर्व पंजाबात मात्र कडक उपाययोजना केल्या. पश्चिम पंजाबातील हिंदु शिखांची आता वाताहत झालीच आहे, त्यांना

कोणतेही साह्य करण्याचा आता उपयोग नाही–जणू याच विचाराने त्यांचेकडे पूर्ण दुर्लक्ष करून पूर्व पंजाबातील मुसलमानांना मात्र संरक्षण देण्याचे आटोकाट प्रयत्न चालले होते.

जूनमध्ये सरहद्द प्रांतात हा दंगा पसरला. ३ जूनला डेरा इस्माईल खान येथे शांतपणे रहात असलेल्या हिंदु शिखांवर एकाएकी हल्ला झाला. सुमारे बाराशे घरे जाळली गेली, सोळाशे घरांची लूट झाली व दोन हजार हिंदु शिखांना जबरीने इस्लामची दीक्षा देण्यात आली. सुमारे दहा कोट रु. किमतीच्या मालमत्तेचे नुकसान झाले व अदमासे बाराशे लोक ठार मारले गेले. याच गोष्टीची आवृत्ती भावलपूर संस्थानात निघाली. या संस्थानात शहराच्या भिंतींवर पत्रके लावून 'हिंदूंनो शहर सोडून चालते व्हा, नाहीतर मारले जाल' असे बजावण्यात आले होते. अगोदरच आसपासच्या बातम्या ऐकून तेथील हिंदू भेदरून गेले होते. त्यातच हिंदूंना प्रत्यक्ष हाकून लावण्याच्या कामास जूनच्या पहिल्या आठवड्यात येथे बरप्रमाणे प्रारंभ झाला.

इकडे अगदी हिंदुस्थान सरकारला खेटून असलेल्या पंजाबातील गुरगाव जिल्ह्यात मुसलमानांतील धर्मवेड्या मेयो लोकांनी तेथील जाट हिंदूविरुद्ध युद्धच पुकारले. हे मेयो आजवर बहुसंख्येने सैन्यात भरती होत आले आहेत. त्यावेळी असा एक समज होता की डाव्या गटाचे व कम्युनिस्ट पुढारी गेले कित्येक दिवस या लोकांत आपला मत प्रचार करीत आहेत. त्यामुळे या प्रकारचा भडका तेथे उडेल असे कोणाच्या स्वप्नीही नव्हते. या दंगलीच्या भीषण व भयानक स्वरूपाबद्दल स्टेटस्‌मनचा या भागातील खास बातमीदार त्या पत्राच्या ३० मेच्या अंकात लिहितो "अलवर रोडच्यावर, गुरगाव व नब या दरम्यान तीस मैलांतील सुमारे वीस खेडी फार थोड्या वेळात उध्वस्त व बेचिराख करण्यात आली आहेत. या दंगलीत नेहमीप्रमाणे केवळ लाठ्या काठ्या, चाकू सुरे यांचाच उपयोग त्यांनी केला असे नाही. तर हे लोक लष्करी असल्यामुळे लष्करांतून चोरून आणलेल्या रायफली इ. आधुनिक शस्त्रांचाही त्यांनी उपयोग केला. काही हिंदूंजवळही रायफली होत्या. ते संख्येने थोडे होते तरी त्यांनी अशा निकराने व शौर्याने या हल्ल्यास तोंड दिले की या धर्मवेड्यांना वेढा उठवावा लागला. एका अधिकाऱ्याच्या म्हणण्याप्रमाणे या आक्रमकांनी मॉर्टरचाही उपयोग केला होता. प्रारंभी हिंदुजाट बेसावध होते. पण मागाहून त्यांनी निकराने व शौर्याने प्रतिकार केला. या दंगलीने असे उग्र स्वरुप धारण केले होते की सरकार विरुद्ध बंड पुकारल्याचाच भास होत होता. खेड्यांमागून खेड्यांना आगी लावण्यात येत होत्या. तेथील रहिवासी आश्रयार्थ इतर खेड्यात जात अथवा सडकेच्या आसपास आसरा घेत. या लोकांनी चारशे चौरस मैलातील वीस खेडी एका आठवड्यात जाळली. कमीतकमी दोनशे माणसे ठार झाली व शेकडो जखमी झाली. पंजाब विधिमंडळाचे दोन आमदार रा. ब. चौधरी सुरजमल व पंडित श्रीराम शर्मा यांनी दंगलग्रस्त भागांची पहाणी केली व पंजाब सरकारला ही नाजूक परिस्थिती शहाणपणाने हाताळता आली नाही, असा निष्कर्ष काढला. सरकारने रा. सा. मनोहरसिंग M. L. A., रा. सा. जुगल किशोर, अध्यक्ष जिल्हा शांतता समिती, रा. ब. गजराज सिंग, अध्यक्ष, जिल्हा कॉंग्रेस कमिटी, आणि पंडित हिरालाल भार्गव यांच्या सारख्या एकाच जातीच्या वजनदार पुढाऱ्यांना पकडून मूर्खपणाच



शहर सोडा नाहीतर मारले जाल...

व्यक्त केला, असेही त्यांनी आपले मत व्यक्त केले. दंगा शमविण्याच्या उपायांना जातीय स्वरुप देण्यात आले. गुरगाव जिल्हा मुस्लिमलीगने मध्यवर्ती मंत्रिमंडळातील आरोग्य मंत्री, राजा गझनफर अली यांचेकडे शिष्टमंडळ पाठवून त्यांचे साहाय्य मागितले. सरदार पटेलही दंगलग्रस्त विभागास भेट देऊन आले व परिस्थिती चिंताजनक असल्याचे त्यांना दिसून आले.

यावेळी पश्चिम पंजाब, भावलपूर संस्थान व वायव्य सरहद्द प्रांत येथे सर्वत्र बेंडाळी माजली होती. पूर्व पंजाबात मात्र फक्त गुरगाव जिल्ह्यातच या दंगलीने पेट घेतला होता. पूर्व पंजाबात आता अंतर्गत युद्धच सुरू झाले होते. तेथील हिंदुशिखांचे असहाय्यतेचे नैराश्य दिवसेंदिवस वाढतच होते. तेथील भीषण व राक्षसी अत्याचारांची कल्पना बाहेरच्या जगाला मुळीच नसल्यामुळे ते अगदी अगतिक व सर्व बाजूंनी निराश झाले होते. तेथील न्याय व इतर खाती विस्कळीत होऊन त्यात अंदाधुंदी माजून राहिली होती. जातीय द्वेषाच्या विषाने आपले काम चोरून पण चोख बजावले होते. त्यामुळे तेथील लाखो हिंदुशीख मृत्यूच्या भीषण व कराल दाढेत सापडले व बिचाऱ्यांना मृत्यूशिवाय दुसरे सांत्वनाचे स्थानच राहिले नव्हते. दि. १-६-४७ च्या 'प्रताप'ने हिंदु शिखांच्या खऱ्या भावना व्यक्त केल्या. तो म्हणतो 'ब्रिटिशांनी तावडतोब हिंदुस्थान सोडावे अशी महात्माजींची इच्छा आहे. असे करताना सामान्य माणसाचे मत त्यांनी कधी विचारात घेतले आहे काय? सामान्य माणसाला वाटते की ब्रिटिश सत्ता असतानाच जर जातीय दंगलीत इतके लोक बळी पडताहेत तर ब्रिटिश गेल्यावर या लोकांची काय दशा होईल? पश्चिम पंजाब व सरहद्द प्रांतात मिळालेल्या धड्याचा हिंदूंनी योग्य बोध घ्यावा.'

याच सुमारास १८ जूनपासून अंमलात आणावयाच्या योजना आखण्यात पंजाब सरकार मग्न झाले होते. या योजनेप्रमाणे प्रांताचे उत्तर, मध्य व पूर्व असे तीन विभाग करून प्रत्येक भाग एक एका मेजर जनरलच्या आधिपत्याखाली देण्यात यावयाचा होता. सत्तेचे हस्तांतर होताना जातीय दंगलींना पायबंद घालून शांतता राहावी म्हणून आज्ञाभंग करणाऱ्यास पूर्व सूचना न देता जागच्या जागी ठार

करण्यात यावे अशा सक्त आज्ञा पंजाबातील सर्व जिल्ह्याना देण्यात आल्या आहेत, असे राजभवनात भरलेल्या परिषदेने जाहीर केले.

इकडे पंजाब प्रांत जळत होता व गव्हर्नरसाहेब रावळपिंडी डिव्हिजनमधील निर्वासिताची पुनर्वसाहत करण्याच्या निष्फळ योजना करण्यात गुतले होते हे १ जूनच्या प्रकटनावरून दिसते. या योजना त्यानी अल्पसंख्याकाच्या पुढाऱ्याना विशेषत: पंजाब रिलीफ समिती व पंजाब सफरर्स रिलीफ समितीच्या सदस्यांना दाखविल्या त्या योजनेनुसार काही जिल्ह्यात काही केंद्रे नियुक्त करण्यात आली होती. रावळपिंडी जिल्ह्यात गुजरखान, कलूर, सुरखो आणि दौलताला, जेहेलम जिल्ह्यात सकवाल व दुधियाल, अटक जिल्ह्यात फत्तेजंग, पिंडीघे व तातागांग आणि जाद या ठिकाणी ही केंद्रे उघडण्यात आली. वास्तविक पश्चिम पंजाबातील या दंगलीचा मुळातील उद्देश तेथील हिंदुशिखाना पार हाकून लावून त्याची स्थावर व जंगम मालमत्ता गिळंकृत करण्याचा होता, हे यावेळेपावेतो गव्हर्नरांना उमगलेच नव्हते. रावळपिंडी भागात आपल्या घरी परत जाणे आता हिंदुशिखाना केवळ अशक्य होते ही गोष्ट १ जूनला रावळपिंडी जिल्हा मॅजिस्ट्रेटपुढे सरदारसिंगने इ. पि. को. ३०२, ४३६, ३९५, २९८, १४९ व १४८ या कलमाखाली महमद रावन व त्याचे ४६ साथीदार याचेवर केलेल्या एकाच फिर्यादीने सहज सिद्ध होण्यासारखी आहे. या सरदारसिंगाचे त्याच्या खेड्यात एकटे एक हिंदू घर होते. त्याच्या घरातील नऊ माणसाना वरील गुंडानी ठार करून त्याची मालमत्ता लुटली व घर जाळून टाकले. तो व त्याची वहिण कु जय-कुवर हीच काय ती जिवानिशी सुटली. त्यानाही जबरीने इस्लामी धर्माची दीक्षा देण्यात आली होती. अशा तऱ्हेच्याच अनेक वार्ता प्रत्यही येत होत्या. त्यामुळे ज्या लोकासाठी गव्हर्नरसाहेब या योजना आखीत होते तेच लोक त्यांच्याकडे तुच्छतेने पाहात होते.

याच सुमारास कॉंग्रेस मुस्लिमलीग व शीख पुढाऱ्यांच्या मान्यतेने २ जून १९४७ ची घोषणा करण्यात आली. ही घोषणा रेडिओवर करताना श्री. जीना याच्या स्वरातील विजयी आनंद कोणाच्याही लक्षात येण्यासारखा होता. त्यानी आपल्या भाषणाची सुरुवात व अखेरच मुळी 'पाकिस्तान झिंदाबाद' या घोषणेने केली. पंडित नेहरु याचा आवाज थकलेला व क्षीण होता. तो त्याची अस्वस्थ मन:स्थिती व्यक्त करीत होता. सरदार बलदेवसिंग यांचेवर या घटनेचा विशेष परिणाम व्हावयास पाहिजे होता. कारण त्याच्या प्रांताची फाळणी होणार होती. पण त्याचे भाषण भावनाशून्य झाले.

## लाहोरचा लढा सुरू झाला

या घोषणेने पंजाबातील राजकीय पक्षोपक्षातील अंतर बरेच कमी झाले. देशाची फाळणी होणे हे इष्ट की अनिष्ट हा प्रश्न आता राहिला नव्हता. तर कोणते खेडे अथवा शहर इकडे राहाणार का तिकडे जाणार हा प्रश्न सोडवावयाचा होता. रावळपिंडी, मुलतान व अंबाला येथील लोकास आपले भवितव्य स्पष्टच दिसत होते. पंजाबचे हृदय व मेंदू असलेला मध्य विभाग मात्र अनिश्चिततेत हेलकावे खात होता. तात्पुरत्या घोषणेप्रमाणे लाहोर आणि गुरुदासपूर हे जिल्हे पश्चिम पंजाबात जाऊन, अमृतसर व जालंदर जिल्हे पूर्व पंजाबात यावयाचे ठरले. आता मात्र लाहोरसाठी खरा लढा सुरू झाला. तो नुसत्या कौन्सिलातील राजकीय पक्षाच्या गोटातच नव्हे तर लाहोरच्या रस्त्यारस्त्यांतून, बोळाबोळातून हा लढा सुरू झाला. दंगली पसरू लागल्या. मनुष्याच्या जीविताला आता काही किंमतच राहिली नव्हती. हिंदुशिखानी आपआपल्या गल्यांतून प्रतिकाराची तयारी केली. लाहोर शहरातील शहालमीगेट विभाग व स्टेशनकडील कृष्ण-नगर विभाग हिंदूचे बालेकिल्ले समजण्यात येऊ लागले. मुझांग, मोची, भाटीगेट, टक्सालीगेट इ. हे मुसलमानाचे मजबूत तळ होते. येथून ते सशस्त्र होऊन टोळ्याटोळ्यानी बाहेर पडत व शहराच्या असंरक्षित रस्त्यावर आपले भक्ष्य शोधीत फिरत. या टोळ्यानी हिंदु व शीख वस्तीवर अनेकदा हल्ले केले पण ते नेहमीच फसले. जेव्हा केव्हा समोरा समोर लढण्याचा प्रसंग आला तेव्हा हिंदुशीख लढवय्ये मुसलमानापेक्षा सरसच ठरले. बेसावध माणसाच्या पाठीत सुरा खुपसणे, लपून छपून हल्ले करणे, इ प्रकारच्या मुस्लिम कौशल्यास मात्र हिंदुशिखाना तोंड देता आले नाही. बॉम्बफेकही सर्रास सुरू झाली होती. एका राक्षसी मुस्लिम मेंदूतून हिंदूच्या एका दुबळ्या मर्मावर आघात करण्याची एक आघोरी शक्कल निघाली. 'हिंदूची मालमत्ता जाळा' 'उंदराना त्याच्या बिळातच जाळा' या घोषणेने ती अमलात आली. ही मोहीम व्यवस्थित आंखण्यात आली होती. मिसरूड न फुटलेल्या पोराची या कामी योजना केली होती. आणि या 'जिहाद'मध्ये म्युनिसिपल फायर ब्रिगेडच्या पलटणीना त्याचे या वेळचे काय कर्तव्य आहे हे समजाऊन देण्यात आले होते. एक मुस्लिमलीग स्त्री कार्यकर्ती तिचा प्रेमभंग व अपेक्षाभंग झाल्यामुळे आधीच अगदी चवताळून उठली होती. तिच्या संबंधी असे सांगतात की, तिला ज्या दिवशी साऱ्या लाहोरला आग लागेल त्या दिवशी अगदी अत्यानंद होणार होता. तिने हे एका लीग बैठकीत उघड सांगितले होते. या मोहिमेत जे तंत्र वापरण्यात आले होते त्याचा उलगडा हिंदूना झाला नाही. शहराच्या निरनिराळ्या भागात इमारतीमागून इमारतीना आगी लागत होत्या. पण गुन्हेगार मात्र सापडत नव्हता. यावेळपर्यंत अनेक हिंदू व शीख घरमालक व भाडे-करू लाहोर शहर सोडून गेल्यामुळे त्याची घरे रिकामी पडली होती. त्यामुळे या गुंडाचे काम अधिकच सोपे झाले होते. दुसऱ्या कोणच्याही अत्याचारापेक्षा ही आगी लावण्याची मोहीम अधिक भयानक होती. लाहोरचे डेप्युटी कमिशनर मि. उस्टेस यांनी एक आग प्रतिबंधक जाहिरनामा काढला. त्यावरूनही या विधानास पुष्टी मिळण्यासारखी आहे. लोकानी कसे वागावे याविषयी मि. उस्टेस आपल्या जाहिर-नाम्यात म्हणतात.

१ : लोकानी आगीपासून नेहमी सावध राहावे.

२ : कोणत्याही खोडसाळ घटनेविषयी स्वत:ची खात्री होताच सरकारात कळवावे

३ : आपली तक्रार नजीकच्या पोलिस स्टेशनवर कळवावी.

४ : स्वत:च्या अथवा शेजारच्या घरास आग लागली असेल तर फायर ब्रिगेडच्या लोकावर विसंबून न राहता—कारण ते इतरत्र गुतलेले असण्याचा संभव आहे—मालमत्तेस वाचविण्याचा प्रयत्न करावा.

५ : घराच्या तळमजल्यावरच नव्हे तर सर्व मजल्यावर घरात असतील तेवढी भाडी पाण्याने भरून ठेवावी.

६ : जेव्हा पोलीस व फायर ब्रिगेडचे लोक येतील तेव्हा त्यास सर्व प्रकारचे साह्य करावे आणि आजूबाजूची परिस्थिती आटोक्यात ठेवण्याचा प्रयत्न करावा.

७ : आगविझवे व पोलीस यांना स्वतःस बचावून आग विझवि-ण्यास सोयीचे जावे म्हणून गच्ची इ. सारख्या उच ठिकाणी जावे लागते. ते अशा ठिकाणी जाताच इतरांनी तेथून ताबडतोब निघून जावे.

८ : तुमच्या आसपास कोणी दगड अथवा स्फोटक पदार्थ फेकल्यास त्याला शोधून काढण्यास पोलिसाना मदत करावी.

९ : नुकत्याच ज्या खोडसाळ घटना घडल्या त्या त्याच भागातील लोकांनी केलेल्या नसून बाहेरच्या लोकानी केल्या असाव्यात हे मानण्यास सबळ कारणे आहेत. अशा लोकास अडथळा करावा व लगेच पोलिसांत वर्दी द्यावी. वस्तीत कोणी नवखा माणूस आल्यास ताबडतोब पोलिसाना कळवावे.

१० : घरे सपूर्णपणे रिकामी केल्याने थोड्या प्रयत्नाने गुंडांना जास्त नुकसान करण्यास फावते. म्हणून स्त्रिया, मुले, सामानसुमान हलविले तरी गुडाचा बेकायदेशीर प्रवेश थाबविण्यासाठी अथवा अवश्य वाटल्यास पोलिसात वर्दी देण्यासाठी पुरुषांनी घरे सोडून जाऊ नये.

११ : अशा तऱ्हेने जनतेने सपूर्ण सहकार्य केल्यास सरकार योग्य बदोवस्त करून तिची पूर्णतया काळजी घेईल.

लाहोर कॉर्पोरेशनचे इजिनिअरही पुढे सरसावून खालील सूचना करते झाले.

१ : रस्त्यालगतच्या लाकडी बाधकामास अग्नि सरक्षक रगाने रगविण्यात यावे. असा रग खालील सोप्या रितीने तयार करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| कारबाईड वेस्टेज | १ | भाग. | हे सर्व पाण्यात कालवून त्यांचे घट्ट मिश्रण तयार करावे व लाकडाना त्याचे दोन-तीन हात द्यावेत. |
| वॉशिंग सोडा | १ | भाग. | |
| चुना | १ | भाग. | |
| मुलतानी माती | ½ | भाग. | |

२ : प्रत्येक घरात पाण्याने भरलेल्या आठ बादल्या व वाळूने भरलेल्या आठ बादल्या नेहमी तयार असाव्यात.

३ : रस्त्यालगतचा घराचा भाग रात्री अधिक प्रकाशमान राहील असा प्रयत्न करावा म्हणजे आग लावण्याचा प्रयत्न होणार नाही झालाच तर लवकर उमगेल.

## पुढाऱ्यांची आश्वासने

यावेळी लाहोरच्या शेवटच्याच असलेल्या इग्रज कमिशनरने 'लोकांनी असे करावे व तसे करावे' हे सागणे बरोबरच होते. पण लाहोरचे लोक विशेषतः हिंदुशीख 'सरकार काय करते आहे' असे विचारीत होते. शहरात काही लोक पुढाऱ्यावर विश्वासून होते. ते पुढाऱ्यानी काय करावे याविषयी सारखी चर्चा करीत होते. पुढारी आश्वासनपर धीर देणारी पत्रके काढण्यात निमग्न होते. त्याचे म्हणणे लोकानी घाबरून आपली घरे सोडून जाऊ नये. जागचे जागी राहावे. फाळणी झाली तरी लाहोर शहर हिंदुस्थानातच राहील असा हिंदुशिखाना विश्वास होता. म्हणून हल्ली चालू असलेले हाल तात्पुरते आहेत या दमावर त्याच्यातील बरेच लोक तेथे दिवस काढीत होते. १५ ऑगस्टच्या पहिल्या स्वातत्र्य दिनानतर सर्व व्यवस्थित होऊन जाईल व आज पळून जात असलेल्या भित्र्या लोकाचेच शेवटी हाल होतील असे त्याना वाटे. या विचारसरणीमुळे लाहोर शहर कोणत्या अनुक्रमाने रिकामे झाले हे खालील माहितीवरून कळून येईल प्रथम पगू, महारोगी, भिकारी इ लोकानी शहर सोडले. त्यानतर दैनदिन कष्ट करून आपली रोजी कमावणारे हमाल, मजूर, घरगुती नोकर इत्यादीनी लाहोर सोडले. त्यानतर भाड्यानी राहणाऱ्या पांढरपेशा मध्यमवर्गीयानी बाहेरचा रस्ता धरला. शेवटी ज्याची तेथे स्थावर इस्टेट होती अशाचा एक मोठा वर्ग मात्र तेथे राहिला होता. स्त्रिया व मुले आधीच बाहेर पाठविण्यात आली होती. पोलिसानी जेव्हा अल्पसख्य जमातीवरच दडपशाही करण्यास प्रारभ केला व धरपकड, विना चौकशी तुरुगात डाबणे इ. गोष्टीचा कळस झाला तेव्हा लोकांनी आपली तरुण मुलेही बाहेर रवाना करून दिली. जुलै अखेर इकडे तिकडे फक्त म्हातारी माणसेच शहरात राहिली होती. एरवी लोकानी अगदी गजबजलेले कृष्णनगर पण आता ओसाड झाले होते. त्या ठिकाणी आता फक्त म्हातारे पेन्शनर, रोगी व दुबळे लोकच आपआपल्या घरातून राहिले होते. लाहोर सोडणाऱ्या प्रत्येकाने १५ ऑगस्ट नतर येथे सर्व स्थिरस्थावर होईल व आपण पुन्हा परत येऊ अशी मनाशी खूणगाठ बाधली होती. प्रारभी हिंदुशिखानी आपली जगम मालमत्ता, पैसा अडका व इतर मूल्यवान वस्तू पश्चिम पजाबातून बाहेर हालविण्याची जोरात धडपड सुरू केली होती. पण नेमक्या याचवेळी कॉंग्रेसवाल्यानी आपल्या अगाध शहाणपणाने मुस्लिमलीगशी 'जैसेथे'चा करार करून तो प्रसिद्ध केला. या कराराने असे आश्वासन दिले होते की पाकिस्तान झाल्यावरही माणसे, मालमत्ता व द्रव्य बाहेर नेण्यास कोणतीही बधने राहणार नाहीत. जाण्यायेण्यास पासपोर्ट लागणार नाही. तसेच बँका व इतर सस्थामार्फत पैशाअडक्याचे व्यवहार हिंदपाकमध्ये पूर्ववत होत राहतील. कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या इतर कोणत्याही घोषणेने केले नाही इतके या घोषणेने हिंदुशिखाचे नुकसान केले. या घोषणेवर विश्वासून, ज्यांना दैनदिन जाळपोळ, खून व पोलिसी अत्याचार सहन होईनात ते आपली मालमत्ता मागे टाकून हिंद हद्दीत सडेच निघून आले होते. सर्व स्थिरस्थावर झाल्यावर आपण परत आपल्या घरी येऊ अथवा ते न जुळले तर प्रत्यक्ष फाळणी झाल्यावर आपली मालमत्ता कायदेशीर मार्गाने आपल्याला मिळवता येईल असा त्याना विश्वास होता.

इतक्यात पूर्व पंजाब सरकारचे म्हणून असलेले सर्व सरकारी दफ्तर सिमल्यास हालवावे अशी, मध्य सरकारची आज्ञा झाल्याची बातमी पसरली. याचा अर्थ लाहोर शहर निश्चितपणे पाकिस्तानात गेले असा अर्थ लोकानी सहजच लावला. सेक्रेटेरिएटमधील सरकारी नोकरानी घाईघाईने लाहोर सोडले. पण सर्वसामान्य जनता अजूनही स्थिरच होती. कारण याच सुमारास सरदार बलदेवसिंग याची एक मुलाखत वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली. '१५ ऑगस्ट १९४७ नंतर आपण लाहोरला जी दुसरी भेट देणार आहा ती पूर्व पजाबची राजधानी म्हणून की पाकिस्तानची राजधानी म्हणून ?' या प्रश्नास उत्तर देताना सरदारसाहेब म्हणाले, 'आमच्यापुरतेच सागावयाचे तर मी निश्चयाने आश्वासन देतो की, लाहोर शहर हिंदुस्थानातच राहील.' बिचारे हिंदु शीख ! या आश्वासनावर विसंबून आपल्या घरादारास चिकटून तेथेच राहिले.

सुरामारी व जाळपोळ चालूच होती. सरकारने मार्शल लॉ

पुकारावा असा अल्पसंख्यांकांचा आग्रहही सारखा चालू होता. पण सरदार बलदेवसिंग याच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे चालू सरकार संपूर्ण कोलमडून पडले तरच 'मार्शल लॉ 'सारखा निर्वाणीचा उपाय योजता येतो. त्यामुळे अद्याप तसा प्रसग आलेला नाही असे सरकारला वाटत होते. जीवित व वित्त यापुरतेच बोलावयाचे झाले तर यावेळी पजाबातील राज्यव्यवस्था सपूर्णपणे कोलमडून पडली होती. पण सिमल्याच्या थड हवेत बसलेल्या बलदेवसिंगांना हे खरे वाटेना. यावेळी पं. जवाहरलाल नेहरू मध्य सरकारचे उपपतप्रधान होते व काँग्रेसचे समर्थ पुरुष सरदार पटेल हेही मत्रिमडळात होते. पण हे दोघेही गव्हर्नर जनरलकडून ही मागणी मान्य करू शकले नाहीत. यासाठी शिष्टमडळानी त्याच्या भेटी घेतल्या, शेकडो तारा गेल्या, पत्रे तर हजारोनी जात होती, चेबर ऑफ कॉमर्ससारख्या सस्थानी तातडीची अनेक विनतिपत्रके पाठविली. पण या सर्वांचा सरकारवर काहीही परिणाम झाला नाही. हिंदु शिखाचे एक बेडर पुरस्कर्ते 'ट्रिब्यून' पत्राचे राणा जगबहादूरसिंग स्वतः दिल्लीस गेले व त्यानी काँग्रेसच्या मोठ्या पुढाऱ्याच्या भेटी घेतल्या व पजाबची हल्लीची परिस्थिती आटोक्यात आणण्यास लष्करी कायद्यावाचून दुसरा उपाय नाही ही गोष्ट सरकारी वरिष्ठाना पटवून देण्याचा प्रयत्न केला. भावनाविवशतेने ते असेही म्हणाले की, 'वाटल्यास स्वत: या व प्रत्यक्ष परिस्थिती पहा.' त्यांनी सागितलेला प्रत्येक शब्द या महान पुढाऱ्यानी काळजीपूर्वक ऐकला व मधूनमधून त्यानी प्रतिप्रश्नही केले व आपली स्वत.ची परिस्थिती जगबहादुरांना समजावून सागितली. त्यापैकी एकाने यावेळी दिल्लीत चाललेल्या राजकारणी वाटाघाटीतून क्षणभर अग काढून घेऊन पजाबला उडती भेट देण्याचेही आश्वासन दिले. परतु जगबहादुरानी सुचविलेल्या लष्करी कायदा पुकारण्याच्या निर्वाणीच्या उपायासबधी मात्र कोणीही आश्वासन देऊ शकले नाही. याचवेळी सरदार बलदेवसिंगानी लाहोर शहरास भेट दिली त्यानी त्यावेळचे पजाबचे गव्हर्नर H. E. सर ईव्हान जेन्किन्स याचा प्रातातील अराजक व वडाळी मोठ्या दक्षतेने व निर्धाराने मोडल्याबद्दल गौरव केला व शातता प्रस्थापित करण्यासाठी त्यानी योजलेल्या उपायाबद्दल समाधान व्यक्त केले. अशा रीतीने गव्हर्नरला प्रशस्तिपत्र देऊन सरक्षणमत्री तातडीने स्वस्थानी सिमल्यास परत निघून गेले. आपण लोकात अप्रिय होऊ नये म्हणून त्यानी छळ झालेल्या व छळ चालू असलेल्या लोकाच्या निरनिराळ्या शिष्टमडळाच्याही भेटी घेतल्या. आपल्या पराक्रमाने मुस्लिम लीगमध्ये बरीच प्रतिष्ठा पावून अगदी 'हिरो' ठरलेले लाहोरचे यावेळचे सिटी मॅजिस्ट्रेट मि. चिमा याच्या हुकुमाने पोलिसांनी काही स्त्रियाना अटकेत ठेवून अपमानित केले होते. त्याच्या शिष्टमडळाशी बोलताना सरदारसाहेब म्हणाले, 'या स्त्रियानी सागितलेली दु:खद कहाणी व अटकेत असताना त्याना मिळालेली अपमानास्पद व घृणास्पद वागणूक ऐकून मला धक्का बसला. कोणत्याही सुसस्कृत समाजात ही गोष्ट सहन केली जाणार नाही. या स्त्रियानी मॅजिस्ट्रेटविरुद्ध गभीर आरोप केले आहेत. स्त्रिया, मग त्या कोणत्याही जमातीतील असोत, त्याच्याशी नेहमी सभ्यतेचीच वागणूक असली पाहिजे. कोणत्याही सरकारच्या अधिकाऱ्यानी सभ्य स्त्रियाबद्दल अनुचित उद्गार काढणे लाच्छनास्पद आहे.' ते पुढे म्हणाले, 'या स्त्रिया साश्रुनयनानी माझ्याशी बोलत होत्या. हे अश्रू भीतीचे नसून त्यांना मिळालेल्या अपमानास्पद वागणुकीचे होते. झाली ही गोष्ट अत्यत गर्ह्य होय.'

सरदारसाहेबानी शीख नॅशनल कॉलेजच्या विद्यार्थ्यांना व प्रिन्सिपॉलला साहाय्याचे आश्वासन दिले. या कॉलेजची पोलिसानी दिवसभर झडती घेऊन, विद्यार्थ्यांना भीतीग्रस्त केले होते.

### ....तुम्हीही मरा – गांधीजी

महात्मा गाधी १९४७ च्या ३१ जुलैला रावळपिंडीमार्गे काश्मीरला जाताना लाहोर-अमृतसरवरून गेले. भारतात अतर्भूत होण्याविषयी काश्मीरच्या महाराजाचे मन वळविण्याच्या राजकीय कामगिरीवर ते गेले होते. परिवारासह महात्माजी ज्या गाडीने जात होते त्या फ्रँटियर मेलला फिलोरजवळ उडवून देण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला होता, असे १ ऑगस्टच्या स्टेट्समन पत्रात आले होते यावेळी पजाबातील दगल अगदी कळसास पोहोचली व हिंदु शीख अगदी गर्भगळित झाले होते. त्याच्या दुर्दैवाने, त्यांच्यातील काही तरुण मुलांनी अमृतसर स्टेशनवर जाऊन 'मुस्लिम गुडाच्या अत्याचारापासून आमचे रक्षण करू शकत नसाल तर परत जा' या अर्थाच्या घोषणानी महात्माजीचे स्वागत केले. 'महात्मा गाधी झिंदाबाद' याच आरोळ्यानी आजवर ज्याचे स्वागत झाले होते त्या महात्मा गांधीना साऱ्या आयुष्यात हा पहिलाच धक्का होता. त्याचा आपल्या विकारावर मोठा ताबा असे. बाह्यत त्यांनी जरी या घटनेकडे दुर्लक्ष केल्याचे दाखविले तरी माझी खात्री आहे, की त्यानी व त्याच्या चेल्यानी, झालेल्या या अपमानाबद्दल पजाब्याना क्षमा केली नाही. महात्मा गाधी हे त्यांच्या अनेक थोर सद्गुणाबरोबर असामान्य स्मरणशक्तीबद्दलही प्रसिद्ध आहेत. जे कोणी त्याच्या विरुद्ध उभे राहिले त्याचा पाडावच झाला. जोवर डॉ. खरे त्याच्याशी गुण्यागोविंदाने वागत होते तोवरच ते 'खरे' होते. त्यानी विरोधास प्रारभ करताच ते 'खारे' झाले पजाबातील त्याच्या भाषणांनी व पत्रकानी अल्पसख्याकांना मुळीच समाधान लाभले नाही. त्याच्या मते तेथील मुसलमान हे 'देवता' असून हिंदु व शीख हेच खोटया तक्रारी सांगणारे. याच स्वप्नसृष्टीत महात्माजी अद्याप वावरत होते. पजाबी हिंदु शिखाच्या मनातून ते उतरले असल्याची जाणीव त्यानाही झाली होती. पण याचा दोष स्वत कडे मुळीच नसून सर्व चूक हिंदु शिखाचीच आहे अशी त्याची खात्री होती. काश्मीरहून परत जातेवेळी ते लाहोराहून गुपचूप निघून गेले. त्याना गुप्त रीतीने शहादरा स्टेशनवर उतरवून तेथून मोगलपुऱ्यात नेण्यात आले त्यांच्या सरक्षणार्थ रेल्वेच्या दोन्ही बाजूनी विशेष दक्षता घेण्यात आली होती. मोगलपुरा स्टेशनवर त्याच्या रक्षणार्थ पोलीस व मिलिटरी असूनही शिवाय लाठीधारी काँग्रेस स्वयसेवकाचीही योजना झाली होती. लाहोर कँटोन्मेंट भागातील काही तरुणाना, एवढी गुप्तता राखली होती तरीही, या प्रयाणाचा सुगावा लागलाच व त्यानी मोगलपुरा स्टेशनवर जाऊन पूर्वीप्रमाणेच 'परत जा'च्या आरोळ्या मारण्यास आरभ केला. त्याच्यावर 'अहिंसक' काँग्रेस स्वयसेवकांनी निर्दयपणे लाठीहल्ला चढविला.

महात्माजीनी पजाबातील आपल्या थोड्या वास्तव्यात तेथील हिंदु शिखाना स्वत:ची पूर्णाहुती देण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले, 'तुम्हास जर लाहोर मेले आहे अथवा मरत आहे असे वाटत असेल

तर तुम्ही तेथेच रहा, बाहेर पळू नका. त्यांच्याबरोबर तुम्हीही मरा.' 'परोपदेशे पांडित्यं' ही म्हण महात्माजींना माहीत नसावी असे वाटते.

प्रत्येकाची ही खात्री होती की या काळी जर महात्माजी लाहोरला राहिले असते तर लाहोरची ही शोकातिका टळली असती. जरी लाहोर शहर फाळणीने पाकिस्तानात गेले असते तरीही लोक तेथेच राहिले असते. या नाजुक वेळी पजाबच्या या मध्यवर्ती ठिकाणी जर महात्माजींचे वास्तव्य झाले असते तर परिस्थिती पुष्कळच आटोक्यात राहिली असती व फाळणीपूर्वी व नतर झालेले हत्याकाडही कदाचित झाले नसते. पण हे व्हावयाचे नव्हते ! महात्माजींचा 'आतला आवाज' व लाहोरच्या अल्पसख्य हिंदुशीख जनतेने महात्माजींनी तेथे रहावे ही उत्कटत्वाने व प्रगटपणे दर्शविलेली सदिच्छा, याचा कधीच मेळ बसला नाही. असा एक मेळ बसण्याचा सुयोग काही काळानतर आला तो दिल्ली व कलकत्त्याला. तेथे अल्पसख्य होते पण ते हिंदुशीख नसून मुस्लिम होते !

## आगीच्या लोळात लाहोर

यावेळी लाहोरचे फर्स्टक्लास मॅजिस्ट्रेट मि. एम. जी. चिमा यानी हिंदुशिखावर बेसुमार अत्याचार करण्यात भरपूर दुर्लौकिक मिळवला होता. स्वतः जणू महमद गझनी व लाहोरची हिंदुशीख जनताही जणू सोमनाथाचे देवालय असे समजून त्याचा चक्काचूर करण्याचा त्यानी निर्धार केला होता. लाहोर शहरातील शहालमीगेट हिंदुशिखाचा मजबूत बाले किल्ला होता. या वस्तीतील अरुद रस्त्याच्या तोडाशी लोखडी फाटके लाऊन लिगी गुडाच्या हल्ल्यापासून स्वत चे सरक्षण त्यांनी चागल्या प्रकारे केले होते. हा बाजार अरुद असून अगदी थोडे लोक सुद्धा रस्त्याच्या दोन्ही तोडाशी निर्धाराने उभे राहून त्याचे सरक्षण करू शकत. त्यामुळे हा भाग मुसलमानाच्या डोळ्यात सारखा सलत होता. लाहोरच्या अल्पसख्याकाचा हा बालेकिल्ला फोडून त्यावर हल्ला चढविण्याचे श्रेय मि. चिमा यासच दिले पाहिजे. २१ जून १९४७ च्या मध्यरात्री मि. चिमानी या भागावर छापा घातला व घरादाराना, दुकानाना आगी लावण्याचे काम सुरू झाले. जे लोक खिडक्यातून डोकावून पाहू लागले त्याच्यावर गोळ्या चालविण्यात आल्या. जे कोणी चुकून माकून घराबाहेर आले त्याना जागच्या जागी ठार करण्यात आले, बीज पुरवठा कपनीचे इजिनिअर श्री. रामानद आपल्या तपासणीच्या कामावर फिरत असता त्याना जागच्या जागी ठार करण्यात आले. जळणाऱ्या घरात काही मुले माणसे व बायका जिवत जळून भस्मसात झाली. ती रात्र चिमासाहेबाची होती.

या प्रचड आगीने शहालमीगेट बाजारातील बरीच दुकाने व बहुतेक सर्व पेपरमडी जळून भस्मसात झाली. त्यामुळे एक कोटीच्या वर हानी झाली जे लोक आग विझवण्याचा प्रयत्न करीत त्याचेवर चिमा साहेबाच्या आज्ञेवरून त्याचे अनुचर पोलीस शिपाई गोळ्या झाडीत. हे दोन बाजार सर्व प्रकारची अन्नधान्ये, कापड व दैनंदिन आवश्यक असणाऱ्या वस्तूंच्या देवघेवीचे लाहोरातील फार मोठे केंद्र होते. येथे रोज लाखोची उलाढाल होत असे. आज त्याच बाजारात जळून भस्म झालेल्या इमारतीच्या दगडाविटाचे ढीग पडले होते. हे सर्व एका रात्रीत घडून आले. काल जे लाखाचे धनी होते ते आज भणंग भिकारी झाले होते. या आगी लावण्यापूर्वी या विभागात कर्फ्यू पुकारून ठेवला होता व सबध वस्तीच्या भोवती पोलिसांचे पहारे बसविण्यात आले होते. मॅजिस्ट्रेट आणि पोलीस यानी जाणून बुजून दुर्लक्ष केल्यावाचून या भागात गुडाना नगा नाच कसा घालता आला असता ? लोकाच्या दुर्दैवात आणखी भर घालण्यासाठी व त्याना भेडसावण्यासाठी या भागातील दीडशे लोकाना चिमाने पकडून अटकेत ठेऊन दिले व त्यातही तारतम्य असे की लोकांपैकी बहुतेक लोक आपल्या कुटुबातील एकमेव पुरुष होते. त्याच्या घराच्या झडत्या घेण्यात आल्या, तसेच आगीतून वाचलेल्या इतर घराच्याही झडत्या घेण्यात आल्या व कुलपे तोड तोडून झडतीस आलेल्या पोलिसानी हजारोची मालमत्ता लुटून नेली.

आग विझविणारे बब बऱ्याच उशीरा आले व त्यानतरही दोन तास त्याना आपले काम करता आले नाही. कॉर्पोरेशनच्या टयुबवेलच्या पपाचे फ्यूज जळून गेले होते. त्यामुळे पप बद पडला होता. तो पप एका मुस्लिम मिस्तरीच्या देखरेखीखाली होता. शेवटी कॉर्पोरेशनचे चीफ इजिनियर श्री. मगतराय तेथे आले व त्यानी फ्युज नीट करून बबाचे काम सुरू करून दिले. गवालीमडी येथील हिंदुशिखानी आपले दोन खाजगी बब सर्व साहित्यानिशी तेथे साहाय्यासाठी पाठविले. त्याचे सहाय्य घेण्याचे एकीकडेच ठेऊन तेथील मुस्लिम पोलिसांनी या बबाच्या कामकऱ्यांनाच अटकेत ठेऊन दिले. त्यावेळच्या केवळ अहिंदु असलेल्या कॉर्पोरेशनच्या आगविझव्या कामगारानी आगीवर पाण्याऐवजी पेट्रोलचा मारा केला. या गोष्टीचा पुरावा नसला तरी लोकाचा त्याचेवर तसा आरोप आहे. दुसरे दिवशी सकाळी शहालमीगेट विभागातून हिदुशिखाचा एक मोठा ताडा लाहोर सोडण्यासाठी बाहेर पडला. शिल्लक राहिलेले किडुक मिडुक बरोबर घेऊन कोणी टाग्यातून, कोणी गाडघातून, कोणी पायी, जसे ज्याला जमेल त्या मार्गाने बाहेर पडले. त्याना आपल्या जवळील तुटपुंजे द्रव्यही फार सभाळून न्यावे लागे. ठिकठिकाणच्या पोलिस चौक्या व जागोजाग भेटणारे गुड यांना काही चिरीमिरी देऊनच त्याना आपली सुटका करून घ्यावी लागे.

२० जून १९४७ ची रात्र आपल्या प्रिय शहराच्या इतिहासातील एक अत्यत करटी रात्र म्हणूनच लाहोरच्या हिंदुशिखाना आजन्म स्मरणात राहील त्या एका रात्री सरकारी निवेदनाप्रमाणे १८ खून ५५ घायाळ आणि जाळपोळीचे ४७ प्रकार यांची नोद झाली आहे. त्या एका रात्रीचे धक्का देणारे वृत्त आहे आणि याच्या पाठोपाठ दुसऱ्या दिवशी शहालमीगेटचा प्रचड अग्निप्रलय झाला. असे असूनही पजाबचे गव्हर्नर सर ईव्हान जेन्कीन्स याना लाहोर शहरास लष्करी कायदा लावण्याची आवश्यकता वाटत नव्हती. गव्हर्नर आणि व्हॉईसरॉयच्या समतीवाचून गव्हर्नराना लष्करी कायदा पुकारता येत नाही. या दोघाशिवाय लाहोरातील प्रत्येक माणसाला तेथे लष्करी कायदा पुकारण्याची आवश्यकता वाटत होती. त्या वाचून येथील दगलीचे प्रकार थांबविण्यास दुसरा कोणताही मार्ग नाही याबद्दल सर्वांची खात्री झाली होती. २३ जूनच्या आपल्या अकात 'ट्रिब्युन' ने लोकास शात रहाण्याचा व धीर न सोडण्याचा उपदेश केला होता व शहालमीगेट विभागात घडलेल्या प्रकाराची



आगीतून फुफाट्यात...

चौकशी करण्यासाठी निःपक्षपाती चौकशी समिती नेमण्याविषयी सरकारकडे मागणी केली होती. तसेच लाहोरला लष्करी कायदा लागू करावा अशीही त्याने सूचना केली होती.

शहालमीगेट मधील आगीमुळे कर्फ्यु ऑर्डरचा एक निराळाच अर्थ होऊ पहात होता. ज्या लोकांच्या घरास आगी लागल्या होत्या त्यांना कर्फ्यूमुळे रस्त्यावर येणे शक्य नव्हते. तसेच शेजाऱ्या पाजाऱ्यांनाही आगीच्या भक्ष्यस्थानी पडत असलेल्या आपल्या शेजारच्या घरातील लोकांच्या साहाय्यास जाणेही त्यामुळेच अशक्य होते. साहाय्यास धावताना सहाजिकच रस्ते ओलांडावे लागत व अशावेळी चिमा-साहेबांचे अनुचर बेगुमानपणे गोळ्या झाडीत. ह्यावेळी प्रो. राम सयाल यांचे एक पत्र 'ट्रिब्युन' मध्ये प्रसिद्ध झाले होते. त्यात हल्लीसारख्या परिस्थितीत सापडलेल्या लाहोरच्या लोकांनी कसे वागावे याबद्दल त्या दुर्दैवी लोकास कोणी मार्गदर्शन करील काय? अशी प्रार्थना करून त्यांनी पुढे विचारले होते. 'कर्फ्युचा अंमल चालू असता–

१ : त्यांनी घरात जिवंत जाळून घ्यावे काय ?

२ : बाहेर न येता घरात बसूनच आग विझवावी काय ?

३ : अथवा बाहेर येऊन आग विझविताना पोलिसांच्या गोळीस बळी पडावे अथवा अटकेत जावे ?

४ : जवळपास टेलिफोन नसता फायर ब्रिगेडच्या लोकांना सूचना कशी करावी ? व अशा स्थितीत स्वतःचे, आपल्या कुटुंबियांचे व मालमत्तेचे रक्षण कसे करावे ? शेजाऱ्यांनी काय करावे ?

५ : शेजाऱ्याची आग विझविण्यास साहाय्य करण्यासाठी बाहेर येऊन गोळीस बळी पडावे काय ? अथवा पकडले जावे काय ?

६ : का स्वतःचे घराची राख होईपर्यंत कुटुंबियांसह घरातच रहावे ?

७ : या सर्व परिस्थितीत शेजाऱ्यांना व समाजाला साहाय्य करण्याचे आपले कर्तव्य उत्तम नागरिकांनी कसे पार पाडावे ?

असे प्रश्न विचारून शेवटी या भयंकर स्थितीत लाहोरच्या या दुर्दैवी लोकांना कोणी तरुणोपाय दाखवील काय अशी इच्छा त्यांनी केली होती.

यानंतर लाहोरचे हिंदुशीख पूर्णपणे गलित धैर्य झाले. या भयानक प्रकारानंतर हजारोंच्या संख्येने रात्रंदिवस ते शहर सोडून बाहेर पळू लागले. चिमा साहेब धाडसी खरे. दुसऱ्या एका प्रसंगी चिमा साहेबांच्या हुकमाने कुचाबाबियन या गावच्या सत्तर प्रतिष्ठित नागरिकांना अटक करून स्थानबद्ध करून ठेवले होते. त्यांच्या हेबिअस कार्पसच्या अर्जाच्या सुनावणीचे वेळी हायकोर्टाने चिमा साहेबांना बोलावले होते. त्यावेळी हायकोर्ट जज्ज श्री. तेजासिंग यांना उद्देशून चिमासाहेब म्हणाले 'महाराज, आरोपीचे वकील माझी अडवणूक व दिशाभूल करीत आहेत. त्यांनीच माझ्या कामात व्यत्यय आणला आहे. न्यायालयाची बेअदबी केल्याबद्दल माझ्यावरच खटला भरला जाईल असे बार असोसिएशनच्या सदस्यांकडून मी ऐकले आहे.' वस्तुतः चिमासाहेबांचे हे वक्तव्यच कोर्टाची बेअदबी करणारे होते. पण अशारीतीने स्वतःला मुक्त करण्यासाठी उलट्या-चालीने चालून त्यांनी कोर्टाचीच दिशाभूल केली.

राजकीय पुढाऱ्यांनी पंजाबच्या बाहेर सुरक्षित ठिकाणी बसून पत्रके काढण्याचा क्रम चालू ठेवला होता. पंजाबचे हृदय असलेल्या या लाहोर शहरात प्रत्यक्ष येऊन रहाण्याचा दूरदर्शी विचार मात्र एकालाही सुचला नाही. पं. नेहरूंनी लाहोरला भेट दिली. त्या दिवशी शहरात सामान्यतः शांतता नांदत होती. चालू परिस्थिती-संबंधी जाहीर चर्चा करण्यावर यावेळी पंजाब सरकारचे नियंत्रण असताही राणा जंगबहादूरसिंग यांनी 'ट्रिब्युन'मध्ये वस्तुस्थितीचे निदर्शन करून पं. नेहरूंच्या विचारासाठी काही सूचना मांडल्या होत्या. त्यांनी गव्हर्नर साहेबास रोख ठोक विचारले, की शहरातील निरनिराळ्या भागात अनेक प्रसंगी जे लोक रस्त्यात अथवा त्यांच्या घराच्या गच्चीवर पोलिसांनी केलेल्या गोळीबाराने ठार झाले ते फार मोठ्या संख्येने दोन विशिष्ट जमातीमधीलच आहेत, ही वस्तु-स्थिती आहे. हे असे का व्हावे? या दोन जमातीतील जबाबदार व्यक्तींचा असा हा आरोप आहे की पोलीस दलातील लोक पक्षपाती असून त्यांनी या दोन जमातीतील लोकांस आत्मसंरक्षणाचे बाबतीत अडथळे केले व आग विझविण्यात अनेक अडचणी उत्पन्न केल्या ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे.

झडत्या व धरपकड उघड उघड पक्षपाताने चालू होत्या.

१५ ऑगस्ट जवळ जवळ येत होता आणि हिंदुशिखांचे तेथे रहाणे दिवसेंदिवस कठीण होत चालले होते. मुसलमानांना शीख अत्यंत अप्रिय, त्यात ते सहज ओळखले जात. त्यामुळे ते असंरक्षित दिसताच त्यांच्यावर बहुधा हल्ला केला जाई. शिकला सवरलेला पांढरपेशा हिंदु व मुसलमान रहाणीच्या सारखेपणामुळे एकमेकास सहजपणे ओळखू शकत नसे. म्हणून पुष्कळ हिंदू सहजच वाचले. त्यावेळी लाहोर शहरात असे काही भाग होते, की भर दिवसा जिवाचा धोका पत्करू-नच हिंदुशीख त्या भागात फिरकू शकत. अशाचपैकी 'किल्याचा' भाग त्यावेळी 'बारुखाना' या नावाने ओळखला जात असे. हा विख्यात मिया कुटुंबाचा बालेकिल्ला होता व त्यावेळी लोहोर कॉर्पो-रेशनचे अध्यक्षही याच कुटुंबातील एक गृहस्थ होते. हा बारुदखाना आता शहरातील मुस्लिम गुंडांचे केंद्रस्थान बनले होते. तेथे या गुंडांना अन्न फुकट वाटण्यात येई. त्यासाठी चोवीस तास भटारखाना चालू असे. हिंदु किंवा शिखांचा खून करणारास एक प्रमुख गृहस्थ रोख

बक्षिस देत असत, असे म्हणतात. प्रारंभी ही बक्षिसाची रक्कम खुनास शभर रुपये होती. मागाहून ती पन्नासवर आली. स्फोटक द्रव्ये टाकून इमारतीचे नुकसान करणारास इमारतीमागे पंचवीस रुपये दिले जात. पोलिसात नोद असलेले शहरातील प्रसिद्ध बदमाश या ठिकाणी पळून आले असता त्याना धरण्यासाठी तेथे पोलिसाचा प्रवेश होऊ शकला नाही अथवा त्यानी केला नाही. गुप्त पोलीस खात्यातील हिंदु शीख अधिकाऱ्यानी, त्यांचा वरिष्ठ आधिकारी मुसलमान असूनही, नोकरीची तमा न बाळगता, आपला जीव धोक्यात घालून, निरनिराळ्या भागातील गुंडाच्या याद्या बनविण्याचे जोखमीचे काम यशस्वीरीतीने पार पाडले. यापैकी काही गुडाना पकडण्याचे हुकूम मोठ्या नाखुषीने देण्यात आले. पण सामान्य अधिकारी तर राहोच पण यावेळचे गुप्त पोलीस खात्याचे डायरेक्टर जनरल मि. जेन्किन्स हेही बारुदखाना विभागात जाऊन धरपकड करू शकले नाहीत. दि. १९ जूनला या भागात कर्फ्यू पुकारण्यात आला होता. असे असताही बावली साहेब गुरुद्वारातून परत येणारा एक शीख तेथे भोसकला गेला. या भागात गेली वीस वर्षे मित्रत्वाने राहाणारे एक वृद्ध गृहस्थ त्याचवेळी एका सुऱ्यास बळी पडले.

फाळणीचे वेळी लाहोर शहरासाठी फार घासाघीस झाली. हिंदूचे म्हणणे श्री रामचद्राचा मुलगा लव याने वसविलेले हे शहर हिंदूकडेच राहिले पाहिजे. येथील कर तसेच जमीन महसूल प्रतिशत ८० इतका हिंदूच भरीत होते. प्रतिशत सत्तर इतका व्यापार उदीम त्यांच्याच स्वाधीन होता व प्रतिशत पच्याऐंशी स्थावराची मालकी हिंदूकडेच होती. याउलट मुसलमान १९४१ च्या धूर्तपणे केलेल्या शिरगणतीवरून या शहरावर आपला हक्क सागत होते. या शिरगणनेप्रमाणे मुसलमान प्रतिशत ५२ व हिंदूशीख ४८ होते. हे आकडे चुकीच्या आधावर घेतलेले आहेत असे हिंदू शिखाचे म्हणणे होते. रेशन कार्डाप्रमाणे मुसलमान प्रतिशत ५०·८ व मुसलमानेतर ४९·२ होते, तसेच लडनच्या एका बातमीपत्राप्रमाणे फाळणी करताना मालमत्तेच्या प्रमाणाचाही विचार होणार आहे, असे कळले होते. त्यामुळे या शहराचे दोन विभाग पाडले जाऊन, रावी नदी अथवा बारीदुवाब कालवा ही विभाग रेषा ठरेल अशी कित्येक लोकाना शक्यता वाटत होती. पाकिस्तानची राजधानी मुरी व रावळपिंडीच्या दरम्यान कोठे तरी स्थापन करण्याच्या योजना मुस्लिम लीग आखीत असल्याचे बाहेर आले होते.

अशारीतीने लडनच्या बातम्या व परिस्थिती कळसास पोहोचली असताही हिंदु शिखाना तेथेच राहाण्याचा उपदेश करण्यास न थकलेली कॉंग्रेस श्रेष्ठींची तीच ती अश्वासनपर पत्रके, यामुळे खोट्या आशेला लागून अनेक हिंदुशीख अनेक प्रकारचे हाल, मनुष्यहानी व मालमत्तेची हानी सोसून तेथेच राहिले होते. त्याचे अतस्थ मन अगदी खोलातून, एक दिवस लाहोर शहर आपल्याकडे येईल व आपण आपल्या जुलमी प्रतिपक्षीयाबरोबरचे होऊ अशी त्याना आशा दाखवीत होते. पण तो सुदिन कधीच उगवावयाचा नव्हता.

यावेळी प जवाहरलाल नेहरू आंतरराष्ट्रिय एशिअन परिषदेत, ज्या राज्यांत सर्वांना स्वातंत्र्य, समता व सर्व जातीना सधी असेल असे एक विश्वराज्य स्थापन करण्याच्या घोषणा करण्यात दग झाले होते. ज्याला स्वत.च्या देशातील एका लहानशा कोपऱ्यात समता व स्वातत्र्य प्रस्थापित करता आले नाही त्याने साऱ्या जगात ते प्रस्थापित करण्याच्या स्वप्नसृष्टीत गुग होऊन वल्गना कराव्यात, याचे सर्व बाजूनी गभीर व भयानक परिस्थितीने वेढलेल्या लाहोरच्या लोकाना हसू आल्यावाचून राहिले नाही.

लाहोरच्या जीवनात पन्नास-पन्नास साठ-साठ तासाचा कर्फ्यू आता नित्याचाच होऊन बसला होता मुस्लिमलीगच्या लढाईच्या धोरणात आता एक ठळक बदल झाला होता. सरूप्रेपेक्षा हिंदुशिखातील वेचक लोकाना ठार करणे अधिक युक्त ठरविले गेले प्रमुख हिंदुशिखांना एकटे गाठून त्याच्यावर प्राण घातक हल्ले होऊ लागले. त्याच्या हालचालीच्या बातम्या गुप्त पोलीस खात्यातील मुसलमान लोक देत, का लीगच्या हेर खात्याकडूनच त्या ठेवल्या जात हे कळले नाही. एव्हढे खरे की, वकील, डॉक्टर, पत्रकार व इतर प्रमुख लोक याचा नेमका निर्देश होई व तो टिपून मारला जाई अशारीतीने ठार झालेल्यात नमूद करण्यासारखी नावे पुष्कळच आहेत. पण त्यातल्या त्यात प्रमूख असलेल्या खालील लोकांचा दुर्दैवी हत्येत समावेश आहे.

श्री. वीरभान हे जेल रोडवर रहात असून ते उद्योगखात्याचे असि. डायरेक्टर होते त्यानी आपले सामान इतरत्र पाठविण्यासाठी दोन लॉऱ्या बोलावल्या. त्यांच्या घरच्या मुस्लिम ड्रायव्हरनेच या वहातुकीची सर्व व्यवस्था केली होती. गाडीत सामान भरण्यास हमालाच्या मिषाने त्याने मुझाग मधून मुस्लिम गुड आणले. सर्व सामान मोटारीत चढविल्यानतर त्यानी श्री. वीरभान याचेवर हल्ला करून त्यास ठार केले. व या भरलेल्या लॉऱ्या अज्ञात स्थळी पळविल्या. मोठ्या प्रसगावधानाने त्याच्या दोन कुमारी मुली मागच्या दाराने निसटल्या व मुझागच्या कबरस्थानात लपल्या व तेथून कशातरी कृष्णनगरला पोहचल्या.

'कर्मवीर' व 'सडे टाईम्स' या पत्राचे सपादक श्री अर्जुन देव याना ब्रॅड हॉल समोरच त्यांच्या घराशेजारी भोसकण्यात आले. मोची गेटच्या बाहेर बागेत डॉ. शामसुदर ठाकूर यांनाही एका मुसलमानाने भोसकले. हा मुसलमान त्याच वस्तीतील रहाणारा असून त्याची डॉ. शामसुदर याचेशी चागली ओळख होती. लाहोर हायकोर्टाचे एक प्रमुख व यशस्वी अॅडव्होकेट श्री. अर्जुन देव बागाई आपले सामान टाग्यात घालून स्टेशनवर जात असता मोची गेटच्या बाहेर त्याच्यावर प्राणघातक हल्ला झाला. ह्याच जागी कागद आणण्याकरिता 'डेली मिलाप' पत्राचे सपादक श्री. रणवीर गेले असता अशाच प्रसगातून सुदैवाने निसटले आपल्या खादीच्या मोठ्या पागोट्यामुळे मैलावरूनही ओळखू येणारे डॉ. भगतराम याच्यावर निसवत रोडवर सुरीहल्ला झाला. सुदैवाने तो प्राणघातक ठरला नाही.

प्रो. ब्रिज नारायण हे मुसलमानाचे मोठे मित्र होते. त्याचे लिखाण कॉंग्रेसच्या विरोधकातही मान्यता पावले होते. यामुळे त्यांची मनोमन खात्री होती की लाहोरच्या मुसलमानाकडून आपल्याला इजा पोहचणार नाही. जेव्हा एका मुसलमान जमावाने त्याच्या घरावर हल्ला केला तेव्हा त्याचे जवळच त्यावेळी असलेल्या प्रि. भूपालसिगानी त्याना बाहेर न जाण्याविषयी विनविले असताही, ते घराबाहेर पडून हल्ला व लुटालूट न करण्याविषयी त्या मुस्लिम गुडाची मनधरणी करू लागले. त्याबरोबर त्याचेवर सर्व बाजूनी वार पडून ते जागचे



**आणि ब्रिज नारायण यांच्यावर सपासप वार पडले...**

जागी ठार झाले. त्यांच्या मौल्यवान ग्रंथ संग्रहालयाची या गुंडानी जाळपोळ व लुटालूट करून टाकली. प्रि. भूपालसिंग मागच्या दाराने कसेबसे बाहेर पडून जिवानिशी बचावले.

लाहोर शहरातील प्रसिद्ध हिंदीभुवन पुस्तकालयाचे मालक श्री. देवचंद यांना धानीराम रोडवर भोसकून ठार करण्यात आले.

कूपर रोडवर राहणारे एक प्रसिद्ध जमीनदार श्री. बद्रीनाथ बाली नावाचे होते, ते आपल्या भागात नेहमी सार्वजनिक कामी पुढाकार घेत असत, त्यांना त्यांच्याच घरासमोर, त्यांच्याच घरात राहणाऱ्या मुस्लिम भाडेकरूने दाखविल्यावरून मुस्लिम गुंडांनी ठार केले. खेळांचे मोठे आश्रयदाते. श्री. चिरंजीतसिंग यांनी पाकिस्तानात राहणे पत्करले होते. त्यांचा त्यांच्या बंगल्यातच खून झाला. वर्तमान पत्रावर त्यावेळी कडक बंधने होती. त्यामुळे रोज मारले जात असलेल्या सर्वसाधारण लोकांची नावे प्रसिद्ध न होता फक्त पत्रकाराच्या परिचयाचे व विशेष प्रमुख असलेल्या व्यक्तींचीच नावे प्रसिद्ध होत असत. १९४७ च्या ऑगस्टच्या पहिल्या पंधरवडयात मुस्लिम लीगची जात्यंधता अगदी कळसास पोहचली होती. माझ्या बंगल्यापासून एका दगडफेकीचे अंतरावर असलेल्या सांडारोड इलेक्ट्रिक स्टेशनवर पहाऱ्यावर एक पोलिस नेमला होता. त्यास एकाएकी खून चढून तो जाणाऱ्या येणाऱ्या हिंदुशिखांवर गोळया झाडू लागला. गेले कित्येक आठवडे शेट रतनलाल यांनी पोलिस चौक्यांना अन्नधान्य व दूध फुकट पुरविले होते, त्यांच्याच बंगल्याच्या रोखाने या पोलिसाने गोळया झाडण्यास कमी केले नाही. त्याच्या त्या जुन्या बंदुकीस मी माझ्या नव्या रायफलीने सहज उत्तर देऊ शकलो असतो. परंतु आता सर्व लाहोर शहर मुसलमान पोलिस व मुस्लिमधार्जिणे गोरे अधिकारी यांच्या ताब्यात होते. अशा स्थितीत गोळीस गोळीने उत्तर देणे फार धोक्याचे ठरले असते. वस्तुत: यावेळी प्रस्थापित सरकार गुंडांचेच होते, तरीही माझे असे करणे सरकार विरूद्ध बंड ठरले असते.

दि. ११ ऑगस्ट १९४७ हा दिवस लाहोरच्या हिंदुशिखांना अत्यंत दुर्दशेचा व दुर्दैवाचा गेला. निरनिराळया खात्यातील हिंदुशीख नोकर, तसेच खाजगी संस्था व पेढयांचे नोकर लाहोर सोडून भराभर बाहेर जात होते. दिवसें दिवस हिंदुशिखांची संख्या झपाटयाने कमी होत होती. दि. ११ ऑगस्ट व नंतरच्या तीन दिवस सर्वत्र भयाने अगदी थैमान घातले होते. रावळपिंडीकडून हिंदुशिखांनी भरून येणारी सिंध एक्सप्रेस जाणून बूजून बदामीबाग व लाहोर यांच्यामध्ये सायडिंगला घेऊन काही कारण नसता तिच्या मुसलमान ड्रायव्हरने ती थांबविली. पण कारण लवकरच उमगून आले. चवताळलेल्या एका मुस्लिम जमावाने या गाडीस वेढा दिला व विशिष्ट खूण होताच गाडीत घुसून आतील स्त्री-पुरुष व मुले, खाटिक खान्यात गुरे कापतात त्याप्रमाणे कापून काढली. रक्ताचे पाट वाहू लागले. लष्करातून C. M. A. च्या कारकून लोकांना ने-आण करणारी एक 'बाबूट्रेन' जात असे. मुख्य स्टेशनच्या बाहेरच्या सिग्नल जवळ तिच्यावरही असाच एक भयंकर हल्ला झाला. यापूर्वी २३ जुलै ला वर्कशॉप मध्ये काम करणारांची एक गाडी जात असता मुसलमान कामगारांनी हिंदुशीख कामगारांवर हल्ला करून काहींना जखमी व काहींना ठार केले. सुमारे नव्वद लोक रुग्णालयात दाखल झाले होते. त्यातून किती जिवंत परत आले याचा कोणालाच पत्ता लागला नाही. स्टेशनकडे जाणारे सर्व रस्ते हिंदुशिखांच्या प्रेतांनी व मरणाच्या पंथास लागलेल्या माणसांनी विखुरले होते. मेयो रुग्णालयात किती प्रेते आणली जावी याला काही सुमारच राहिला नव्हता. एकीकडे नीला गुंबद मशीदी पासून तो दुसरीकडे आनारकलीतील घनीराम रस्त्यापर्यंत सर्वत्र सडलेल्या प्रेतांची घाण येत होती. मेलेले व मरणोन्मुख यांचा एकत्रच ढीग घालण्यांत आला होता. मेयो रुग्णालयात हिंदुशिखांना अगदी जुजबी साहाय्य केले जाई खरे म्हणजे तेथे कोणाला पाठविणे म्हणजे परलोकालाच पाठविण्यासारखेच होते. लाहोरच्या मेडिकल कॉलेजचे हिंदू शिख विद्यार्थी व त्यांचे अध्यापक यांनी कधीच लाहोर शहर सोडले होते. ज्या पवित्र धंद्यात उच्च व नि:पक्षपाती माणुसकीची अपेक्षा असते त्या धंद्यातील मेयो रुग्णालयाच्या लोकांनी या दुर्दैवी दिवसात माणुसकीस काळीमा फासणारी जी कृत्ये केली त्यास अन्यत्र तोड सापडणार नाही. या या दिवसात पुष्कळसे टांगेवाले छुप्पे सुरेबाज बनले होते. त्यामुळे टांग्यात जाणेही धोक्याचे होते. सैनिकी संरक्षणाखाली जा-ये करणाऱ्या बसेसच काय त्या सुरक्षितपणे निसटण्यास उपयोगी होत्या. त्यांच्या दरातही भरमसाट काळाबाजार झाला होता.

हिंदु शिखांचा बालेकिल्ला असलेले कृष्णनगर आता रिकामे होऊ लागले. बायकामुलांबरोबर तरुण माणसे आधीच बाहेर गेली होती. आता वृद्धही बाहेर पडू लागले. जातेवेळी नाइलाजाने मोकाट सोडून दिलेल्या जनावरांची स्थिती मोठी केविलवाणी झाली होती. शेकडो रुपये किंमतीच्या गाई, म्हशी मुसलमान माणूस कवडीलाही विकत घेईना. पण कसाईखाना जवळच होता आणि बऱ्याचशा मोकाट जनावरांना शेवटी तेथेच आश्रय मिळाला.

१४ ऑगस्ट १९४७ हा दिवस भारताला फार आनंदाचा होता. परंतु पश्चिम पंजाब व लाहोर येथील हिंदु शिखांना तोच दिवस मृत्यूचा व विनाशाचा होता.

प्रो. आर. आर. शेट्टी, मदनलाल, मी व माझी मुले एवढीच काय ती संडा विभागात राहिलो होतो. आमच्या डाव्या बाजूस असलेले

कृष्णनगर व उजव्या बाजूस असलेले राजगड या विभागातील हिंदु शीख वस्ती नाहीशी झाली होती. १४ ऑगस्ट व नंतर येणारी भयानक रात्र, या दोन दिवसात घडलेल्या घटनांनी माझ्यावर झालेल्या प्रतिक्रियेची माझ्या डायरीत नोद आहे. ह्या नोदी एखाद्या पुस्तकात जरी तुटक विस्कळित दिसल्या तरी त्यावरून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यदिनाचे दिवशी लाहोर शहराची काय स्थिती होती याचे हुबेहूब चित्र वाचकाच्या डोळ्यापुढे उभे राहील.

# ४ : लाहोर येथील पहिला स्वातंत्र्यदिन

तो १५ ऑगस्ट १९४७ चा दिवस होता. हिंदुस्थानच्या अधीर झालेल्या पुढाऱ्याना, उदार इंग्रजानी सत्ता दान करण्याचा हा दिवस ठरविला होता. शक्य तो लौकर हिंदुस्थान सोडण्याचा इग्रजाचा विचार होता. पण काँग्रेस व लीग पुढाऱ्यानी एकमताने काही काल थाबण्याचा जर त्यांना आग्रह केला तर थावण्याचीही त्याची तयारी होती. हा इग्रजाचा विचार ऐकून येथील पुढाऱ्याना आश्चर्य वाटले. या देवदूताना सैतानी ब्रिटिश सरकारचा हा डाव अडचणीत पाडणारा होता. पण ब्रिटिशांच्या या सत्तांतराच्या घोषणेतील सर्व खाचाखोचा लक्षात घेऊनही या पुढाऱ्यांच्या तोडास पाणी सुटले. मनसोक्त मेजवान्या झोडण्याची चित्रे त्याच्या डोळ्यासमोर नाचत होती. जो दिवस, सत्ता, मानसन्मान, उदार देणग्या जाहीर करण्याचा अधिकार त्याना हस्तगत करून देणार होता, तो दिवस लावणीवर टाकणे त्यांना केवळ अशक्य होते. दोन्ही जमातीच्या पुढाऱ्यानी सत्तातर लावणीवर न टाकता ते शक्य तो लौकर करण्याची ब्रिटिशाना विनती केली.

. पधरा ऑगस्ट १९४८ हा दिवस सत्तातरास चालेल काय ?

: आतापासून पंधरा महिन्यांनी ? छे, छे, ते शक्य नाही.

: बरय बुवा, ३१ डिसेंबर १९४७ हा दिवस ठरवू या. एवढी तरी मुदत द्या. म्हणजे फाळणीने या देशाची होणारी शस्त्रक्रिया थोडचा सावकाशीने व व्यवस्थित होईल व दुखणाईत झालेला देश सुधारता येईल.

: जळोत तुमच्या त्या सबबी, आमच्याजवळ का डॉक्टर्स व नर्सेस नाहीत ?

झाले ! फासा फेकला गेला. दोन सख्ख्या भावात लहानशा मालमत्तेची व्यवस्थित वाटणी करण्यास जितका वेळ लागतो, त्याहीपेक्षा कमी वेळात दोन मोठ्या प्रांताची फाळणी व हिंदुस्थानसारख्या खडप्राय देशाचे देवघेवीचे व मालमत्तेचे व्यवहार उरकण्याचा प्रयत्न करण्यात आला.

शेवटी तो दिवस उजाडला ! दिल्ली व इतर प्रांताची प्रमुख शहरे उत्साहाने व आनंदाने बहरून गेली. ज्यावेळी पंजाबमध्ये रक्ताचे पाट वाहत होते व आगीचे डोब उसळत होते. त्यावेळी पूर्वपंजाबच्या कांग्रेस सत्ताधाऱ्यानी, त्याच्या वरिष्ठ सूत्रधाराच्या आज्ञेने, या दिनानिमित्त पंजाबमध्ये झेंडावदन, रोषणाई व मेजवान्या असा कार्यक्रम आखला होता. पूर्वपंजाब सरकारातील श्री. गोपीचंद भार्गव व सरदार स्वर्णसिंग याना हे कार्यक्रम करण्यात आपण आपल्या प्रांताशी प्रतारणा करीत असल्याची जाणीव झाल्यावाचून राहिली नाही.

ऑगस्ट महिन्यात मी लाहोरलाच होतो. रक्तपात, लुटालुट व जाळपोळी यानी शहरात नुसते थैमान घातले होते. या अत्याचारास बळी पडणारे लोक पूर्वी दोन्ही जमातीतील असत. पण आता मात्र फक्त हिंदू व शीख बळी पडू लागले. लुटालूट, खून आणि जाळपोळ ही आता एकतर्फीच सुरू झाली. कॉर्पोरेशनच्या एका प्रसिद्ध मुसलमान सभासदाने हिंदू शिखाना ठार मारणारी एक सघटनाच निर्माण केली होती आणि या सभासदापेक्षाही प्रसिद्ध असलेल्या लीगच्या एका स्त्री सभासदाने कट्टर व गावी बदमाषाची एक टोळी उभी करून तिच्याकडे हिंदुशिखाच्या मालमत्तेस आगी लावण्याचे काम दिले होते. प्रेम व महत्वाकाक्षा यांचा चक्काचूर झाल्यामुळे ही स्त्री बेभान झाली होती बेभान व बेफाम झालेली स्त्री फार भयकर असते. म्हणूनच एकनिष्ठपणे आगी लावण्याचे काम करणाऱ्या या बदमाषाची ती एकमेव सूत्रधार बनली होती.

सध्याकाळ हळू हळू होत होती. मी रेडिओजवळ जाऊन दिल्ली स्टेशन लावले. लालकिल्ल्याजवळ लाखानी जमलेल्या जनसंमर्दाचा उत्साह स्पष्टपणे ऐकू येत होता. बातम्या प्रक्षेपित करणारा स्वातत्र्य दिनाच्या सोहळ्याचे धावते समीक्षण करीत होता. हिंदुस्थानचा स्वातत्र्यदिन साजरा होत होता. अलोट गर्दीने शिस्तीच्या मर्यादाचे उल्लघन केले व शिस्तीची जागा उत्साहाने घेतली होती. व्हाईसरॉयचे शरीर सरक्षक त्याच्यापासून वेगळे पडले. छाया चित्रणास सहज सोयीचे होईल अशा व्यासपीठावर जाताना पडित जवाहरलाल नेहरू व व्हाईसरॉय लॉर्ड माउट बॅटन याना फार कष्टाने मार्ग काढावा लागला. एकाएकी प्रक्षेपित करणाऱ्याने आपल्या सुदर आवाजात सागितले 'पहा, आकाश मेघानी भरून आले आहे. आता पाऊस पडेल असे वाटते—झिमझिम सुरूही झाली—पाऊस पण सुरू झाला. अहाहा ! स्वातत्र्यदिनाच्या दिवशी केवढे हे शुभ लक्षण ! अरे ! आता पाऊस थावलाही' आणि काही मिनिटानतर त्याने आपल्या विजयी आवाजात पुन्हा बोलावयास सुरुवात केली. 'ओहो हो ! पहा आकाशात इद्रधनुष्यही दिसू लागले. सप्तरगी इद्रधनुष्य काय सुंदर दिसते आहे ! अति सुदर, अति शुभ !' मी असे काही रेडिओवर ऐकतो आहे तोच माझ्या घरापासून सरासरी पन्नास गजांच्या अतरावर साडा रोड चौकात एक गोळी झाडल्याचा आवाज झाला. इलेक्ट्रिक सब-स्टेशनवर नेमलेल्या राखीव पोलिसदलातील शिपायाने एका गरीब हिंदू वाटसरूवर ही गोळी झाडली होती. लोहारी गेटच्या बाजूस आकाशात धुराचा प्रचंड लोळ उठलेलाही दिसू लागला व मागोमाग आगीच्या प्रचड ज्वाळा दिसू लागल्या. त्याच्या थोडे डावीकडे, गुरूदत्त भवनच्या बाजूस असाच एक आगीचा लोळ आकाशात जात होता. या दोन्ही अग्निज्वाळाच्या सयोगाने आकाशात एक अग्निधनुष्य निर्माण झाले होते. इतक्यात बातमी आली, की लाहोरच्या हिंदूचे अत्यत पवित्र शितला मदिर भस्मसात झाले आहे. अजूनही दिल्ली रेडिओवरून बातम्या प्रक्षेपित करणारा आपल्या सुदर आवाजात सागतच होता 'अहाहा ! किती

शुभ, किती सुंदर हे इंद्रधनुष्य !' आता हा आवाज गोड वाटेनासा झाला. त्याचे निवेदन कर्णकटु वाटू लागले. आपआपल्या गच्चीवरून लाहोरचे हे अग्निधनुष्य पाहणारास तो आवाज चिडवितच होता. दिल्ली येथे जमले'या अलोट जनसमुदायाच्या ओठावर 'आझादी आझादी' हा जयघोष होता तर लाहोर येथील हिंदुशिखाच्या मुखांतून 'बर्बादि, बर्बादि' असा आर्त स्वर निघत होता.

स्वातत्र्यदिनाच्या सोहळ्यानतरची दुसरी रात्र लाहोरच्या हिंदु शिखाना अत्यत भयानक गेली. रात्री सुमारे दहा वाजता मुझागच्या एका कोपऱ्यातून 'अल्ला हो अकबर'च्या आरोळ्यानी आकाश निनादून गेले. अर्ध्या तासानंतर रायफली झाडण्याचे आवाज ऐकू येऊ लागले. हा गोळीबार सतत एक तास चालला होता. नतर आवाज थोडा थंडावला. मधूनमधून 'अल्ला हो अकबर'च्या आरोळ्या उठतच होत्या. 'पाकिस्तान झिंदाबाद', 'हिंदुस्थान मुर्दाबाद' या घोषणाही होत होत्या. या आरोळ्या जसजशा कृष्ण-नगरकडे येऊ लागल्या तसतशी माझी अस्वस्थता वाढू लागली. आम्ही आमच्या घराची मोर्चेबंदी केली व धिटाईने मृत्यूला तोड देण्यास सिद्ध झालो. इतक्यात या आरोळ्या दूर दूर जात असल्याचे ऐकू आले व शेवटी त्या आरोळ्या मुझागच्या उत्तरेकडील कोपऱ्यातून ऐकू येऊ लागल्या.

लाहोरला ती रात्र नरकयातनाची होती. ती रात्र नेहमीसारखी रात्र नसून ते एक भीषण स्वप्न होते. त्या रात्री आम्ही किती थोडक्यात बचावलो हे आम्हास दुसऱ्या दिवशी सकाळी एका मुसलमान मित्राकडून समजले. त्या रात्री मुझाग येथील शिखाच्या सहाव्या गुरूच्या पवित्र स्मरणार्थ उभारलेल्या चेव्हन बादशाही गुरुद्वारास गुडांनी वेढा दिला व आतील अकरा सेवेकरी व एक स्त्री यांचे बेगुमानपणे तुकडे केले. हे कृष्णकृत्य सपल्यावर पोलिसानी हवेत गोळीबार सुरू केला. या गोळीबारात एकही गुड मेला नाही, की जखमी झाला नाही. नंतर या गुडाचा जमाव सनातन धर्म कॉलेज चौकात आला. तेथे कोणीतरी बेगमरोडवरील हिंदु घरे लुटण्याची कल्पना पुढे माडली व जमाव तिकडे वळला. यावरून आम्ही कसे वाचलो याची कल्पना येईल. त्या रात्री मुझांग भागात हिंदु शिखाची किती हत्या झाली हे कदाचित कधीच समजणार नाही.

दिल्लीवासियांना अर्थातच ही रात्र स्वर्गीय गेली असेल. फळे, पेये, निरनिराळ्या मिठाया भरपूर खाऊन ते झोपी गेले असतील व झोपेत त्याना मनोहर स्वप्ने पडली असतील. त्याच्यापैकी काही लोक आपणास मिळालेल्या सत्तेचा, आठवड्याने, महिन्याने अथवा पुढच्या एक दोन महिन्यात, आपल्या नातेवाईकास, आपल्या मित्रास, अथवा आपल्या जातीच्या कोणास कसा उपयोग करून देता येईल याचा झोपेतही विचार करीत असतील. पंजाबमध्ये अशातता आहे, हे थोड्या लोकांनी पाहिले होते व बऱ्याच जणांनी ऐकले होते. सबंध हिंदुस्थानच्या स्वातत्र्याचा विचार करता एवढ्याशा पंजाबमधील अशाततेकडे कोणी लक्ष का द्यावे ? उत्तर प्रदेश, बिहार, आसाम, ओरिसा, मध्यप्रदेश, मद्रास, मुबई, गुजराथ, राजपुताना, अजमेर, दिल्ली, मारवाड हे सुरक्षित व स्वतंत्र झाले नव्हते काय ? हिंदुस्थानच्या लोकसख्येपैकी केवळ शेकडा तीन इतकीच लोकसख्या काय ती यातनेत होती. शेकडा ९७ स्वतत्र झाले होते. चंद्रगुप्त मौर्य, अशोक, अकबर, औरंगजेब यांच्या साम्राज्यापेक्षा मोठे असे एकजिनसी साम्राज्य आमच्या पुढाऱ्याच्या संपूर्णपणे ताब्यात आले होते. अशा रीतीने एवढ्या मोठ्या साम्राज्यास मिळणाऱ्या स्वातंत्र्यास य:कश्चित पजाबी, बगाली, सिंधी, अथवा सरहद्दी यांना कोणी आड येऊ दिले असते ?

त्यानतर दोन स्वातत्र्यदिन आले व गेले. राज्यकर्त्यांनी हे स्वातत्र्यदिन मोठ्या उत्साहाने सर्व देशभर साजरे करण्याच्या आज्ञा दिल्या. परतु सर्वस्वास मुकलेले पजाबी छाती बडवून आक्रोश करून राहिले आहेत 'पीट ओ जहा गई वैशाखी' म्हणजे 'दुर्दैवी प्राण्या, आता जन्मभर छाती बडवीत बैस, तुझी व सुखाची आता कायमचीच फारकत झाली आहे '

## ५ : ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यातील आणिबाणीचे दिवस

१९४७ च्या पधरा ऑगस्टलाही आम्हास वाटत होते, की अल्पसख्याकाच्या न्याय्य हक्काचा सीमा समिति विचार करील. आदल्याच रात्री मुझागचा प्रसिद्ध गुरुद्वारा जाळून गुडानी तेथील पुजाऱ्याचे तुकडे केले होते. सीमा लष्कराचे मुख्य, जनरल रीस यानी दुसरे दिवशी गुरखा लष्कराची एक तुकडी मेवामडी, इस्लामिया कॉलेज, व मुझांग या भागात गस्त घालण्यासाठी ठेवली. हिंदु विभागाकरता अशीच एक बलुची तुकडी नियुक्त केली होती. लाहोर शहराच्या भवितव्यासंबधी अनेक बातम्या उठत होत्या. परंतु दोन दिवसानतर प्रगट झालेल्या सीमा समितीच्या निर्णयाने सर्व आशाआकांक्षावर पाणी फिरले. या निर्णयाने, पजाबच्या हिंदुशिखाचे हे अत्यत आवडते शहर ज्याच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी सर्वस्वी तेच कारणीभूत होते— ते लाहोर शहर भारतातून कापून पाकिस्तानात घातले होते. ज्या हिंदुशिखाना येथे राहणे अपरिहार्य होते त्याना आता पाकिस्तानचे नागरीक होणे प्राप्त होते. त्यापैकी अनेकानी पाकिस्तानचे नागरीक म्हणून का होईना पण येथेच रहाण्याची इच्छा होती हे मला माहीत आहे. त्याची भावना अशी होती, की पाकिस्तानी राजवटीत जास्तीत जास्त जिझिया पद्धतीचे कर बसविण्याव्यतिरिक्त हिंदुशिखावर जुलूम अथवा अत्याचार होणार नाही. राजनिष्ठ नागरिकाना पूर्ण सरक्षण दिले जाईल अशी घोषणाही जिना साहेबानी केली होती या घोषणेवर अल्पसख्याकानी फार मोठा विश्वास ठेवला होता. त्यावेळी व आजही श्वासागणिक पत्रके फसवणाऱ्या काँग्रेस पुढाऱ्याच्या अगदी उलट जिनासाहेब मितभाषणाचे मोल जाणून होते. ते क्वचितच जाहीर घोषणा करीत व बहुधा ते जे बोलत तेच ते करीत, असे लोकाच्या अनुभवास आले होते. सीमा समितीच्या निर्णयाने ज्या हिंदुशिखाच्या वाट्याला पाकिस्तान आले होते त्याना त्यांना जिनासाहेबाच्या या आश्वासनाने पुष्कळच धीर दिला. खरे बोलावयाचे म्हणजे १५ ऑगस्टच्या सकाळी अत्याचाराचे सर्व प्रकार बद झाले होते. मुस्लिम लीगच्या पुढाऱ्याचे आपल्या जमातीच्या

खालच्या थरापर्यंत अत्यंत जिव्हाळयाचे व निगूढ संबध होते. एका शब्दाच्या खुणेने आदेश मिळताच अत्याचार थावून सर्वत्र शातता वाटू लागली पण आता एक नवेच सकट उभे राहिले. अमृतसरहून मुस्लिम निर्वासिताचे ताडेच्याताडे लाहोर शहरात येऊ लागले. १७ ऑगस्टला अमृतसरच्या पोलिसदलातील काही लोक शस्त्रे व दारूगोळा घेऊन लाहोरला पळून आले होते. त्यांनी अमृतसरला हिंदुशिखाकडून मुसलमानांवर होत असलेल्या अत्याचारी भयानक वर्णने सांगावयास सुरूवात केली. पूर्व पंजाबात इतरत्र होत असलेल्या दग्याधोप्याच्या बातम्याही शहरात येऊन धडकू लागल्या. मुस्लिमाची पहिली तुकडी लाहोरला आली तेव्हा तेथील मुसलमानानी अलिंगने देऊन त्याचे स्वागत केले. लौकरच असे दिसून आले की आलेल्या या तुकड्या निर्वासिताच्या नसून पूर्व पजाबातील मुस्लिम लोकसंख्या पश्चिम पजाबमध्ये येत आहे प्रारभी एकतर्फी चालू असलेली आवक-जावक आता दुतर्फी सुरू झाली.

पश्चिम पंजाबातील अत्याचारांच्या बातम्या लाहोरच्या वृत्तपत्रात कधीही आल्या नाहीत पण लाहोर शहरात येणाऱ्या निर्वासितानी विशेषत: अमृतसरहून पळून आलेल्या पोलिसदलातील लोकानी बातम्या पिकवून पुन्हा दगली माजविण्यास प्रारंभ केला. मुस्लिम लीगवाल्याचा हिंदुस्थानातील काही थोड्या लोकाप्रमाणे अहिंसेवर विश्वास नाही सूडावर त्याचा विश्वास आहे. त्याच्या धर्मास अथवा जातीस खरा खोटा कसाही धक्का बसल्याचा भास होण्याचा अवकाश, की त्यांच्याकडून प्रतिक्रिया सुरू होते. आपल्या ज्ञातिबांधवाची दुर्दशा ऐकून त्यांची माथी भडकली व जिनासाहेबांच्या आदेशास धाब्यावर बसवून त्यानी पश्चिम पजाबात राहिलेल्या हिंदुशिखाना रक्ताच्या थारोळयात बुडविण्यासाठी पुन्हा उठावणी केली.

जिनानी अल्पसख्याकाना दिलेले सरक्षणाचे आश्वासन प्रामाणिकपणानेच दिले होते अशी माझी खात्री आहे. हिंदुशिखाना त्याच्या घरादारातून हाकून लावण्याची कल्पना पाकिस्तानी अधिकाऱ्यात त्यावेळी तरी नव्हती. इतरत्र घडलेल्या घटनांनी त्याना सूडास प्रवृत्त केले व वेगवेगळया योजना सूरू झाल्या. शेखपुऱ्यास झालेली कसाईकत्तल, तसेच बुहुमाली, काजसर दत्ता आणि शक्करगड तहसीलमध्ये झालेल्या सामुदाईक कत्तली याच्या योजना लाहोरहूनच करण्यात आल्या होत्या. एक मत्री योजना व मागण्यासह विमानाने कराचीस गेला व तो परत आल्यावर दुसरा मत्री विमानानेच शेखपुरा, ल्यालपूर, नारोवाल इत्यादी ठिकाणी गेला.

## शेखपुऱ्यातील अमानुष कत्तल

याचवेळी पाकिस्तानात तुटक तुटक व वेचकपणे प्रसिद्ध होत असलेल्या महात्मा गाधीच्या भाषणातील व लेखातील उताऱ्यांनी तेथील मुसलमान चवताळत होते. एका सुप्रभाती 'महात्मा गाधी काय म्हणतात, महात्मा गाधीचे फर्मान' या मथळयाखाली लाहोर शहराच्या भिंती भिंतीवर मोठी पत्रके लावण्यात आली. झाले! लाहोर शहरात पुन्हा नव्याने अमानुष दगलीस प्रारंभ होण्याची ही खूणच ठरली. महात्मा गाधीनी आपल्या लेखाभाषणातून निरनिराळया घटनांचा उल्लेख करून, मुसलमानाना ठार न मारण्याचा, गाडीतून फेकून न देण्याचा अथवा असेच इतर प्रकार न करण्याचा हिंदुशिखाना उपदेश केला होता

शेखपुऱ्याची कत्तल पूर्ण योजनापूर्वक करण्यात आली होती. याचा ओझरता उल्लेख तिसऱ्या प्रकरणात आला आहे. मुसलमानच पण भल्या स्वभावाचा. तिवाना घराण्यातील तेथील पोलीस सुपरिंटेंडेंट प्रथम हालवून, तसेच तेथील डे. कमिशनर श्री. सुखानद या हिंदु गृहस्थाची बदली करून त्याचे जागी अनुक्रमे महमदबकर व मि. सी. एच् दिनसे या अँग्लोइंडियन गृहस्थांची नेमणूक करण्यात आली. मि. दिनसे हे पश्चिम पंजाबचे शिक्षणमंत्री मि. करामत अली याच्या हातचे बाहुले होते. फाळणीमुळे शेखपुऱ्याचे हिंदुशिख भयभीत झाले. काय करावे हेच त्याना कळेना. अनेकानी शेवटी पाकिस्तानातच राहण्याचे ठरविले व काही लोकानी तात्पुरती हिंदुस्थानात जाऊन दगली थाबल्यावर पुन्हा आपल्या घरादारास परतण्याचा विचार केला. नवे पोलीस सुपरिंटेंडेंट मि. बकर याच्या सूचनेवरून डेप्युटी कमिशनरने शेखपुऱ्यास १४४ कलम लागू केले व शेखपुऱ्यातील कोणीही डि. मॅजिस्ट्रेटच्या परवानगीवाचून शहर सोडू नये असा हुकूम जाहीर केला. ही आज्ञा फक्त शेखपुरा शहरासच लागू होती. असे असता शेखपुऱ्याचा भाग नसलेल्या 'चिकनोकी मालिया' व 'कॅनॉल ब्रिज' येथील हिंदुशिखानाही बाहेर जाण्यास मज्जाव करण्यात आला होता. अशारीतीने हे शहर व आसपासचा भाग हिंदुशिखांना धरण्यासाठी सापळयासारखा केला होता.

त्या चार दिवसात बलूच रेजिमेंटने शहरात धुमाकूळ घातला. ते लष्करी गाड्यातून फिरत व दरवाज्यासमोर आढळलेल्या कोणाही हिंदुशीख स्त्रीस उचलून घेत, कोणाही सन्मानीय हिंदूचे घरात शिरून रात्ररात्र तेथेच तळ ठोकीत. २५ ऑगस्टला सकाळी मुस्लिम गुंडानी हिंदुशिखाची दुकाने लुटली व त्यांना आगी लाऊन दिल्या व जे हिंदुशीख प्रतिकारार्थ अथवा आग विझविण्यास बाहेर आले त्याना बलुच शिपायानी गोळया घालून ठार केले लछमनसिंग पनसारी याचा पहिला बळी पडला. त्या नंतर ७२ घटघाचा कर्फ्यू पुकारण्यात आला व बलुच लष्कर व सजवालखान पो. सब इन्स्पेक्टर याचे हाताखालील पोलीस यानी शेखपुऱ्यातील रामगढ या शीख वस्तीत शिरून त्या वस्तीतील प्रत्येक हिंदुशीख ठार मारला. त्याच दिवशी सध्याकाळी ६ वाजता खाडपुरी वस्तीवर हल्ला होऊन घराना आगी लावण्यात आल्या या विभागातून जेमतेम दहा माणसे जिवत निसटली. त्यानतर सामुदाईक कत्तलीस प्रारंभ झाला. बलुची लष्कर, पोलीस व चवताळलेला मुस्लिम गुडांचा जमाव सर्व शस्त्र सामग्रीसह शहरातील हिंदुशीख वस्तीवर तुटून पडले. पहिल्याने लष्करी शिपाई व पोलीस हिंदुशिखाच्या घराच्या खिडक्यातून व तावदानातून गोळया झाडीत व नतर गुडाचा जमाव घरात शिरून जखमी झालेल्यास ठार करीत. जिवत सापडतील त्या स्त्रियांवर बलात्कार होई. घरातील इतर पुरुषाना चहूबाजूनी भोसकून वा अन्यरीतीने ठार करण्यात येई. काही हिंदु इकडे तिकडे लपून बसले होते. ते तिसरे दिवशी सरदार आत्मासिंग यांच्या फॅक्टरीच्या आवारात जमू लागले. गेले तीन दिवस अन्नपाण्यावाचून उपाशी असलेले हे लोक फॅक्टरीच्या नळावर पाणी पीत असता त्या फॅक्टरीस पोलीस व लष्करी शिपायांनी वेढा दिला व नंतर आत घुसून या जमलेल्या लोकाची प्रथम लूट करून

नंतर त्यांची सटसटा कत्तल केली. तेथे असलेल्या स्त्रियांना पळवून नेले व काहीवर तेथेच बलात्कार केले शेखपुऱ्याच्या सिव्हिल लाईन्स-मध्येही अशाच तऱ्हेची रानटी व अमानुष कृत्ये करण्यात आली नवा मोहल्ला ' हा तर पाशवी व निर्घृण कृत्याने छिन्नविछिन्न झालेल्याचा एक भयाण नमुनाच बनला होता शेखऱ्याचे सेवा निवृत्त H V. C. सरदार चद्रमणसिंग यानी आपल्या उभ्या हयातीत कोणाला दुखविले नव्हते. त्यांच्याविषयी साऱ्याना आदरही असे. त्याना त्याची आई. मुलगा व सून यासह ठार करण्यात आले. धावानसिंगमडी येथील लालाचुन्निशहा प्राण रक्षणार्थ रजिस्ट्रारचा कारकून मि. झुल्फिकार-अली याचे आश्रयास जाऊन राहिले होते. त्याना झुल्फिकारअलीच्या विनविण्यास न जुमानता ठार करण्यात आले. शेखपुऱ्याचे प्रसिद्ध फौजदारी वकील गोसेन मायाराम त्याची त्याच्या घरातच कत्तल करण्यात आली. तेथील लोकप्रिय व्यक्ती डॉ. सालेमी याचे हिंदु-शिखाशी फार मित्रत्वाचे व जिव्हाळ्याचे सबध होते. माझीही त्याच्याशी व त्याच्यामुलाशी दाट मैत्री होती. सिव्हिल लाईन्स विभागातील प्रतिष्ठित हिंदुशीख घरातील पोरी पळविण्यात या गृहस्थाने पुढाकार घेतला होता. मला जेव्हा हे समजले तेव्हा प्रथम मला खरे वाटेना. मुस्लिम लीगचा मत्र पाकिस्तानातील सुसस्कृत व शिकलेल्या लोकांनाही द्वेषाग्नीने कसा आधळा बनवू शकतो याचे हे उदाहरण आहे. मुस्लिम जमाव ओरडत होता ' पतियाळाचा आम्ही सूड घेऊ ' ' पाकिस्तान आमचे आहे ' ' आम्हास वाटेल ते करण्यात आम्ही स्वतंत्र आहोत ' ' कायदे आझम झिंदाबाद. '

म्युनसिपल कमिशनर स्वामी नदासिंग रईस, हे शेखपुऱ्याच्या शातता समितीचे कार्यकारी सदस्य होते. ते पोलिसाच्या गोळीने ठार न होता नुसते जखमी झाले. म्हणून एका लिगी गुडाने आपल्या तलवारीने त्याचे शीर धडा वेगळे करून ते लीगच्या झेंड्यावर ठेवले व हा झेंडा ' मुस्लिम लीग झिंदाबाद 'च्या घोषणा करीत शहराच्या सर्व भागातून मिरवला.

शेखपुऱ्यातील हिंदुशीख वस्ती सुमारे वीस हजार होती. त्यापैकी मोठ्या कष्टाने पराकाष्ठा करून चार पाच हजार लोक शेखपुऱ्याच्या बाहेर पडून भारतात येऊ शकले. प्राण रक्षणार्थ जे हिंदुशीख शहरा-जवळील खेड्यात व शेतात पळाले होते, त्याच्यावर दि. २८, २९ व ३० ऑगस्टला पडलेल्या मुसळधार पावसाने खरी कृपा केली. कारण त्यामुळे रस्ते खराब होऊन मुस्लिम गुडाना त्याचा पाठलाग करता आला नाही. शेखपुऱ्यातील कत्तलीच्या आकड्यावरून व ती ज्या पद्धतीने केली गेली तीवरून ती योजनापूर्वक व कोणातरी पाकिस्तानी मत्र्याच्या आदेशानुसार झाली होती, हाच निष्कर्ष सहज निघण्या-सारखा आहे. शेखपुऱ्याची ही राक्षसी, अमानुष व माणुसकीग कलक लावणारी कत्तल पाकिस्तानच्या इतिहासातील काळेकुट्ट पान आहे. त्या दिवशी योगायोगाने एक विमान शेखपुऱ्यावरून घिरट्या घालू लागले व सरदार आत्मासिंग याच्या फॅक्टरीवर बरेच खालीही आले. हे विमान हिंदी युनिअनचे समजून, हिंदुशिखाची पारध करणारे शूर बलूच शिपाई आपआपल्या जागी पळून गेले. त्यामुळे काही थोड्या हिंदुशिखाचे प्राण वाचले. मागाहून असे कळले की आपल्या करा-मतीस कसे काय फळ आले हे पहाण्यासाठी लाहोरचे लीगपुढारी या विमानाने आले होते.

## पंडितजींची धावती भेट

पं. नेहरूनी आपल्या लिगी स्नेह्यांबरोबर शेखपुरा व चोहार-खाना या विभागास धावती भेट दिली. असे म्हणतात की शेख-पुऱ्याच्या कत्तलीची सर्व हकीगत त्यास समजली तेव्हा त्याचे डोळे अश्रूनी भरून आले हे अश्रु असाहाय्यतेचे होते. ते ज्या पदावर आहेत त्या जागी जर दुसरा एखादा माणूस असता तर फाळणी पूर्वी त्याचेच देश बाधव असलेल्या त्याच्याच रक्तामासांच्या या निरपराध नागरि-काची अशी अमानुष कत्तल करणाऱ्या टोळीला ठेचून काढण्याची त्याने तेथल्या तेथे प्रतिज्ञा केली असती.

लाहोरला जे काही हिंदुशीख राहिले होते त्यानी आयुर्वेदिक कॉलेजच्या निर्वासित छावणीत आश्रय घेतला. हिंदुशिखापुरतेच बोलावयाचे झाले तर लाहोरसारखे विस्तृत शहर आता एक कॉलेज वसतीगृहात समावले होते.

हिंदुशिखाना आता निर्वासित छावण्यावाचून बाहेर कोठेही सुरक्षितता नव्हती. देवळातून अथवा गुरुद्वारातून राहणेही धोक्याचे होते १५ जून १९४७ ला अनारकली आर्य समाजाची सभा सपताना समाज मदिरावर एक बॉम्ब फेकण्यात आला. त्या दिवसापासून प्रत्यक्ष ही देवळे व गुरुद्वारे याचेवर योजनापूर्वक हल्ले करण्याचा क्रम सुरू झाला. सरहद्दप्रात व रावळपिंडी भागातून येणारे निराश्रित या देवळात व गुरुद्वारात तात्पुरता आश्रय घेत असत. तेथे हल्ले होऊ लागल्यामुळे ती आश्रय स्थानेही त्यांना उरली नाहीत. शहराच्या कानाकोपऱ्यात राहिलेल्याही शिखाना हुडकून काढण्याचे काम स्थानिक गुडानी व बाहेरून आलेल्या मुस्लिम निर्वासितानी आपल्या हाती घेतले कोपऱ्या कोपऱ्याने हे मारेकरी टपून बसलेले असत. खालचा माल व वरचा माल सडकेच्या फूटपथावर काही गुडाची टोळकी पत्ते खेळत बसलेली अथवा हुक्का पीत बसलेली असत. ती एकट्या दुकट्या जाणाऱ्या हिंदुवर एकदम झडप घालून त्यास जागच्याजागी ठार करीत व पुन्हा आपला पत्ते खेळण्याचा क्रम पुढे चालवीत. त्याची झडती घेतली असता त्याचे जवळ शस्त्र सापडत नसे. माझ्या एका मुस्लिम स्नेह्याने लाहोर शहराच्या रस्त्यातून फिरण्याबाबत व विशेषत: वरील सारख्या रस्त्यातून खळत अथवा गप्पा मारीत बसलेल्या लोकाबद्दल सावधानतेची सुचना दिली होती. त्याच्या म्हणण्याप्रमाणे हे सर्व मुद्दाम ठेवलेले गुड होते. जाणाऱ्या येणाऱ्या वाटसरूकडे हे सिगरेट अगर काडी मागण्याचे निमित्ताने जात व आपले हिंदु सावज ओळखून ते ठार करीत. त्याच्याजवळ शस्त्रे कधीच सापडली नाहीत याचे कारण ते आपले साहित्य पुरून ठेवीत. माणसाची हत्या केली, को पुन्हा सुरा जागच्या जागी ठेवून देत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाताना हे लोक हे साहित्य लपवून नेत त्यामुळे पोलिसानी झडती घेतली तरी त्याच्या जवळील शस्त्र उघडकीस येत नसे. पोलिसाकडून याची ज्वालाग्राही पदार्थासाठी कडकपणे झडती घेतली गेली. तरीही मुस्लिम गुड आपल्याजवळ पिस्तुले इत्यादी बाळगीतच.

या काळात अशाही काही गोष्टी नमूद आहेत, की पोलीस हिंदु शिखाना चौकशीसाठी एखाद्या ठिकाणी जमवीत व अशाहीस्थितीत पोलीस अधिकाऱ्यादेखत त्याचेवर बॉम्ब इत्यादी फेकण्यात येत.

ऑगस्ट १९४७ च्या पहिल्या आठवड्यापर्यंत, जे हिंदुशीख

लाहोरला राहिले होते, त्यापैकी बहुतेकांनी विशेषत: मालरोड व अनारकली या भागातील घर मालकांनी व दुकानदारांनी, लाहोर पाकिस्तानात जावो अथवा न जावो, तेथेच राहाण्याचा निश्चय केला होता निरनिराळ्या कचेऱ्यातील नोकरही १५ ऑगस्टनतर तावड-तोब शातता प्रस्थापित केली जाईल या आशेवर होते. हे मागे राहा-णारे लोक बाहेर जाणाऱ्या लोकाची भित्रे व कातर मनाचे म्हणून त्यांची थट्टा करीत. ते स्वत.स मोठे शूर समजत त्याबद्दल स्वत चा अभिमानही बाळगत. पळून जाणारा समाज भित्रा, दुबळा व मूर्ख आहे, असे ते समजत. महात्मा गाधीच्या उपदेशाची प्रेरणा घेऊन सरकारी खात्यातील काही हिंदु आधिकाऱ्यांची मजल याही पुढे गेली होती. ते बाहेर निघून जाण्याच्या विचारात असलेल्या, आपल्या हाताखालील हिंदु नोकराना तसे केल्यास नोकरी वरून काढून टाकण्याच्या धमक्या देत व शूर होण्याबद्दल त्याना उपदेश करीत. शेक्सपिअरच्या खालील काव्यपक्तिही अशावेळी ते त्यास ऐकवीत 'भित्रे लोक प्रत्यक्ष मृत्युपूर्वी अनेकदा मरतात, पण शूरास फक्त एकदाच मृत्यु येतो.' थोडयाच दिवसानतर हेच आधिकारीही सरकारी मोटारगाडयातून आपल्या मित्र परिवारासह सामान सुमान घेऊन लाहोरहून पळून गेले. त्यानी आपल्या हाताखालच्या नोकराना तेथेच राहाण्याच्या दिलेल्या आज्ञा मात्र तशाच राहिल्या. खाजगी पेढयातूनही अशाच गोष्टी झाल्या. खाजगी पेढया व सार्वजनिक संस्थाचे चालक व मालक जुजबी नोकर वर्ग मागे ठेऊन लाहोर सोडीत होते. शेवटी मागे राहिलेल्या या लोकांनाही निर्वासितांच्या छावण्यातून आश्रय घ्यावा लागला. काँग्रेसचे एक जुने कार्यकर्ते पजाब नॅशनल बँकेचे सेक्रेटरी लाला अमरनाथ चोप्रा यानी मालरोड वरील आपल्या कचेरीत सर्व बँकाच्या नोकर वर्गासाठी एक प्रकारची निर्वासित छावणीच उघडली होती. इतर बँकाबरोबर इपिरिअल, रिझर्व, व इग्लिश बँकेच्या नोकरानाही येथे अन्न, आश्रय व आतिथ्य दिले जाई कँटोनमेन्टमधील एखाद्या अधिकाऱ्याची ओळख असल्यास तेथेही थोडेसे सरक्षण मिळे. हिंदु शिखाची ही तीन आश्रयस्थाने वगळल्यास सर्व लाहोर शहर रक्ताने न्हाऊन निघत होते. मी ऑगस्ट अखेरपर्यंत माझ्या सनदा रोडवरील घरात राहात होतो. तोवर या भागावर मुस्लिम निर्वासितानी हल्ला केला नव्हता तरी कृष्णनगर विभाग निर्मनुष्य झाला होता. कर्नल प्रोफेसर महमद आस्लम हे यु ओ टी. सी. बटॅलिअनचे कमांडिग ऑफिसर होते. ते सशस्त्र सरक्षणाखाली बटाला येथे जाणार होते. ते मला अमृतसरला नेऊन सोडतो म्हणाले बरेच सामानसुमान मागे टाकून मी अमृतसरला गेलो काही दिवसानतर कर्नल आस्लम अमृतसरच्या साखरकार-खान्यात मला भेटावयास आले आणि त्यानी मला सागितले, की



व्हाइस चान्सेलरने विनंती केल्यावरून पंजाब युनिव्हर्सिटीचे रजिस्ट्रर श्री. मदन गोपाळसिंग यांचे सामान सुमान मी बरोबर आणले आहे व स्वत. मदन गोपालसिंग परवा येणार असून ते तुमच्याकडेच उतरणार आहेत. तिसरे दिवशी यु. टी. सी. ची लॉरी माझे घरी आली. तीत मदन गोपाल याचे सामान व अत्यत शोकमग्न व भग्न हृदय झालेली फक्त त्याची पत्नी होती. जेव्हा त्याची करूण कहाणी आम्ही ऐकली तेव्हा आमच्या डोळयातून अश्रु वाहू लागले. श्री. मदन गोपालसिंग याचा मृत्यु लपविता आला नाही पण तो कशाप्रकारे झाला ही गोष्ट दावून टाकण्यात आली. त्याचे निवासस्थान त्यांच्या कचेरी समोरच होते. सकाळची न्याहारी आटोपून ते आपल्या कचेरीत जात असता कचेरीसमोरच त्याचेवर चार गुडानी हल्ला केला. त्यांना फरपटत कचेरीत नेऊन भुईवर लोळविले. बोकडास कापताना मुसलमान कसाई 'तकबीर' व 'कलमा' इत्यादी मत्र म्हणतात त्याप्रमाणे मत्र म्हणून एका गुडाने त्या अभागी अधिकाऱ्याची चरचरा मान कापली. इतर गुडानी त्यास जमिनीवर दावून धरले होते. हलाल करण्याच्या रीतीप्रमाणे त्याचे गळचाची मुख्य रक्तवाहिनी अर्धवट चिरून त्यास तेथेच तडफडत टाकून त्याचे मारेकरी निघून गेले. त्याना तावडतोड रुग्णालयात हलविले पण अतिरिक्त रक्तस्रावामुळे वाटेतच त्याचा अत झाला. असा अघोरी व राक्षसी खून हिंदुस्थानच्या इतिहासात मुसलमानी कारकिर्दीच्या अत्यत जुलमी व दुष्ट दिवसातही झाला नसेल.

विश्वविद्यालयाच्या एवढचा मोठचा अधिकाऱ्याच्या खुनाकडे पजाब सरकारला दुर्लक्ष करता आले नाही. मला वाटते लोकानी जोराची तक्रार केली त्यामुळे सरकारने चौकशीचे आश्वासन दिले. प्रारंभी पोलिसाचे म्हणणे हा खून वैय्यक्तिक सूड बुद्धीने झाला असावा. नतर एक माणूस पकडण्यातही आला व कायद्याच्या इतिहासात अपूर्व अशा मुद्यावर त्यास नतर (डिसेंबर १९४८) सोडूनही देण्यात आले. तो मुद्दा असा की फिर्यादिच्या साक्षीदाराने म्हणे कोर्टात येण्याचेच नाकारले. मग बिचारे कोर्ट तरी काय करणार !

मी लाहोर सोडल्यानतर प्रथमच शेखपुऱ्याची कत्तल, सक्करगड तहसीलीतील अनन्वित प्रकार व पश्चिमेकडील जिल्ह्यातून आगगाडचानी येणाऱ्या निर्वासिताच्या निरनिराळचा स्टेशनावर झालेल्या कत्तलीची वर्णने ऐकली. मी पंधरा दिवसाची रजा घेऊन बाहेर पडलो होतो. पण आता हे स्पष्ट दिसू लागले की, केवळ पधरा दिवसच नव्हे तर अशा कित्येक पधरा महिन्यांसाठी मला गृहत्याग करावा लागणार आहे. मला त्यावेळी सारखे वाटत असे व आजही सारखे वाटते की, एक ना एक दिवस हिंदु व शीख पुन्हा आपल्या पश्चिम पंजाबातील घरी परत जातील. सर्व घटना याच परिणामाचा निर्देश करीत आहेत व प्रत्येक हिंदु-शीख हृदय याच परिणामाच्या परिणतीकडे डोळे लावून बसले आहे. या हिंदु-शिखाप्रमाणेच, माझी खात्री आहे की, हिंदुस्थानातून इकडे आलेल्या ज्या मुसलमान लोकाना हिंदूची अपार मालमत्ता व प्रासादतुल्य घरे बळकावण्यास मिळाली ते वगळल्यास, इतर मुसलमानासही पूर्व पजाबातील आपापल्या घरी जाण्याची तीव्र इच्छा आहे पण हा प्रश्न शाततेच्या मार्गाने सुटणारा नसून त्यासाठी युद्धच व्हावे लागेल. ही दोन राज्ये केवळ कृत्रिमपणे निर्माण केली गेल्यामुळे उत्पन्न झालेल्या समस्या तर्कशुद्ध मार्गाने सोडविण्यात पोकळ आशावादी व पराभूत मनोवृत्तीचे गट अडथळे आणीत आहेत. पण लोकशाहीत एकाच गटाचे हाती नेहमीसाठी सत्ता राहील असे नाही. हिंदुस्थान आता लोकसत्ताक राज्य आहे. आजच्या सक्रमणकालात एखादी व्यक्ती या देशावर हुकूमशहासारखी सत्ता चालवीत असली तरी ती फार निभणार नाही. थोडचाच वर्षांच्या अवधीत कॉंग्रेस पक्ष निवडणुकीत उलथला जाईल. भारतातील हिंदूना वाटते, की या निर्वासितानी आपल्या नोकऱ्या, व्यापार उदीम व उद्योगधदे यावर चढाई केली आहे वस्तुत' पैसा हेच दैवत आहे असे मानणारे काही अपवादभूत लोक वगळल्यास आलेले निर्वासित येथे रहावयास अगदी कंटाळले आहेत. आवश्यकतेपेक्षा एक क्षणही अधिक रहाण्याची त्यांची इच्छा नाही. भारतातील मुसलमानासबंधी बोलावयाचे झाल्यास त्यांनाही गेल्या दोन वर्षात त्याच्या येथील राजकीय स्थानात झालेल्या स्थित्यतराची जाणीव झाली आहे. एवढचा प्रचड हिंदुजनसागरात येथे राहिलेल्या मूठभर मुसलमानाना राजकीय हक्क ते काय असावयाचे ? संरक्षणम्हणून त्याना आता हिंदूवरच अवलबून राहणे भाग आहे. पाकिस्तानात मोठचातला मोठा हिंदु आज ताठ मानेने चालू शकत नाही. भारत हे धर्मातीत राज्य आहे व कायद्याप्रमाणे ते असोही पण त्यामुळे वस्तुस्थिती बदलू शकणार नाही साडेपस्तीस कोट हिंदु व साडेतीन कोट मुसलमान असलेल्या या देशात 'धर्मातीत' या शब्दाचा अर्थ समजणारे मूठभर लोक निघतील. पण रद्द होऊन एक झालेल्या 'धर्मातीत' हिंदुस्थानातच मुसलमान लोक लियाकतअलीसारखे त्याता भडकवणारे लोक नसतील तर पूर्वीप्रमाणे रुऱ्या सुखाचे निश्वास टाकू शकतील.

देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत जातीय दगेधोपे व हाणामाऱ्या आता रोजच्याच होऊन बसल्या होत्या. यावेळी हिंदुस्थानचे लष्कर सुसज्ज होते, त्याचप्रमाणे कार्यक्षम मुलकी व्यवस्था व सघटित पोलीसदलही होते. जपानचा पराभव झाल्यावर एक रशियाखेरीज सर्व आशियात हिंदुस्थानचेच लष्कर उत्कृष्ट होते. सरकारात बहुसख्य असलेल्या कॉंग्रेस पक्षाने हे दगेधोपे दडपण्याचे निर्धाराने ठरविले असते तर तसे करण्यात पुरून उरण्याइतकी शक्ती या लष्करात होती. आसामसह काही प्रातानी लष्करी कुमक मागितली होती. ती त्याना देण्यातही आली. पण दिली ती अपुरी दिली. शिवाय शातता व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी सर्वस्वी त्याच्यावर टाकली नाही. त्यामुळे या लष्कराचा काहीही उपयोग झाला नाही. देशात अनेक ठिकाणी स्फोटक परिस्थिती निर्माण झाली असताही अक्षम्य निष्काळजीपणाने 'मार्शल लॉ' पुकारण्यात आला नाही याचे कारण एकतर हिंदुस्थान सरकारला ही दुष्ट परिस्थिती कशी हाताळावी हे समजले नसावे किंवा गव्हर्नर जनरलने त्याना 'मार्शल लॉ' पुकारण्यास संमती दिली नसावी अथवा अशा काही उपायास सरकारातील कॉंग्रेस सदस्याचे उच्च पातळीवरील अहिंसेचे तत्वज्ञान आड आले असेल. या उपाययोजनेस खरोखरी गव्हर्नर जनरलचा विरोध झाला असेल तर प. नेहरुनी तसे जाहीर करावयास हवे होते व अवश्य तर आपल्या मत्रिपदाचा राजीनामाही द्यावयास हवा होता. म्हणजे निदान या बाबतीत तरी दुबळेपणाने परिस्थितीपुढे शरणागती पत्करल्याचे पाप त्याचे माथी न बसता अन्य जबाबदार लोकाकडे गेले असते. विहारमध्ये दगे सुरू झाले तेव्हा ते सपूर्ण सामर्थ्याने दडपून तेथील अल्पसख्य मुसलमानाचे रक्षण करण्यासाठी मात्र पं. नेहरू अगदी दिरगाई न करता फार तडफेने धावून गेले ही गोष्ट खरी आहे. मग हीच तडफ व हेच सामर्थ्य त्यानी कलकत्ता, रावळ-

पिंडी अथवा मुलतान येथे का दाखविले नाही ?

बिहारमध्ये घडलेल्या दु खदायक घटना या केवळ प्रतिक्रियात्मक होत्या. ऑगस्ट १९४६ मध्ये मुसलमानांनी कलकत्त्यात केलेल्या हत्याकांडामुळे अतोनात हाल भोगून बिहारमध्ये परागंदा झालेल्या चौकीदार, मजूर इ लोकांनी हा दंगा केला होता. वास्तविक या व देशातील सान्याच जातीय दगलीची जबाबदारी, त्या स्वत: प्रारंभ करणाऱ्या मुस्लिम लीगवरच आहे देशातील काही इग्रज अधिकाऱ्यानी–विशेषत. पश्चिम पजाबातील अधिकाऱ्यांनी लीगच्या हिडीस, हीन व नीच कृत्यास साहाय्य करून उत्तेजन दिले. या गोष्टीचा प्रत्यक्ष पुरावा नसला तरी लोकाचा त्याचेवर तसा आरोप आहे आपल्याला या देशातून घालवून देण्यास हिंदु व शीखच कारण आहेत अशी स्वत.ची समजूत करून घेऊन, त्याच्या द्वेषाने प्रेरित होऊन त्यानी मुस्लिम लीगला संपूर्ण साहाय्य व प्रोत्साहन दिले, लीगच्या गुप्त संस्थाना शस्त्रास्त्रे मिळत्याच्या सवलती मिळवून दिल्या. अशी शस्त्रास्त्रे मिळण्याचे रावळपिंडी हे त्यावेळी केंद्र झाले होते. हे केंद्र अनेक सेवानिवृत्त लष्करी अधिकारी चालवीत होते.

सर खिजर हयात खान याच्या मन्त्रिमडळाने राजीनामा देण्यापूर्वी सुमारे एक महिना आधी मुस्लिमलीगच्या अनुयायानी सरकारशी सपूर्ण असहकाराचे व लढाऊ धोरण स्वीकारले होते. ते लष्करी डावपेच उपयोगात आणीत तरी त्यांच्या विरुद्ध उपाय योजना झाली नाही. पंजावात प्रत्यक्ष दग्याना जेव्हा प्रारभ झाला तेव्हा अल्पसख्य हिंदु-शिखानी एकजूट करून मोठ्या धैर्याने या कठीण प्रसगास अनेक ठिकाणी यशस्वी रीतीने तोड दिल्याची अनेक उदाहरणे आहेत. अशा रितीने प्रतिकार करणाऱ्या अल्पसख्याकाचा मग निराळ्या मार्गाने घात केला जाई. त्याना लीगवाल्यांकडून दाक्षमणी मित्रत्वाच्या जाळ्यात अडकवून युक्तीने ठार करण्यात येई. लीगवाले लष्करी गणवेश घालून टोळ्याटोळ्यानी खेड्यात जात व तेथील अल्पसंख्यांकावर गोळ्या झाडीत. प्रथम दर्शनी या लोकाना लष्करी लोक समजून भोळे अल्पसख्याक त्यांचेकडेच सरक्षण मागत या सर्व प्रकाराकडे गोऱ्या अधिकाऱ्यानी जाणूनबजून दुर्लक्ष केले. गाजलेल्या लोकानी तातडीच्या साह्याची याचना केली पण या अधिकाऱ्यानी बोटही उचलले नाही. काही ठिकाणी अवेळी साहाय्य करून सारवा सारव केली. तर काही ठिकाणी 'चोराला सोडून सन्याशालाच फाशी' म्हणजे ज्यांच्यावर अत्याचार झाले त्यानाच शिक्षा ठोठावण्यात आल्या सामान्यत: हे दिसून आले की ज्या ज्या जिल्ह्यात हिंदी डेप्युटि कमिशनर होते तेथे मोठ्या दक्षतेने शातता राखली गेली व दगा उदभवलाच तर तडफेने कडक उपाय योजून तो दडपला गेला. या उलट जेथे इग्रज अधिकारी होते तेथे जातीय दगलीना प्रति दिवशी ऊतच येत होता. आणि ते दडपले जाऊ शकले नाहीत ही गोष्ट चमत्कारिक नाही काय ? या शेवटच्या काळातील पजाबातील इग्रज अधिकारी थोडे अपवाद वगळल्यास, त्याच्या जातीच्या थोर परंपरेला काळिमा आणणारे नीच नमूने होते.

ब्रिटिश सरकार व कॉंग्रेस यानी पाकिस्तानचे मागणीस मान्यता देताच जीना व त्यांचे अनुयायी फाळणीचे कामात निमग्न झाले. ही मागणी मान्य होईपर्यंत देशात दंग्याधोप्यानी अस्वस्थता माजविणे अवश्य आहे असे मुस्लिमलीग मानीत होती. पण मागणी मान्य होताच तिला आता शांतता हवी होती. मनाजोगी व्यवस्थित फाळणी करावयाची तर शाततेचे वातावरण असणे अवश्य होते.

फाळणीच्या तपशिलाचे बाबतीत वाटाघाटी करणाऱ्या कॉंग्रेस व लीग नेत्यात लीगचे नेते कॉंग्रेस नेत्यापेक्षा अधिक खंबीर व धोरणी होते याचे एक कारण असे की मध्यतर सरकार बनविताना ब्रिटिश सरकारने महत्वाची खाती मुस्लिम लीगच्या हाती दिली होती. व त्या त्या खात्यातील पूर्वीपासून असलेले मुस्लिम अधिकारी गेले काही महिने या लीग पुढाऱ्याशी अगदी जिव्हाळ्याने व निकट अनुसधानाने वागत होते. त्या मुळे त्याच्या योजना आधीपासूनच तयार होत्या. या उलट लिगेतर व कॉंग्रेसेतर अधिकारी वर्ग निरनिराळ्या कारणाने कॉंग्रेस नेत्यापासून वेगळा पडला होता. कॉंग्रेस नेते नेहमी 'उच्च' विचारात गर्क असत त्यानी राज्यकारभारातील व्यवस्था अथवा अधिकाराच्या जागा यासारख्या क्षुल्लक गोष्टीत कधीच काळजीपूर्वक लक्ष घातले नाही. बहुसख्य मुस्लिम अधिकाऱ्यावर लीगश्रेष्ठीचा पूर्ण विश्वास होता. ते अनुभवी व उत्साही होते. या उलट त्याचे प्रतिस्पर्धी सेक्रेटेरिअटचे चागले अधिकारी असले तरी त्याचे जवळ कुठलीच निष्ठा नव्हती व कॉंग्रेस नेत्यानीही त्याना फारसे विश्वासात घेतले नाही.

दिल्लीस घडले ह्या गोष्टीची लाहोरलाही पुनरावृत्ती झाली. २६ जूनच्या 'प्रताप' मध्ये असे प्रसिद्ध झाले की डायरेक्टर ऑफ लॅंड रेकॉर्डस याच्या कचेरीतून अनेक महत्त्वाच्या फायली लाबविण्यात आल्या आहेत. पजाब सरकारचे हे खाते गेली कित्येक वर्षे मुसलमान अधिकारी व कारकून याचेसाठी जणू राखून ठेवण्यात आले होते. पजाब सरकारच्या इतर खात्यातूनही अशाच प्रकारे महत्त्वाचे कागदपत्र गहाळ झाल्याच्या तक्रारी ऐकू येत होत्या. या सर्व गोष्टीकडे इग्रज अधिकाऱ्यानी जाणून बुजून दुर्लक्ष केले.

पंजाब युनिव्हर्सिटी सेनेटने युनिव्हर्सिटीची मालमत्ता विभागली जावी असा निर्णय घेतला होता पण सीमा समितीच्या निर्णयाप्रमाणे केंद्र फाळणी समितीने ह्या निर्णय रद्द ठरवून ती लाहोरलाच राहावी असे ठरविले. मग लाहोर पाकिस्तानात जावो नाहीतर हिंदुस्थानात राहो.

मुस्लिमलीग व कॉंग्रेस यांच्या कृतीच्या या दुर्दैवी कहाणीने एक गोष्ट मात्र सिद्ध झाली. मुसलमानानी एकदा एखादे ध्येय निश्चित केले म्हणजे ते साधण्यासाठी ते किती व्यवहारी, धोरणी व खंबीर असतात, या उलट हिंदुस्थानच्या ऐक्याची ही शेवटची लढाई लांछनास्पद रीतीने हरून, कॉंग्रेसचे स्वप्नाळू नेतृत्व किती नेभळे-दुबळे आहे हेही उघड झाले. पाकिस्तान मान्य करण्याची शरणागती पत्करल्यावर कॉंग्रेसचे नेते जर थोड्या खबीरपणे व धैर्याने वागते तर पश्चिम पजाबातील हिंदु व शीख जेथल्या तेथेच राहिले असते व जे घडले व घडत आहे त्याहून फार निराळेच घडून आले असते. दि. ८ ऑगस्ट १९४७ रोजी जिना म्हणाले 'झाले ते झाले. आता गत गोष्टी आपण विसरू या. हिंदुस्थान व पाकिस्तान ही स्वायत्त राज्ये आपण आता नव्याने सुरू करू. मी हिंदुस्थानचा उत्कर्ष इच्छितो.'

पण दुर्दैवाने या गोष्टी व्हावयाच्या नव्हत्या.

**हप्ता दुसरा समाप्त. हप्ता तिसरा पुढील अंकी.**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## दोन आठवणी

निवेदक : दलितमित्र श्री. नानासाहेब टिपणीस

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर

---

### खुंटीपर्यंतचे अस्पृश्यतानिवारण

महाडच्या कोर्टात चवदार तळ्याचा खटला चालू होता अनेक साक्षीदार पिंजऱ्यात उभे राहात होते. दोन्ही बाजूकडून त्यांच्यावर प्रश्नाच्या फैरी झाडल्या जात होत्या. श्री. बडोपत जोशी हे स्पृश्याच्या बाजूचे साक्षीदार म्हणून या खटल्यात कोर्टासमोर उभे राहिले होते बडोपत म्हणजे त्या काळातील एक प्रख्यात सनातनी वकील. गृहस्थ कर्मठवृत्तीचा. फटकळ तोंडाचा मुद्देसूद बोलणे. ठासून मत मांडण्याची सडेतोड पद्धत. चवदार तळे सर्वांना खुले होण्याला त्याचा सक्त विरोध.

दावा चालू असताना ते रोज कोर्टात येत. वकिली जगतातील एक बडी असामी म्हणून ते डॉक्टर बाबासाहेबांच्या शेजारीच बसत. त्यांची साक्ष आटोपली. कोर्टाने डॉक्टरसाहेबांना विचारले.

'उलट तपासणी घ्यायची आहे का ?'

'होय महाराज.'

उलट तपासणी सुरू झाली. डॉक्टर साहेबांनी बडोपतांना प्रश्न विचारायला सुरुवात केली—

'आपण वकील आहात '

'होय '

'या दाव्यात स्पृश्यांचे साक्षीदार म्हणून आला आहात '

'होय '

'आपण स्वतःला सनातनी म्हणविता '

'मी सनातन मतवादी आहे '

'आपण कर्मठपणे धर्मरुढी पाळता '

'होय '

'सदर दावा, गेले तीन दिवस चालला आहे, नाही ?'

'होय '

'हे तीन दिवस, रोज आपण माझ्या शेजारी बसता '

'होय '

'आपण वयोवृद्ध असल्यामुळे आपल्याला वरचेवर पाणी पिण्याची जरूरी भासते.'

'होय '

'कुठले पाणी पिता ?'

'कोर्टात वकिलासाठी पाणी भरून ठेवलेले असते. त्यातील पाणी पितो '

'सर्वांकरता असलेल्या भांड्यातील पाणीच पिता ना ?'

'होय '

'वकीलसाहेब, गेले तीन दिवस आपण जे कपडे वापरीत आहात, तेच कपडे आज साक्षीदार म्हणून इथे उभे असतानाही आपल्या अंगावर आहेत, खरे ना ?'

'होय '

'आपण जीर्णमतवादी असून स्वतःला मोठ्या अभिमानाने सनातनी म्हणवून घेता ?'

'मी सनातनमतवादी आहे, हे मघाशीच सांगितले आहे '

'ते बरोबर आहे आता मला सांगा, कोर्टात माझ्या शेजारी बसत असल्यामुळे, माझ्या स्पर्शाने तुमचे कपडे विटाळतात की नाही ?'

'होय '

'मग रोज माझ्या स्पर्शाने विटाळलेले कपडे घालून तुम्ही घरात कसे जाता ?

या प्रश्नाने बडोपत जरा गोंधळले त्यांना चटकन उत्तर सापडेना — पण ते म्हणाले,

'मी हे कपडे घालून घरात जात नाही '

'मग हे कपडे कुठे ठेवता ?'

'कोर्टातून घरी गेल्यावर मी माझे हे कपडे ओटीवरच्या खुंटाळ्यावर अडकवून ठेवतो.'

'दुसऱ्या दिवशी पुन्हा तेच घालून येता ?'

'होय '

'म्हणजे आमच्या बडोपतांचे अस्पृश्यता निवारण घराच्या ओटीवरील खुंटीपर्यंत पोचले आहे असे आम्ही समजायचे ना ?'

बडोपत निरुत्तर झाले कावरेबावरे झाले! डॉक्टरसाहेबांच्या त्या विधानामुळे कोर्टात प्रचंड हशा झाला डॉक्टरसाहेब कोर्टाला उद्देशून म्हणाले,

'बडोपतांच्या घरातील खुंटीपर्यंत पोचलेल्या अस्पृश्यता निवारणाची कोर्टाने नोंद घ्यावी '

पुन्हा एकच खसखस पिकली. कोर्टही त्यात सामील झाले !

■

### महापुराचा लाभ

सन १९२३ साली जुलै महिन्याच्या १९ तारखेला महाड शहराला—सावित्री आणि गांधारी या नद्यांना आलेल्या महापुराने फार भयभीत केले या दोन्ही सह्यकन्यांच्या दुबेळक्यात महाड वसले असल्याने रायगड खोऱ्यात व महाबळेश्वरी पाऊस वाढला की, या नद्या रोरावत वाहू लागतात. महाडलाच त्यांचा संगम आहे समुद्रात भरती असली की त्या पाण्याचा उलटा दबाव व पावसाच्या पाण्याचा जोर यामुळे जो फुगवटा मारतो त्यामुळे महाडात प्रतिवर्षी जुलै महिन्यात चार-दोन वेळा पाणी भरतेच पण तेवीस सालचा महापूर भयंकर होता त्याने सारे गावच जणू पाण्याखाली घेतले. चवदार तळ्यातही धाव पडून पाणी इतके वाढले होते की, चवदार तळ्यावरील प्राचार्य कै. गोविंदराव भाटे यांच्या घरात पाच फूट पाणी चढले. आमच्या 'गोविंद निवासा'त साडेआठ फूट पाणी होते. माजघरात ६—६॥ फूट पाणी आले.

महाडचा पूर येतो तसा लवकर ओसरतोही. पण मागे राहणाऱ्यांना घरातील ओल पाव-

साळाभर बाधते. तेवीस सालच्या महापुराने आमच्या घरात जी ओल आली त्यामुळे घरात राहणे अशक्य झालें. त्यामुळे मी सहकुटुंब मुंबईस जायचा निर्णय घेतला. माझे मेव्हणे कै. भाई अनतराव चित्रे हे त्यावेळी परळला दामोदर हॉलच्या मागे–सोशल सर्व्हिस लीगच्या आजीव सभासदाकरता असलेल्या चाळीत राहत होते. वडील प्रा. कै.गोविंदराव टिपणीस हे त्यावेळी एल्फिन्स्टन कॉलेजात मराठीचे प्राध्यापक असल्याने तेही अनतरावांकडेच राहत होते.

कुटुंबकाबिल्यासह मी परळला आलो. अनतरावांचे बिऱ्हाड चाळीच्या दुसऱ्या मजल्यावर होते. पहिल्या मजल्यावरची एक जागा बॅ. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यालयाकरता दिली होती.

महापुराने मला मुंबईस पळवून लावले. पण ती एक इष्टापत्तीच ठरली–एका महापुरुषाचे दर्शन, ओळख, सहवास आणि मैत्री त्यातून निघालेली आजन्म दोस्ती–या गोष्टीचा लाभ महापुरानेच घडविला.

मुंबईला आल्यावर दुसऱ्या की तिसऱ्याच दिवशी अनंतराव मला सोशल सर्व्हिस लीगच्या ऑफिसात घेऊन गेले आणि त्यांनी माझी डॉक्टराशी ओळख करून दिली–

'हे सुरबा टिपणीस. महाडचे. माझे मेव्हणे.'

'असे का? काय करतात?'

'अहो, ते खोत आहेत. सार्वजनिक कार्यात भाग घेतातच–समतेचे मोठे पुरस्कर्ते आहेत. सध्या महाड म्युनिसिपालिटीचे मेंबर म्हणून निवडून गेले आहेत.'

'छान छान–मुक्काम किती?'

'पाहू या–परवाच्या पुरामुळे घरात मरणाची ओल आलीय. महिना, दोन महिना तरी राहतील इथे.'

'छान–मग रोज येत जा बैठकीला.'

मी 'हो' म्हटले. पहिल्या भेटीतच त्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे, ओजस्वी बोलण्यामुळे, चमकदार डोळ्यांनी, तल्लख बुद्धिमत्तेमुळे मी भारला गेलो. दामोदर हॉलमध्ये रोज आमच्या भेटी होऊ लागल्या. चर्चा झडू लागल्या. हे एवढे मोठे बॅरिस्टर म्हणून पहिल्याने विचकल्यासारखे वाटे–पण तो दुरावा डॉक्टरसाहेबांच्या प्रेमळ वागणुकीमुळे लवकरच दूर झाला.

या रोजच्या बैठकीत–पु गो काणेकर, ए. व्ही. चित्रे, बाबूजी कवळी, प्राचार्य दादासाहेब दोंदे, बापूसाहेब सहस्रबुद्धे, एस्. एस्. प्रधान, डी. व्ही. प्रधान, बी. व्ही. प्रधान, डॉ. प्रधान, के. व्ही. चित्रे, देवराव नाईक, बी. कद्रेकर, असईकर या मंडळींचाही स्नेह जमला. ही सारी मंडळी डॉक्टरांच्या 'समाज समता संघा'चे सभासद होती.

त्याशिवाय डॉ. बाबासाहेब अधूनमधून अनेक पुढारी मंडळींना बोलावून त्यांचे स्नेह-समेलन घडवीत. स्नेहभोजनही असे. विशेष म्हणजे या भोजनाची सर्व व्यवस्था ते जातीने पाहत. कित्येक वेळा मंडळींना आग्रहाने वाढीत. आपली विद्वत्ता, मोठेपणा यांचा जराही अहंकार त्यांच्या वागण्यात नसे.

त्यामुळे मी मुंबईहून परतलो तो आयुष्याचे ध्येय मनाशी निश्चित करूनच. १९२४ साली कै. रा. ब. बोले यांनी मुंबई असेंब्लीत एक महत्त्वाचा ठराव पास करून घेतला. त्या ठरावान्वये मुंबई प्रांतातील सर्व सार्वजनिक पाणवठे अस्पृश्यासाठी खुले करण्यात आले.

योगायोग असा की, १९२५ साली मी महाड नगरपालिकेचा अध्यक्ष म्हणून निवडून गेलो ध्येयवादी जिद्द होती. तारुण्याची रग होती. अध्यक्ष झाल्याने हाती सत्ताही आली होती. त्यामुळे मी अध्यक्ष झाल्याबरोबर पहिल्या झटक्यात महाडातील सारे सार्वजनिक पाणवठे–म्हणजे तळी, अस्पृश्याना खुली केल्याचा ठराव म्युनिसिपालिटीत पास करून घेतला. डॉक्टरसाहेबांच्या महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाची ती पार्श्वभूमीच होती जणू!

---

## आपण ओळखू शकाल, ही व्यक्ती कोण आहे?

'माणूस चित्र, वार्ता पुस्तका'च्या पहिल्या अंकातील पृष्ठ ६४ वरील छायाचित्र 'नाइन अवर्स टू राम' या प्रसिद्ध चित्रपटात गांधीजींची भूमिका करणाऱ्या जे. एस. काश्यप यांचे होते.

प्रथमदर्शनी या छायाचित्राचे अनेक नामवंत व्यक्तींशी थोडेफार साम्य वाटत असल्याने ते कोणाचे आहे हे ओळखणे जरा कठीणच होते. त्यामुळे छायाचित्र ओळखणाऱ्यांपेक्षा न ओळखणाऱ्यांची संख्या जास्त भरली हे बाजूच्या नोंदीवरून कळावे.

–संपादक

¤ श्री. चक्रवर्ती राजगोपालाचारी

दि. ग. भागवत, पोफळी
बाळासाहेब जाधव, गांधीनगर
मुकुंद देवधर, डोंबिवली
श्री. ग. सवनीस, सांगली

¤ महात्मा गांधी

श्रीहरी नामदेवराव घुले, बीड
आनंदराव माळी, तासगाव
कु. सुधा गुजर, मुंबई
सुरेश कारंजकर, वरूड
प्र. द. दिघे, अंबरनाथ

¤ मुरारजी देसाई

सोहनलाल लालवाणी, लासुर
एस्. बी. वोरगाणे, लातुर
गो. भि. कुलकर्णी, ब्राह्मणपुरी

¤ कणकवलीचे अप्पासाहेब पटवर्धन

भालचंद्र रोहिदास जोशी, मुंबई
सौ. अनिता मधुकर गुजर, मुंबई
सध्या अनंत टेंबे, किर्लोस्करवाडी

¤ कै. स्वामी सत्यानंद

सौ. उषा सवनीस, सांगली

¤ लालबहादूर शास्त्री

विलास धारण, धुळे
रेखा धारण, धुळे

---

जे. एस. काश्यप

नारायण वाणी, मुंबई
मोहन हिराजी नारंगीकर, मुंबई

## दैव जाणिले कुणी : पृष्ठ २४ वरून

...न्यायमूर्तींनी ती पत्रोत्तरं रेकॉर्डवर घेतली आणि टायपिस्टकडे बघत म्हटले,

Both the letters are taken on record, and collectively marked as 'Ex. 'A''

'त्यानंतर काय घडले ?'

'त्यानतर एडिनबर्गलाच राहणाऱ्या माझ्या सगळघात धाकट्या बहिणीकडे–'

"काय तिचं नाव ?'

'मिसेस ट्रेंच !'...

'बरं ! बर ! काय झाल या वहिणीकडे ?'

'९ ऑक्टोबरला आरोपी तिथे आलाय अस कळलं म्हणून मी तिकडे गेले. मला पाह्यल्यावर तो चिडला. म्हणाला, 'तू तर माझ्या बायकोला कुठे लपवून ठेवली नाहीस ?' त्यावर मी म्हणाले,

'काय बोलता ? ती कुठे आहे ते तुम्हाला माहिती नाही ? तुम्ही तर तिला काही केल नाही ना ?'

'मी कशाला काय करू ? तिला मारून मला एक छदाम मिळणार नाही आहे. मी तिच्या केसाला धक्का लावलेला नाही. माझं फार प्रेम आहे तिच्यावर'

आरोपी इतक्या जलद गतीने बोलत होता की मधेमधे त्याचा एखादा शब्द कळत देखील नव्हता. प्रक्षुब्ध होऊन त्याने बडबड चालू केली.

'मला माहिती आहे तू तिला मदत करत्येस, ती फार खर्चीक आहे. मेरी रॉजर्सनला एका लॉंड्रीवाल्यापासून दिवस आहेत–मुलं म्हणत होती तसं. तिला तिचं पाप लपवायचय. उगाच नाही दोघी एकदम नाहीशा झाल्या !'

...'दॅटस ऑल युवर ऑनर !' म्हणून सरकारी वकील खाली बसले.

.. आता बचावाचे वकील ॲडव्होकेट बर्कट उभे राह्यले. आत्मविश्वासाने चौफेर नजर फेकून त्यानी ती साक्षिदारावर स्थिर केली.

'हे बघा, मिसेस नेल्सन, तुम्ही मघाशी अस सागितलं की आरोपी तुमच्या धाकट्या वहिणीचा नवरा. मग तुमच्या या प्राणप्रिय बहिणीच्या लग्नाला तुम्ही गेला असणारच. कधी झाल हे लग्न ? आणि कुठे ?'

'न... न... नाही. त्याचं लग्न झालंच नव्हतं. ती दोघ तशीच राह्यची.'

'आता कसं खरं बोललात ! म्हणजे ऽऽऽ आरोपी तुमच्या बहिणीचा नवरा नव्हे.'

'अहो ! पण त्याना ३ मुल झाली, दोघ एकत्र राह्यची. लोक त्याना मिस्टर आणि मिसेस...

'लोक काय म्हणतात ते नको आहे मला. तुम्ही काय म्हणता ते 'हो' किंवा 'नाही' एवढच सागा. आरोपी तुमच्या बहिणीचा नवरा आहे का ऽऽऽ ?'

'नाही.'

...युवर ऑनर प्लीज हे रेकॉर्डवर घ्या.

'...याचा खुनाशी काय सबंध ?'

'सर ! मला असं सिद्ध करून दायचंय की तथाकथित (So called!) सौ. रक्स्टन ही लहरी, खर्चीक, उनाड मैना होती. तिचा खून कुणीही केला असेल. आरोपीनी नव्हे.'

'घेतो रेकॉर्डवर, तुमच्या म्हणण्यात तथ्य असेल तर या प्रश्नाचा सबध खुनाशी येतोच.'

'I am much obliged your Honour !'

वकील साहेबानी बाजी मारली. सरकारी वकील थोडे अस्वस्थ झाले. डावा पाय खुर्चीवर ठेवून आणि उजव्या पायावर उभे राहून हवेत पजा हलवीत ते म्हणाले,

'मिसेस् नेल्सन ? तुमच्या बहिणीच लग्न कधी आणि कुणाशी झालच नव्हतं का हो ?'

खालच्या मानेने सौ. नेल्सननी उत्तर दिले

'झालं होत व्हॅन एस नावाच्या डच लखपती बरोबर तिचं लग्न झाल होत. पण त्यानी तिच्यापासून डायव्होर्स घेतला !'

'का बर त्यानी सुदर पत्नीपासून घटस्फोट घ्यावा ?'

'...कारण मला ठाऊक नाही ! त्याला ठाऊक असेल !'

'अरे ! अरे ! तुमची वहिण एवढी सच्छील, सुशील, महान पतिव्रता, कुटुंबवत्सल, प्रेमळ ! तुम्हाला सगळी सगळी सुख-दु.ख सागणारी, तिने तुम्हाला याचं कारण पण सागू नये ?'

'कारण तिने सागितल होत.'

'काय कारण होत ?'

'आरोपी डॉ. रक्स्टन श्रीमत, हुशार, रुबाबदार आणि यशस्वी डॉक्टर होता. म्हणून तो तिला आवडला.'

–बचावाच्या वकिलानी आता शेक्सपीयरच्या नाटकाचं तंत्र अवलंबलं ! नाटकात एक प्रसंग गंभीर झाला की दुसरा विनोदी. प्रेक्षकाच्या मनावर ताण नको. खुषीने झुलत त्यांनी विचारले.

'आपला नवरा सोडून जो कोणी श्रीमत, हुशार, आपल्या क्षेत्रात यशस्वी इत्यादी असेल तो विवाहित स्त्रीला आवडतो काय ?'

'सगळ्यानाच नाही !'

'तुमच्या बहिणीसारख्या असतात त्याना ?'

'प्लीज ऽऽ तिची बदनामी करू नका.'

'मिसेस नेल्सन. कुणी कुणाची बदनामी करत नसतो. आपल्या वागणुकीनी जो तो स्वतःचीच करून घेतो. कमाल आहे ! मी एवढा श्रीमत, माझ्या अशीलांच्या दृष्टीनी हुशार आणि वकिलीच्या क्षेत्रात यशस्वी असताना मी कुठल्या सुंदरीला कसा काय आवडलो नाही बुवा ?' (हशा.)

...न्यायमूर्ती सिंगलटननी लाकडी हातोडा टेबलावर आपटला आणि ॲड्. बर्कटना चापले.

'...ऑर्डर ! ऑर्डर ! मला कोर्टात गमत नको आहे. फक्त कायदेशीर मुद्दे घेऊन उलट तपासणी घ्या. साक्षिदाराला बोलू द्या !'

'...आय ॲम सॉरी युवर ऑनर !'

'आता हे बघा मिसेस नेल्सन, तुम्ही म्हणालात की आरोपी आणि तुमची बहिण म्हणजे तुमच्या भाषेत सौ. रक्स्टन, यांची भाडण व्हायची.'

'बरोबरच आहे ते !'

'हो ना ! पण गंमत बघा, हे कोर्टात जमलेले लोक, हे पोलीस-अधिकारी, हे ज्युरीतले सभ्य गृहस्थ !–सभ्य बरं. सामान्य नव्हेत. (सौम्य हशा !) मी काय, तुमचे सरकारी वकील काय किंवाऽऽ (इथे वकिलसाहेबानी न्यायमूर्तीकडे पाह्यले ..जाऊ द्या पण आम्ही सगळे पुरुष...'

'बायकांशी भांडायच्या बाबतीत सगळे पुरुष मेले सारखेच !' (हशा !)

'...न्यायमूर्तीकडे बघत वकिलसाहेब म्हणाले, साहेब ! मी काही बोललो नाही हं ! साक्षीदारबाई बोलल्या ! (प्रचंड हशा !)

'...म्हणजे एरव्ही आरोपी चांगला होता, चिडला म्हणजे बाकीच्या पुरुषांसारखाच होता असंच ना ?'

'होय !'

'सॉलिसिटर रॉबर्ट एडमंडसन श्रीमंत आहे की गरीब ?'

'अहो ! सॉलिसिटर आहे तो. श्रीमंतच आहे !'

'तुम्ही त्याला पाह्यलाय ?'

'पाह्यलाय. चांगला रुबाबदार आहे !'

'...आणि श्रीमंत आहे. म्हणजे धंद्यात यशस्वी असणारच !'

'आहे !'

'...आणि श्रीमंत, रुबाबदार, धंद्यात यशस्वी पुरुष तुमच्या बहिणीला आवडायचा असं तुम्हीच म्हणालात मघाशी ! म्हणालात का नाही ?'

'होय !'

'आताऽऽऽमघाशी तुम्ही आरोपीचं पत्र कोर्टाला दिलंत, त्यात तो म्हणतो...'माझं तिच्यावर फार फार प्रेम आहे...तिच्याशिवाय घराला घरपण नाही. ती खर्चिक आहे...' हे सगळं खरं की खोटं ! काय तुम्हाला वाटतं ?'

'खरं !'

'...म्हणजे तो चिडला तरच वाईट वागत असे आणि त्याला चिडवायची तुमची बहीण. एरव्ही मनुष्य चांगला आहे ना ?'

'आहे !'

'...दॅटस ऑल युवर ऑनर' असं म्हणत ॲडव्होकेट बर्केट खाली बसले. लोक आपसात त्यांच्याबद्दल कौतुकाने कुजबुज करू लागले. बचावाच्या वकिलांनी मुद्दाम सरकारी वकिलांकडे पाहून त्यांना सुचवलं की हम भी कुछ कम नही !

...त्यानंतर साक्ष झाली ती सौ. रक्स्टनच्या सगळ्यात धाकट्या बहिणीची. सौ. मिसेस ट्रेंच. तिने साक्षीत हे कायम केलं की '९ ऑक्टोबर १९३५ ला आरोपी तिच्याकडे गेला होता. तिथे मिसेस नेल्सन आली होती. तिथे आरोपीचं आणि तिचं भांडण झालं. सौ. रक्स्टन आणि कुमारी मेरी रॉजर्सन दोघी एकदम नाहीशा झाल्या हे तो तिच्याच घरी बोलला. जाताना तो मला म्हणाला, 'की कुणी काही माझ्याबद्दल विचारलंच तर काहीच उत्तर देऊ नको !' बचावाचे वकील गालातल्या गालात हसत उभे राह्यले.

'हे बघा मिसेस ट्रेंच ! तुम्ही आणि सौ. नेल्सन सख्ख्या बहिणी. कोर्टात येताना कशा आलात ?'

'...चालत आलो.'... (हशा)



'मिसेस् नेल्सन, लोक काय म्हणतात ते नको मला. तुम्ही काय म्हणता ते सांगा !'

'...तसं नव्हे एकटयाच आलात की दोघी एकदम आलात ?'

'दोघी एकदम आलो !'

'वाटेत काही दोघींचं बोलणं झालं ?'

'या खटल्याबद्दलच बोलत होतो आम्ही दोघी.'

'...हो म्हणजे साक्ष कशी द्यायची याबद्दल...'

...आता मात्र सरकारी वकील ताड्कन उभे राहिले. त्यांनी आवाज दिला, 'आय ऑबजेक्ट युवर ऑनर ! खटल्याबद्दल आमचं दोघींचं बोलणं झालं असं ती म्हणाली. साक्षीबद्दल ती अक्षर बोल-लेली नाही.

टायपिस्टकडे बघत न्यायमूर्तींनी हुकूम दिला. 'ऑबजेक्शन सस्पेंड !'

...ठीक आहे ! पण युवर ऑनर !' येताना खटल्याबद्दल आमचं दोघींचं बोलणं झालं एवढं वाक्य मात्र कृपया रेकॉर्डला घ्या ! एवढं बोलून बचावाचे वकील शहाणपणानी खाली बसले.

सरकारी वकिलानी आता त्यांच्या ओव्हरचा तिसरा चेंडू टाकला. सरकारतर्फे आता साक्षिदाराच्या पिंजऱ्यात आली होती मिसेस एलिझाबेथ.

'मिसेस एलिझाबेथ आपण काय काम करता ?'

'सध्या काहीच नाही !'

'याच्यापूर्वी मी आरोपीकडे स्वैंपाकीण म्हणून कामाला होते.'

'मिस मेरी रॉजर्सनला ओळखत होता ?'

'होय ! ती मुलं सांभाळण्यासाठी आरोपीकडेच नोकरीला होती. आमची दररोज भेट व्हायची !'

'शेवटची भेट केव्हा झाली ?'

'१३ सप्टेंबर १९६५ ला; त्या दिवशी शुक्रवार होता. डॉक्टर मला म्हणाले, 'तू सोमवारपर्यंत कामावर येऊ नको. कारण खास असा स्वयंपाक करायचा नाही आहे. आम्ही एखादवेळेस बाहेर गावी जाऊ.'

# डेन-टॉनिक®

## टीथिंग पिल्स

लहान मुलांचे दांत सुखानें उगवण्यास मदत होतें व आईस कोणतीहि काळजी रहात नाही. रोज ३ गोळया सकाळ दुपार सायंकाळ पाण्याबरोबर देणें.

## "कॅल्सि-टोन"

**कॅल्सि-टोन** (टॉनिक पिल्स) लहान मुलांच्या सर्वांगिण वाढीकरितां रोज ३ गोळया सकाळ दुपार सायंकाळ पाण्याबरोबर द्याव्या. मूल अशक्त असल्यास 'डेन-टॉनिक' बरोबर पूरक म्हणून द्यावे.

सर्व प्रमुख औषध विक्रेत्यांकडे मिळतात.

## होमिओ लेबोरेटरीज

दामोदर बालाजी बिल्डिंग्ज, १७८ राजा राममोहन रॉय रोड, प्रार्थना समाज, मुंबई ४.

'...मी कु. मेरीच्या भेटीबद्दल विचारतोय!'

'...खास भेट अशी काही नाही. ती मुलांचे कपडे करीत होती मी स्वयंपाक करीत होते. मधेच ती स्वयपाकघरात आली. माझ्याकडे बघून हसली.

'हसताना कशी दिसली?'

'छान दिसली!'

...सरकारी वकिलांना आता कपाळाला हात लावायची पाळी आली. या साक्षिदाराला वकिलाच्या प्रश्नाचा रोख कळत नव्हता. त्यांना उत्तरातून हे हव होत की कुमारी मेरीच्या खालच्या जबड्यात ४ दात होते का नव्हते? पण तिनी उत्तर दिलन, 'छान दिसली' आता सावरून घेण्याचा प्रयत्न ते करायला लागले.

'... तसं नव्हे, मी अस विचारतो की ती हसली तेव्हा तिचे दातऽऽऽ'

...इतक्यात जागृत सरकारी वकिलानी चित्त्याच्या चपळाईने उभे राहून आवाज काढला,

'आय ऑब्जेक्ट युवर ऑनर! माझे विद्वान वकील मित्र (My Learned Friend!) साक्षीदाराला उत्तराची दिशा दाखवताहेत!'

...परत एकदा टायपिस्टला न्यायमूर्तींच्या हुकमावरून टाईप कराव लागलं.

'ऑब्जेक्शन सस्टेंड.'

'वर! बाई आता हे सागा की ज्यावेळी कुमारी मेरी तुमच्याकडे बघून हसली त्यावेळी बाईसाहेव – म्हणजे मिसेस रक्स्टन कुठे होत्या.'

'कुठे असणार? घरातच असणार. वरच्या खोलीत.'

'त्यानतर तुम्ही त्याना केव्हा पाहिलत?'

'त्यानंतर कधीच नाही.'

आता परत बचावाचे वकील सरकारी वकीलाची गोलदाजी फोडून काढायला उभे राहिले.

'मिसेस एलिझाबेथ तुम्ही आरोपीकडे किती वर्ष नोकरी केलीत?'

'चार–पाच वर्षे'

'घरात तुम्ही किती वेळ असायच्यात?'

'सकाळी ४ तास आणि रात्री ३-४ तास. जेवणं होईपर्यंत'

त्या काळात कधी आरोपी आणि तुमच्या बाईसाहेब याचे भाडण झाले?'

'खूप वेळेला!'

'कशावरून व्हायची भाडण?'

'बाईसाहेब सॉलिसिटर रॉबर्टकडे जातात हे साहेबांना आवडत नव्हतं!'

'...आणि तरी बाईसाहेब त्या तरुण, रुबाबादार श्रीमत सॉलीसिटरकडे नियमित जायच्या?'

'हो ना! तिथेच त्याच चुकत होत. आपल्या नवऱ्याला नाही आवडत तर कशाला जायच?'

'...अगदी वरोबर!' अस म्हणून बचावाच्या वकिलानी त्यांच्या मदतनीसाच्या कानात कुजबुज केली, 'बेटा! अशी गमत असते बरं उलट तपासणीत. ही सरकारतर्फे साक्ष द्यायला आले आणि आपल्या बाजूने उत्तर देत्ये! आता तिला आणखी कोलतो बघ!'

अगदी प्रेमळ आवाज काढण्याची पराकाष्ठा करीत त्यांनी विचारले.

'बाईऽऽऽ! कधी घरी काही अडचणी आल्या म्हणून म्हणाऽऽ किंवा तुमची तब्येत ठीक नसेल म्हणून म्हणाऽऽऽ तुम्ही कधी कधी कामावर जात नसाल!'

'नाही, तसे कधीच झालेले नाही. कामाच्या बाबतीत मी वक्तशीर आणि नियमीत होते.'

...हे उत्तर तिच्या नकळत सरकारच्या बाजूने गेले.

...बचावाचे वकील समजले की, हिला जास्त विचारण्यात अर्थ नाही. अगाशी येईल. हे मात्र त्यानी मदतनिसाच्या कानात सांगितलं नाही.

'बऽऽरं! डॉक्टर तुम्हाला म्हणाले, सोमवारपर्यंत कामावर येऊ नको. तुम्ही डॉक्टराना विचारलत का, की कुठे जाणार आहात म्हणून?'

'नाही!'

'बाईसाहेबाना विचारलत?'

'नाही!'

'अहो, घरात होत्या म्हणालात ना मघाशी?'

'होत्या म्हणजे असतील असं मला म्हणायचं होतं.'

'अस! असं! होत्या म्हणजे असतील आणि असतील म्हणजे एकादवेळेस घरात नसतीलही. बरोबर ना?'

'बरोबर आहे!'

'का नाही हो साहेबाना तरी विचारलंत, कुठे जाणार आहेत ते?'

'मला त्यात विशेष असं काही वाटलं नाही. कारण घरातले व्यवहार नेहमीप्रमाणे चालू होते.'

'...म्हणजे १३ सप्टेंबर १९३५ ला मिसेस रक्स्टन व्यवस्थित होत्या. कदाचित घरात असतील, कदाचित कुठे बाहेर गेल्या असतील. कुमारी मेरी त्याच दिवशी तुमच्याकडे बघून हसली. तुम्हाला ती छान दिसली. म्हणजे ती पण व्यवस्थित होती आणि डॉक्टर?'

'ते पण व्यवस्थित होते!'

...बचावाचे वकील खाली बसता बसता सरकारी वकिलांना म्हणाले, 'तुमच्या साक्षीदारानी व्यवस्थित साक्ष दिलीनं ते बघा. तुमच लक्ष आहे ना?' सरकारी वकील पण कमी नव्हता. त्याने बचावाच्या वकिलांना तडकावले. 'खरोखरच व्यवस्थित साक्ष दिलीन. १३ सप्टेंबरला डॉक्टरने तिला उद्यापासून कामावर २–३ दिवस येऊ नको म्हणून सागितलन. आरोपी बायकोबरोबर भांडत असे हेही सांगितलन. १३ सप्टेंबरनतर दोघीनाही मी कधीच पाहिल्या नाहीत हेही सांगितलन. लक्ष आहे ना?'

...त्याच हे भाडण न्यायमूर्ती सिंगलटननी थाववलं आणि खटला पुढे सरकला.

आता पिंजऱ्यात होत्या सौ रॉबर्टस.

'...आपण काय काम करता?'

'मी वृत्तपत्रव्यवसायाची एजट आहे. मी सकाळी पेपर टाकण्याचं काम करते.'

'आरोपीला ओळखता?'

'हो तर! 'न्यूज ऑफ दि वर्ल्ड', 'दि पीपल' आणि संडे

पिक्टोरल ' ते नेहमीच घेत असत. '

' पेपर टाकताना कधी काही विशेष घडलं ?'

' १४ सप्टेंबरला सकाळी घडल.मी सकाळी ८।।–९ ला डॉक्टराच्या घराची बेल तीनदा दाबली तरी नेहमीप्रमाणे त्याचा नोकर दरवाजा उघडेना. '

' बर मग ?'

' मग काय ? चवथ्यादा जोरात घटा दाबली तेव्हा डॉक्टरनी स्वतःच दरवाजा उघडला. मला आश्चर्य वाटल त्याना स्वत ला त्रास झाल्याबद्दल मी त्याची माफी मागितली. (I apologoised for disturbing him). '

' काही बोलण झाल ?'

' मी त्याच्याकडे दोन आठवड्याच बील मागितल. तेव्हा एकदम चिडून ते मला म्हणाले, ' आत्ता मला त्रास देऊ नको. एकतर माझी बायको आणि मेरी काल रात्री स्कॉटलडला गेली आहेत. मला जागरण झालय, तशात घरात कुणी नोकर पण आज आलेला नाही. '

' डॉक्टर कसे दिसले तुम्हाला ?'

' त्याच्या डोळ्यावरून जागरण झालेलच दिसत होते. कपडे अव्यवस्थित होते. चेहरा त्रासिक दिसत होता. त्यानी एक हात छातीशी आखडून धरला होता. तो हात ते शर्टवर टाकीत लपवीत होते. पण मी पाहिल की त्याचा तो हात गळ्यात बांधलेला आहे.

बचावाचे वकील समजले की साक्ष आपल्या चागलीच विरूद्ध आहे तरी पण त्यानी थोडासा प्रयत्न करून पाहिला.

' हे पहा मिसेस रॉबर्टस, डॉक्टरनी हात छातीशी आखडून धरला होता अस तुम्ही म्हणालात, हातावर जखम होती का ?'

' मी पाहिली नाही. कारण ते पुन्हा पुन्हा डाव्या हातानी दुसऱ्या हातावर शर्ट टाकीत होते. '

' मग त्यांनी सहज तसा हात धरला असेल. असते कुणाची काही लकब !'

' असेलही ! '

' तुम्ही डॉक्टरना विचारलत का हो हाताला काय झालं म्हणून ?'

' नाही '

' बरं ! हे बघा बाई कदाचित तुमची ऐकण्यात चूक झाली असेल. तुम्ही सकाळी गेलात तेव्हा डॉक्टर तुम्हाला असं म्हणाले असतील की ' अजून कुणी नोकर आलेला नाही ! '

' आता ते ' अजून ' म्हणाले का ' आज ' म्हणाले ते आत्ता मला आठवत नाही पण कुणी आलेल नाही अस ते म्हणाले आणि घरात कुणी दिसलही नाही '

...त्यानतर आला दुसरा पेपरवाला. १५ सप्टेंबर १९३५ ला संडे ग्राफीकचा स्पेशल अक डॉक्टरनी घेतल्याचे त्यानी सागितले तर उलट तपासणीत हेही सागून बसला की त्या दिवशी सडे ग्राफीकचा तो अक त्यानी बऱ्याच लोकाना विकला, फक्त डॉक्टरनाच नव्हे.

त्यानतर आली दूधवाली ! तिनी १३ आणि १४ सप्टेंबर १५ सप्टेंबर. सतत सकाळी नेहमीप्रमाणे दूध घातल. १३ सप्टेंबरला दूध मेरीने घेतल. १४ ला मात्र डॉक्टरनी घेतल. तिला डॉक्टर म्हणाले, ' मुलाना घेऊन मिसेस रक्स्टन, बाहेर गेली आहे. मेरी पण त्याच्या-बरोबर गेली आहे. १५ सप्टेंबरला ती डॉक्टरना म्हणाली ' तुमच्या हाताला काय ' झालं ?'

' दरवाज्यात सापडून चेंगरला ! '

' मग तुम्ही कशाला त्रास करून घेता ? मी पातेलं आत नेऊन ठेवते ! '

' नको ! नको ! तू आत जाऊ नको. इथेच बाहेरच्या खोलीत टेबलावर ठेव ! '

त्यानंतर साक्ष झाली ती मिसेस व्हाइट साइडची. डॉक्टर तिचे फॅमिली डॉक्टर होते. १४ सप्टेंबरला तिच्या मुलाचे ऑपरेशन आरोपी डॉक्टर रक्स्टन करणार होता. मुलाला घेऊन ती दवाखान्यात गेली डॉक्टर १-२ दिवस आलेच नाहीत अस कळलं म्हणून घरी गेली. डॉक्टरनीही ॲपॉइंटमेंट चुकवली. ते म्हणाले ' मला माफ करा, मला ऑपरेशन करता येणार नाही. एकतर ही आणि मेरी स्काटलंडला गेली आहेत. आज सकाळी डबा फोडताना टीन ओपनरनी माझा हात कापला आहे. शिवाय घरात आज आवराऽआवरी करायच्ये ! '

बचावाच्या वकिलानी तिला मुद्दामच विचारल.

' तुम्ही जखम पाहिलीत ?'

' हो नाऽऽ ! हात चागलाच कापला होता. जखमेवर बॅंडेज असून रक्तानी ते लाल झाल होत '

' किती रक्त होतं ?'

' थोडस होत, बॅंडेज लाल होण्याइतपत '

' कपड्यावर होतं ?'

' नव्हत ! '

त्यानतर पिंजऱ्यात शिरल्या त्या सौ. अँडरसन. १४ सप्टेंबरला सकाळी ११ वाजता आपली तिन्ही मुल घेऊन डॉक्टर त्याच्याकडे गेला होता. मिस्टर अँडरसन डॉक्टराचे मित्र होते. दोन्ही कुटुबाचा घरोबा होता. डॉक्टरनी या बाईंना त्या दिवशी विनती केली ' जरा संध्याकाळपर्यंत मुलाना साभाळा ? मेरीला बरोबर घेऊन मिसेस काही दिवस बाहेर गेल्ये. '

' ...आणि हे काय ? हाताला काय झाल डॉक्टर ?'

' मुलासाठी सकाळी डबा फोडत होतो तेव्हा टीन ओपनरनी कापला गेला.

' अरे अरे ! मग ठेवा की मुलाना आमच्याकडेच आजचा दिवस ' डॉक्टराच वर्णन करताना ही सभ्य, ससारी स्त्री म्हणाली ' एरव्ही रुबाबदार सूट घालून हसतमुख फिरणारे डॉक्टर त्या दिवशी चमत्कारिक दिसले. केस विस्कटलेले, दाढीचे खुट वाढलेले, गळ्यात टाय नेहमी कोट कसातरी चढवलेला, चेहऱ्यावर थकावट बोलण्यात कमालीच नैराश्य आणि तशातच हाताची जखम दुखत असावी म्हणून मधे मधेच असह्य आवाज. '

... १४ सप्टेंबर १९३५ चा सबंध दिवस डॉक्टर हे आयुष्य जगला.

जस जशा साक्षी होत गेल्या तस तस डॉक्टरच्या भोवती असलेल बुद्धिमत्तेच, कर्तृत्वाच, यशाच वलय विरू लागले. डॉक्टरना बघायला कोर्टात गर्दी वाढू लागली. वृत्तपत्रे साक्षीदाराच्या फोटोसकट आकर्षक शीर्षके देऊन रकानेच्या रकाने छापू लागली.

' ती जखम कसली होती ?'

‘ मिसेस रक्स्टन आणि मेरी आहेत तरी कुठे ?’

असल्या मथळ्यानी उत्सुकता वाढू लागली.

कुण्या संपादकांनी सौ. रक्स्टनचा जुना फोटो छापला तर कुणी एका रम्य संध्याकाळी आपल्याच मूडमधे तालात पावलं टाकीत बापाबरोबरचा मुलीचा फोटो.हेडींग मात्र वेगळे ‘ सौ. अँडरसन यांची खळबळजनक साक्ष आणि फोटो खाली मजकूर ? आईच्या प्रेताची विल्हेवाट लावण्यापूर्वी मुलीला सौ. अँडरसन यांच्याकडे पोचवताना–डॉ. रक्स्टन !

’ खामोष ! आता येणारी साक्षीदार डॉक्टरच्या मानेभोवती फास आवळणारी होती.

**[ मायकेल हार्डवीक यांच्या ‘ डॉक्टर्स ऑन ट्रायल ’ या पुस्तकांतील ‘ डॉक्टर रक्स्टन ’ या खटल्याचा स्वैर अनुवाद ]**

**आता येणारी साक्षीदार
डॉक्टरच्या मानेभोवती
फास आवळणारी हाती.**

**कोण होती
ही साक्षीदार ?
काय सांगितले तिने ?**

# उत्तरार्ध

यापुढील
१५ ऑगस्ट अंकात



# पाक्षिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### दि. १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट १९७३

**उच्चपदस्थ नेत्यांना त्रासदायक काळ**

अमेरिकेचे अध्यक्ष निक्सन, पंतप्रधान इंदिरा गांधी व यशवंतराव चव्हाण यांचा मकर राशीशी संबंध असून भारताची रास देखील मकरच आहे. नुकताच रवि हा राजकारणी ग्रह कर्क राशीत आला आहे. त्याचबरोबर मंगळाचे मेष राशीत स्थलांतर झाले आहे. रवीचे हे स्थलांतर परिणामाच्या दृष्टीने फारसे लाभदायक ठरणार नाही. मात्र निक्सन यांच्यावरील 'वॉटरगेट'चे संकट बरेच सौम्य होऊ लागेल व त्याला कलाटणी मिळेल. भारतातील राजकारण थोडे अधिकच घसरेल पण शिरजोर बनलेले इंदिरानिष्ठ सुभेदार 'चूप' करण्यात श्रीमती इंदिरा गांधी थोड्याफार यशस्वी होतील. यशवंतराव चव्हाण यांचे स्थान उंचावण्याची शक्यता असून महाराष्ट्राच्या राजकारणात एखादी नवी व्यक्ती उदयाला येण्याची शक्यता आहे. दुसरा रवि पाकिस्तानच्या भुट्टोना वैचारिक दिवाळखोरीला प्रवृत्त करील. मध्यप्रदेशच्या सेठींना अनपेक्षित हादरे बसू लागतील. आपण स्थिर नाही ते त्यांना कळणार आहे. गुजराथमधील चिमणभाई पटेल यांचे मुख्यमंत्रीपद कुंभ चंद्रावर प्रस्थापित झालेले असल्यामुळे काही काळ स्थिर राहील पण परिस्थिती अस्थिरच राहील.

**मेष** : अधिकारात वाढ

सध्या तुमचे सारे जीवन शनि व मंगळ यांच्या हातात आहे. रवि सुखस्थानात थोडी कुरबूर करीत आहे व मंगळ तर व्ययस्थानी आहे पण मंगळ तुमचा राशीस्वामी आहे. त्यामुळे तो तुमचे वाईट तर काहीच करणार नाही रवि मात्र मातृसुखात थोडीफार अडचण निर्माण करील. राहत्या जागेबद्दल तंटा अगर कायद्याचा प्रश्न निर्माण होईल. ह्या पंधरवड्याचा दुसरा आठवडा तुम्हाला अधिक अनुकूल आहे. उद्योगाचे नवे क्षेत्र पादाक्रांत करण्यासाठी सहाय्य मिळेल. एखादी शासनातिल मोठी व्यक्ती मदतीसाठी उभी राहील· प्रगतीची चिन्हे चालू उद्योगधंद्यात दृष्टिपथात येऊ लागतील. इंजिनियरिंग व महसुक्त खात्यातील वरिष्ठ अधिकारी वढतीचे मानकरी ठरतील. बेकारांना याच क्षेत्रात नोकरी मिळेल. आर्थिक स्थिती प्रामुख्याने यावेळी सुधारणार आहे. प्रवास दि. ११ ते १५ या दरम्यान होईल. **महिलांस** : तरुणी प्रेमात पडतील. सार्वजनिक क्षेत्रात काम करण्याची संधी महिलांना मिळणार आहे, ¤

**वृषभ** : नोकरीत प्रगती

तुमचे हळवे व भावनावश मन भारी चंचल वृत्ती प्रकट करीत असते. त्यामुळे काही वेळा हाती येणारा लाभ हुकतो. पण मंगळासारखा समर्थ ग्रह अनुकूल आहे. त्यामुळे यावेळी तुम्ही आघाडीवर राहाणार आहात. नोकरीत अनेक बाबतीत तुमची उपेक्षा चालू होती. जाणूनबुजून तुमच्यावर अन्याय चालू होता. पण ही स्थिती नजिकच्या काळातच बदलणार आहे. तुम्हाला त्रास देणारे अधिकारी बदलून जातील व तुम्हाला अनुकूल असे अधिकारी गवसतील. तुमच्यापैकी कुणी सेवानिवृत्त होण्याच्या मार्गावर असतील तर ती सेवानिवृत्ती दुसऱ्या आठवड्यात रद्द होऊन तुम्हाला नोकरीवर पुन्हा ठेवले जाईल. बदली व प्रमोशनची केस जर पेंडिंग असेल तर ती यावेळी विचारात घेतली जाईल. उद्योग सुरू करायला अनुकूल काळ आला आहे. आर्थिक व तांत्रिक साहाय्य कमी पडणार नाही. चालू उद्योगात खास प्रगतीची संधी मिळेल. या राशीच्या कारखानदारांना उत्पादनाचा दुर्मिळ असलेला परवाना याचवेळी मिळेल व त्यांच्या औद्योगिक भवितव्याला 'रसाळ फळे' येतील. राजकीय नेत्याला 'बढती' मिळणार आहे. **महिलांस** : अभिनयाची आवड असेल तर कलाक्षेत्रात प्रवेश मिळेल. कीर्तीदेखील मिळण्याची संधी आहे. ¤

**मिथुन** : सामर्थ्याचा प्रत्यय येईल

रवि दुसरा होत आहे तर मंगळ अकरावा आहे. शनि तर राशीत आहे. खरे म्हणजे तुम्हाला एवढी अनुकूलता गेल्या कित्येक वर्षांत मिळालेली नाही. तेज आणि कर्तृत्व यांचे लेणे यावेळी तुम्हाला लाभले आहे. स्वत:भोवती न्यूनगंडाचे वलय निर्माण करून तुम्ही 'अंधार-अंधार' करीत बसला आहात ते सोडून बाहेर पडा म्हणजे प्रगतीची प्रसादचिन्हे तुम्हाला गवसतील. साडेसातीचा आता बाऊ नको. तुम्ही बुद्धिवान आहात. शुक्राचे सहाय्य यावेळी लाभले आहे. तुमचे लेखनगुण नवे तेज धारण करतील. उत्तम भाषा व अद्वितीय अशा कल्पना सुचतील. या लेखनाने तुमचे भविष्यकालीन व्यक्तित्व उजळून निघेल. नोकरीत असाल तर अधिकारात वाढ होण्याची शक्यता निर्माण होईल. दि. ७ ते १५ हा काळ लक्षात ठेवा. खाजगी नोकरांनादेखील हा काळ उत्तम आहे. परदेशी व्यापार करणाऱ्या लोकांचे आर्थिक जीवन भरभराटणार आहे. सर्वसामान्यपणे आर्थिकदृष्ट्या हा काळ अनुकूल आहे. लॉटरी व रेस फायद्याची ठरावी. अनेकांचे सहाय्य व सहानुभूती मिळण्याचा

योग आहे. आता दुःख व संकट इतिहासजमा होईल. **महिलांस :** अनेक दिवसांच्या आडदाराला पूर्णविराम मिळेल. उत्साह वाटेल. मन ताजेतवाने होऊ लागेल. ⌑

**कर्क :** प्रकाशमान काळ

तुमच्या कलावृत्तीला सध्या शनीने व केतूने ग्रासले असले तरी राशीतच चद्राला सहाय्य करायला आलेला एकटा रवि सारी प्रतिकूलता उधळून टाकायला समर्थ आहे. म्हणून तुम्ही साडेसाती सुरू झाली आहे या 'वास्तव कल्पने'तच निराश होऊन बसू नका. पहिला आठवडा तर फारच अनुकूल आहे. चैनीसाठी पैसा खर्च कराल. तसा पैसा तुम्हाला मिळेलही. व्यसनाच्या आहारी मात्र जाऊ नका. मित्र पारखून घेणे आवश्यक आहे. कुणाबरोबर आर्थिक व्यवहार करायचा असेल तर विचाराने करा. पार्टनर घेणे यावेळी फायद्याचे ठरणार नाही औद्योगिक क्षेत्रात एखादी उदार व श्रीमत स्त्री आपणहून तुम्हाला मदत करायला उभी राहणार आहे, एवढे तुमचे भाग्य यावेळी फळफळणार आहे. तुम्ही राजकारणी असाल किंवा राजकारणात पडण्याचे तुमच्या मनात असेल तर दुसरा आठवडा अनुकूल आहे. राजकारणात मोठे स्थान मिळणार आहे. लोकप्रियता व स्तुती वाटचाला येण्याचा योग आहे. कलावताला भाग्याचा योग आहे. उपेक्षित जीवन आता सपुष्टात येणार आहे. चित्रपट-नाट्यकलाकाराना खूप मागणी येईल. आर्थिक दु.स्थिती दूर होईल. नोकरीस हा काळ अनुकूलता निर्माण करील. **महिलांस :** या राशीच्या तरुण महिलांस रगभूमीवर व चित्रपटसृष्टीत झळकण्याची सधी मिळेल. लेखिका गाजतील. ⌑

**सिंह :** नेतृत्व मिळेल

मुळातच तुमचे व्यक्तिमत्त्व हे रविप्रधान गुणधर्माचे आहे हा धर्म आहे राजकारणाचा. राजकारण हे प्रधान अग व इतर सारे नतर. या पधरवड्यात राशिस्वामी रवि शनीच्या तावडीतून सुटका असून तो जरी कर्कराशीत व्ययस्थानी असला तरी तो तुम्हाला सहाय्यच करणार आहे. ससारात प्रसन्नतेचे नवे दालन उघडले जाईल. एखादा 'गोड जीव' जन्माला येईल. भाऊबदकीचे वाद मिटतील सारे अधिकार तुम्हाला मिळतील. दि. ४ ते १३ हा काळ मुद्दाम लक्षात ठेवा. अत्यंत महत्त्वाचा काळ आहे नोकरीत तुमच्या बुद्धीचे व कर्तृत्वाचे चीज होऊन महत्त्वाच्या कामावर नेमणूक होईल. नवी सधी मिळेल. बेकार तरुणांच्या महत्त्वाकाक्षेला प्रगतीचा मार्ग खुला होईल. राजकारणात आजवर तुम्हाला मागे सारणाऱ्यांच्या कारवाया थड पडणार असून त्याना क्षमा करण्याची संधी तुम्हाला मिळणार आहे. वारसदारीय तुमच्या हितसबधाचे योग्य सरक्षण होईल. वकील, संपादक, प्रकाशक याना हा काळ व एकूण पधरवडा प्रगतीचा जाईल. निवडणुकीस उभे राहिलेले—कोणतीही निवडणूक असो—जिंकले जातील व लोकाचे नेतृत्व करण्याची संधी त्याना मिळेल. जे विश्लेषणात्मक व राजकीय टीकास्वरूपाचे लिखाण करतात त्याचे लिखाण भलतेच गाजणार आहे. वक्तृत्व स्पर्धेत या राशीच्या विद्यार्थ्यांनी मुद्दाम भाग घ्यावा. **महिलांस :** नोकरीत असलेल्या महिलाना अनुकूल काळ आहे. चार पैसे हाती खेळतील. ⌑

**कन्या :** निराशा संपली

बुद्धी हा तुमचा मूलभूत धर्म असून सध्या तर गुरुचा या बुद्धीवर प्रभाव आहे. शनि दहावा तर रवि अकरावा आहे. खरे म्हणजे अतरिक्षातील बारा राशीपैकी फक्त तुमचीच रास आज खरी आघाडीवर आहे. कन्या ही रास सकटाची हे वचन खरे असले तरी हे सकट सघर्षाचे असते. संघर्ष निर्माण होतो व कुणीही हेवा करावा असे यश तुम्ही पदरात पाडून घेता. पण मंगळाकडे दुर्लक्ष करू नका. तुमची मानसिक दुर्बलता व निराशा वाढवण्याचा त्याने बांधलेला चंग एकटा रवि उधळून लावणार आहे. ऑगस्टचा दुसरा आठवडा या दृष्टीने प्रगतीचा जाईल. दुसऱ्या आठवड्यात आर्थिक प्रगतीचा वेग वाढणार आहे कर्जमुक्त होण्याची सधी तुमच्यापैकी अनेक भाग्यवताना मिळणार आहे बाळासाहेब, आपण लॉटरीचे तिकीट कधी काढलं की नाही? काढत नसलात तर यावेळी अवश्य काढा नशीब उघडण्याचे योग आहेत. तुम्ही शेतकरी असाल तर शेतीव्यवसाय तेजाळून जाईल, हाल सपतील. तुम्ही लेखक असाल तर तुमच्या लेखनाला भलतीच मागणी येईल आणि लेखक होण्याची तुमची महत्वाकाक्षा असेल तर या पंधरवड्यात एके दिवशी सकाळी उठताच तुमचे नाव प्रकाशात आलेले तुम्हाला दिसेल. नोकरीतील त्रास आता कमी होणार आहे. तुम्हाला त्रास देणारा अधिकारी शरमिंदा होऊन तुमच्या गुणाचे गुणगान गाऊ लागेल. त्याने केलेल्या कारवायाचा त्यालाच पश्चात्ताप होईल. मात्र चालू कामात बदल होण्याचा बरीच शक्यता आहे. **महिलास :** पाचवा गुरु तुमचे मनोरथ पुरे करणार आहे माहेरपणाचा योग येईल. ⌑

**तूळ :** भाग्योदय होईल

शुक्राची अनुकूलता आर्थिक जीवनाला प्रगतीची नवी दिशा दाखवणारा काळ आहे, नुकताच भाग्यात आलेला शनि तुमचा मित्र आहे व त्याने तुम्हाला सुखसमृद्धी देण्याचे ठरवले आहे. आता लहरी स्वभाव सोडा व धाडसी पावले टाका यावेळी जे जे कराल ते ते तुम्हाला यशाचे वरदान देऊन जाणार आहे. तुम्ही चित्रकार असाल तर तुमच्यातील कल्पकता विकसित होईल. तुमच्यापैकी एखादा हिरो दिसणारा तरुण चित्रपटसृष्टीकडे ओढला जाईल व त्याच्या अभिजात गुणाला चालना मिळेल. तुम्ही गायक व कवी असाल तर तुम्हाला रसिक प्रेक्षकवर्गाचे धन्यवाद मिळणार आहेत. प्रसिद्धीअभावी अडून राहिलेले लेखन पहिल्या आठदहा दिवसातच प्रसिद्धी मिळवील. उद्योग व्यवसायाच्या क्षेत्रात काही नवीन करण्याचा मार्ग खुला होईल. प्रामुख्याने बुध शुक्राचा योग खूपच फायदा करून देईल. कापड व्यापार तेजीत येईल. सौंदर्यप्रसाधने निर्माण करणाऱ्या कारखानदाराना परदेशातून आश्चर्यकारक मागणी येईल. सोन्याच्या व्यवहारात आर्थिक व्यवहार पिवळा होऊन जाईल. यावेळी हाती योजना असलेल्या कोणत्याही तरुणाने स्वतत्र उद्योगात उतरावे. त्याच्या योजनेचे व महत्वाकाक्षेचे चीज होईल. पैशामुळे अडून राहिलेली कामे हालू लागतील. नोकरीत पहिल्या आठवड्यातच तुमच्यावरील अन्याय दूर होईल महत्वाचे स्थान तुम्हाला मिळेल. वरिष्ठांशी मिळते जुळते घेणे हिताचे ठरेल. यावेळी या राशीच्या राजकीय नेत्यांना परदेशवारीचा योग आहे **महिलांस :** वगल्यात राहण्याची

इच्छा अनपेक्षितपणे पुरी होईल. जागेचा प्रश्न सुटणार आहे. ¤

## वृश्चिक : आर्थिक प्रगती

राशीस्वामी मंगळ याचे मेषेत घडलेले स्थलांतर हे तुम्हाला तर वरदानच ठरणार आहे. अहकार उग्ररूप धारण करणार असून अधिकाराच्या सामर्थ्यात कोणतेही क्षेत्र गाजवून सोडण्याचा योग यावेळी तुमच्या वाट्याला येणार आहे. तुम्ही सरकारी अधिकारी असाल तर जनतेच्या कल्याणाची योजना राववण्याचे अधिकार तुमच्याकडे येतील पण तुम्ही गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करणार आहात. अधिकाराचे दुरुपयोग करण्याचे विचार तुमच्या मनात बळावू लागतील. यावेळी तुम्ही विवेकशील राहण्याची व सयम बाळगण्याची फार आवश्यता आहे. प्रामुख्याने पोलीस-मिलिटरी या क्षेत्रात नोकरी करणाऱ्यांनी ही दक्षता घ्यावी. तरी पण वृश्चिक राशीला पधरवडा खूप अनुकूल आहे. पैशाची तगी कमी होईल. प्रामुख्याने दुसरा आठवडा त्यातल्यात्यात जास्त अनुकूल आहे. उद्योगातील सप व घसरगुडी थाववण्यात यश मिळवाल. कर्ज-कर्ज असे जे चालू आहे ते थावणार आहे. प्रयत्नाने गरजेपुरता पैसा मिळेल. घर स्थावर जमिनीचे व्यवहार फलदायी होतील. प्लॉट घेण्याची इच्छा अनुकूल मार्ग दाखवील. चालू व्यवसाय क्षेत्रात सुधारणा होईल. बरेच दिवस अपुरी राहिलेली देशांतराची व प्रवासाची इच्छा पुरी होईल. राजकारणातील युक्त्या यशस्वी होतील एखादा भाग्यवंत पुत्र सुखाचा आनद देखील लुटू शकेल. एकदरीत हा काळ आनद देणारा ठरणार आहे. **महिलांस :** मूळची भाडणाची वृत्ती अधिक उग्र बनणार आहे. संयम राखा. नाहीतर भलताच प्रसग येईल. ¤

## धनू : संसारात आनंद


रवि आठवा आला आहे तो जरी काही अंशी तब्येतीला त्रासदायक ठरणार असला तरीदेखील तुमची सद्य स्थिती ताळचावर ठेवण्याइतका तो तुम्हाला सहानुभूती निश्चितच दाखवील. रक्तदाब, मानसिक दौर्बल्य, भीती–धाकधूक असे काही तरी घडत असल्याचा सशय मनाला व्यग्र करील. प्रत्यक्षात वाईट असे काहीच घडणार नाही. शारीरिक त्रास तसा तुम्हाला नाहीच मुळी. फक्त मनाचा चालू असलेला खेळ दुसऱ्या आठवड्यात सपणार असून तुम्ही 'खडखडीत' व्हाल. आठवा रवि आर्थिक स्वास्थ मात्र छान देणार आहे. लॉटरीत बक्षिस मिळण्याचा योग याच काळात सामर्थ्यवान आहे. वारसाहक्काने जमीन अगर पैसा हा रवि तुम्हाला मिळवून देणार आहे. पण तुमच्या प्रगतीची सारी सूत्रे आहेत मगळाच्या ताब्यात. हा प्रगतीकारक पाचवा मंगळ तुमच्या कौटुबिक व्यवसायिक व आर्थिक जीवनात प्रगतीचा नवा पर्वकाळ निर्माण करणार आहे. तुमच्या बौद्धिक व कल्पक चमत्काराच्या पताका फडकणार आहेत. लेखक म्हणून तुम्हाला नवे सामर्थ्य प्राप्त होणार आहे. अनेकाचे लक्ष तुमच्या कर्तबगारीवर केंद्रित होणार आहे. प्रामुख्याने दि. ४ ते १३ हा काळ महत्त्वाचा ठरेल. अपुरे लेखन पुरे होईल. दुरावलेले नातेवाईक पुन्हा जवळ येतील. महत्त्वाकांक्षेचे स्फुल्लीग प्रदीप्त होतील. आर्थिक बाजू भक्कम होईल. नोकरीत ताण वाढेल; पण चीज होईल. वरिष्ठांची सहानुभूती लाभेल राजकीय क्षेत्रात पक्के पाऊल रोवण्यात यश मिळेल. **महिलास :** सताप अनावर होईल. पण हातून वाईट काहीच घडणार नाही. भावाकडून आर्थिक बक्षिसी मिळेल. ¤

## मकर : आशादायक चाहूल

मंगळाने सुखस्थान बळकावले आहे म्हणून गागरून जाण्याचे यत्किंचीतही कारण नाही. मगळ तुमचा स्नेही आहे, त्यामुळे तुमचे नुकसान करण्याचे त्याच्या मनातही येणार नाही. उलट झाला तर त्याचा फायदाच होईल. उलट सातव्या रवीची व सहाव्या शनीची त्याला उत्तमपैकी साथ लाभणार आहे. त्यामुळे हा पधरवडा तुम्हाला प्रगतीची चाहूल देणारा व निराश अधारात प्रकाशाची ज्योत देणारा ठरणार आहे. दि. २ ते ७ व दि. ११ ते १३ ऑगस्ट हा काळ प्रगतीला उपकारक ठरणारा आहे. तुम्ही आध्यात्मिक गुरुंचे शिष्यत्व पत्करले असेल किंवा तुम्ही 'आत्मप्रत्ययाची' इच्छा धरली असेल तर ते स्वप्न या काळात सफल होईल. भविष्यातील सूचक घटनांचे वेध तुम्हाला सहज लागू लागतील. घरगुती जीवनात आनद मिळवू शकाल. नोकरीत घसरलेली परिस्थिती सुधारू लागेल. तुमचा सुटलेला धीर पुन्हा प्राप्त होईल. राजकारणात तुमचा प्रभाव पकड पुन्हा प्रस्थापित होऊ लागेल. औद्योगिक व व्यापारी क्षेत्रातील अनेक पेचप्रसग उकलण्यासाठी योग्य व्यक्तीचे मार्गदर्शन तुम्हाला लाभू शकेल. चार पैसेही हाती खेळतील. परदेशी प्रवासाचा योग मात्र फारसा यश देणार नाही व राजकारणात मनाविरुद्ध घटना घडू लागतील. **महिलांस :** सयम व शहाणपण उपयोगी पडेल. नोकरीत विरोध जिंकू शकाल. ¤

## कुंभ : तेजस्वी काळ

शनीचे मिथून राशीत घडलेले आगमन म्हणजे तुमच्या भविष्यकालीन भाग्यदायक काळाचे प्रसादचिन्हच होय. शनी हा तुमच्या राशीचा मालक आहे. तो पाचवा झाला आहे व मगळाने तिसरे स्थान म्हणजे कर्तबगारीचे क्षेत्र सामर्थ्यवान बनवलेले आहे. पहिला आठवडा यशाचा तर दुसरा आठवडा लाभाचा आहे. यावेळी कोणताही विरोधक तुमचा मार्ग रोखू शकणार नाही. त्याला पराभूत व्हावे लागेल. राजकारणात अकल्पित असा अनुकूल प्रत्यय येणार आहे. आमदाराना व खासदाराना 'चलति'चे दिवस आहेत. या या राशीच्या राजकारणी नेतृत्वाला बढतीचा योग आहे. 'मत्रिपदाची झूल' अगावर पडण्याची खूप शक्यता आहे. पत्रकाराच्या लेखणीला धार चढणार आहे. नोकरीत उत्तमपैकी योग आहेत. दुसऱ्याच्या अधिकारावर आक्रमण करून त्यांचे 'वजन' कमी करण्यात यश मिळवाल. बेकार असाल तर रासायनिक कारखान्यात अगर पोलाद व्यवसायात नोकरी मिळेल. महसुल खाते, बांधकाम खाते व जमिनविषयक कामाशी सबधीत अशा नोकरीत व्यक्ती 'आड मार्गाने' खूप पैसा बिनधोकपणे मिळवणार आहे. अगदी गरिब व्यक्तीचे भाग्यदेखील उजळणार आहे. मात्र बेदरकार व बेपर्वा वृत्ती कावूत ठेवली नाही तर यशाच्या भरात दुसऱ्याचे नुकसान हातून घडेल. **महिलांस :** 'सासूपणा' गाजवण्याची वृत्ती जागी होईल. मान मिळवून देणारा काळ आहे. ¤




# आपण असे आहात !

वरील आकृतीस दर्शविल्याप्रमाणे आपल्या कुंडलीत चद्र असेल तर आपण आपल्या भावी जीवनात सुखी व्हाल असे समजावे.

आपला स्वभाव शात असेल. आपणास धकाधकीच्या मामल्यांपासून चार पावले नेहमी दूर राहावे असे वाटेल. भांडण-तटा, हाणामाऱ्या यांचा आपणास तिटकारा राहील. आपण अगदी अहिंसावादी बनाल. आपण स्वच्छतेचे भोक्ते बनाल, आपला पोषाख नेहमी पाढराशुभ्र अगदी स्वच्छ कडक इस्त्रीचा ठेवण्याकडे आपला कटाक्ष राहील. रगीत कपडयापेक्षा पाढरे कपडेच आपणास फार प्रिय राहतील त्याचप्रमाणे आपण स्त्री असाल तर आपणास, विशेषत: मोत्याचे दागिने, खडयाच्या अंगठ्या वापरणे जास्त आवडेल.

आपली प्रकृती मात्र शीत राहील. उन्हाळयात तुमची प्रकृती उत्तम राहील. परतु पावसाळा व हिवाळा यात आपणास सर्दी व पडसे यापासून फार त्रास होईल. आपला चेहरा गोल व सुस्वरूप राहील. शरीरबांधा उच व सडपातळ असेल. परंतु हा चंद्र जर मकर किंवा धनु राशीत असेल तर आपण स्थूल बनाल.

आपले वैवाहिक जीवन सुखाचे जाईल. आपणास पती अथवा पत्नी अगदी अनुरूप व प्रेमळ लाभेल व आपला विवाह प्रेम सबध जमून होण्याचा सभव फार आहे. धनयोग दृष्टया हा चद्र फार उत्तम समजावा. आपणास या चद्रामुळे यश, कीर्ती व धन याची प्राप्ती होऊन आपण जीवनात यशस्वी व्हाल.

अशा प्रकारच्या लग्नी चंद्र कोणत्याही पापग्रहाने बिघडलेला मात्र नसावा.

**एन् आर साळवी**, पनवेल

**मीन : समिप अनुभव**

एकटा पाचवा रवी हाच काय ते सध्या सध्या तुमचा तारक ग्रह बनला आहे. अकरावा गुरु आर्थिक जीवनाला स्वास्थ व स्थैर्य मिळवून देण्याचा आटोकाट प्रयत्न करील. पण परिश्रम व कष्ट याचे गणित जमणे कठीण होईल. गतकालिन अशी एखादी जामिनकी अंगाशी येण्यासारखी घटना घडू शकेल. पण शेवटी गुरु त्यातून तुम्हाला सहीसलामत बाहेर काढील. राजकारणात मात्र तुमचे स्थान बरेच उचावणार आहे. स्थिरावणार आहे. भोगलेले हाल मूल्यवान ठरतील. राजकीय पेन्शन, मान-सन्मान लाभेल. दि. २ ते ६, दि. ८ ते ११ व दि. १४–१५ हा काळ विशेष महत्त्वाचा ठरावा. विरोधकाकडून सहकार्य मिळेल. नोकरीत बढती व स्थित्यतर घडेल. बेकारांना उच्चदर्जाची व स्थैर्य मिळवून देणारी अशी नोकरी मिळेल. स्वतंत्र उद्योग धद्याचे नवे क्षेत्र हाती येईल. पैसा व मार्गदर्शन लाभेल. शेतजमिनीचा व्यवहार फायदेशीर ठरेल. कोर्टाचे निकाल अनुकूल असलेले. प्रवासातील अडथळे दूर होऊन ईप्सित साध्य होईल. एखादी महत्वाची व्यक्ती तुमची मित्र बनेल. महिलांस . नोकरीत त्रास, उद्योगाला प्रगती. तीर्थयात्रा घडेल.

# रंगभूमी

## मुक्काम पुणे — मुंबई

### देखण्या एकांकिका

पुण्यनगरीच्या सांस्कृतिक रथाला औद्योगिक चक्राचा वेग एका बाजूने लाभत आहे. मात्र पुणे आपली संस्कृती, वैशिष्टये टिकवून आहे. म्हणूनच की काय ह्या गतिमान चक्राला 'वगण' म्हणून एकांकिका, भजन, चित्रकला, मासिके इ. विविध स्पर्धा घेतल्या जात आहेत. प्रतिवर्षी शे-दिडशे कलावत व तंत्रज्ञ एकाहून एक सरस एकांकिका सादर करतात.

कामगार जगातील हा सांस्कृतिक उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यास जे कोणी पुढाकार घेतात त्यात श्री. अनंत ओक ह्याचे नाव प्रामुख्याने घ्यायला हवे. नट दिग्दर्शक, एकांकिका लेखक ही अनतरावांची रगभूमीविषयक सेवा. जोडीला आजवर सेवा केली कारखान्याची. प्रसंगी पदरमोड करूनदेखील रंगभूमीची सेवा करण्याबद्दल त्यांचे अभिनंदन करायला हवे. त्यांना साथ मिळते सर्वश्री केशव घुले व रघुनाथ माटे ह्यांची. ह्या लोकांची जिद्द मोठी वाखाणण्यासारखी आहे. यदाचेच उदाहरण घ्या. यंदा मे महिन्यातील पहिला पंधरवडा औद्योगिक क्षेत्रातील अस्थिर वातावरणात व दुसरा पंधरवडा जातीय दंगलीमुळे एका गढूळ वातावरणात गेला. पण ही कार्यकर्ती मडळी डगमगली नाहीत. त्यांनी जूनचा पहिला आठवडा स्पर्धेसाठी निवडला. गावातील थिएटर मिळेना म्हणून गावाबाहेरील ओपन एअर थिएटर घेतले. आता पावसाने थोडा त्रास दिला. परतु एकांकिका स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडल्या. आता परीक्षक छत्रीत व प्रेक्षक पावसात हा मात्र उत्साहाचा अतिरेक वाटला पुढील वर्षी सयोजक असा प्रसंग येणार नाही याची खबरदारी घेतील अशी खात्री आहे.

पारितोषकविजेत्या व उल्लेखनीय अशा चार एकांकिकाचे प्रयोग नुकतेच भरत-नाट्य मंदिरात झाले. पैकी तीन मराठी व एक हिंदी एकांकिका होती.

'काळवेळ' ही दुसऱ्या क्रमांकाची एकांकिका सादर केली व्हीजन इडिया कपनीने रत्नाकर मतकरी ह्यानी लिहिलेली ही एकांकिका रहस्यमय आहे. दिग्दर्शनाचे दुसरे व सर्वोत्तम कलाकाराचे तिसरे पारितोषक असा दुहेरी मुकूट लाभला श्री. विनायक गोडबोले ह्यांना.

यातील सर्वोत्कृष्ट भूमिका पाहुणी कलावंत ज्योती चादेकर हिची होती. मुके जनावर घाणीतून येते त्याबद्दल व्यक्त होणारा तिरस्कार, बदफैली नवऱ्याबद्दल वाटणारी घृणा, सूडाने बेभान झाल्याने तिने खुनाचा रचलेला डाव सारं कसं ह्या अभिनेत्रीने नेटकेपणानं दाखवलं. तीच गोष्ट डॉक्टराच्या भूमिकेबद्दल विनायक गोडबोलेंची, मात्र ते बरेच वेळा हळू बोलत होते, क्वचितप्रसगी त्यांच्या अभिनयात कॉन्शसनेस वाटला.

'आम्ही सौजन्यात आहोत' ही तिसऱ्या पारितोषकाची एकांकिका. वसत सबनीसाचे लेखन. विनोदी सवादाला विनोदी नट मुरलीधर राजूरकर यांचा अभिनय व विनोदी भूमिकेबद्दल प्रसिद्ध असलेले नारायण भावे याचे दिग्दर्शन. तेव्हा ती देखणी न होती तरच नवल वाटले असते. भाडकुदळ म्हणून प्रख्यात असलेल्या एका दांपत्याने एक मास सौजन्यात रहाण्याचा मानस व्यक्त केला. परंतु मूळ स्वभाव जाईना. न्यायाने ते कसे फजित पावतात हे एकांकिकेत छान रेखाटले आहे. नानी (मीना घोटीग) ह्याचा अभिनयदेखील उल्लेखनीय वाटला. विशेष करून सदर एकांकिकेचे सांघिक काम सुरेख वठले. स्पर्धेचा प्रयोग विशेष रंगला. त्यामानाने परवाचा प्रयोग तेवढा चांगला वाटला नाही. याचे प्रमुख कारण सदाशिवच्या भूमिकेतील शाम जोशी ह्याचे सवादाचे विस्मरण. ही एकांकिका नानाचे कुटुब एकसारखे भाडत रहाते येथेच संपवली तर अधिक परिणामकारक होईल ही सूचना. कारण त्यापुढील भाग कृत्रिम, ओढूनताणून रेखाटल्यासारखा वाटतो. भारत फोर्जने ही एकांकिका सादर केली.

'सत्य' ही द्विपात्री एकांकिका. दुसरा इसमच्या भूमिकेतील विजय कुलकर्णी यांचा सहजसुदर अभिनय हे या एकांकिकेची वैशिष्टये. प्रेयसी व वेश्या ह्यांची वाट पहाणारे दोघे इसम योगायोगाने बागेतील एकाच दिव्याच्या खांबाजवळ येतात. प्रेमाबद्दल उदात्तपणे बोलणारा पहिला इसम तर जीवनाबद्दल बेछूटपणे विधाने करणारा दुसरा इसम म्हणजे दोन टोके. त्या दोघाची 'ती' ही एकच निघावी हे यातील नाट्य. एकांकिकेची निवड छान होती. अॅटलास कॅपकोने ही एकांकिका सादर केली.

'लक्ष्मीका स्वागत' हिंदी एकांकिकेतील प्रथम पारितोषक प्राप्त एकांकिका डॉ. बेक अॅण्ड क. ने सादर केली. दिग्दर्शक, सर्वोत्तम कलावत पारितोषकाचे मानकरी ठरले श्री. शरद वर्तक. प्रतिकात्मक नेपथ्याचा अचूक वापर, हिंदीचे सुरेख उच्चार, पाहुणी कलावत आशा गाडगीळ ह्याची साथ ही, ह्या एकांकिकेतील वैशिष्टये. एका कुटुंबातील लहान अपत्य मृत्युशय्येवर पडलेले असते. त्या मुलाचा बाप रोशन मुलाचा जीव वाचवण्यासाठी माशासारखा तळमळत असतो. त्या मुलाचे आजोबा, आजी मात्र त्या मुलास दुसरी आई लक्ष्मीच्या रूपाने सून आणण्यासाठी धडपडत असतात. हा सघर्ष नाटकभर सुरेख खेळवला आहे रोशनच्या भूमिकेत शरद वर्तक शोभून दिसले.

औद्योगिक एकांकिकेचे हे आहे असे स्वरूप. आता थोडया अपेक्षा. लेखनासाठी अद्यापही फारच थोडी हस्तलिखिते येतात याचा सयोजकांनी व कामगारवर्गाने विचार करावा. स्पर्धेत पाहुणे कलावत घेण्यास आता परवानगी आहे तेव्हा कामगारानीच दिग्दर्शन व अन्य गुणाचे प्रकटीकरण करावे. अन्यथा इतरांच्या आक्षेपांना तोड द्यावे. त्याच त्या एकांकिका न निवडता काही नवीन प्रयोग व्हावेत ही अपेक्षा. प्रथम क्रमाकाची एकांकिका 'सूर्यास्ताच्या अतिम किरणापासून' निवडक एकांकिकेत सादर झाली नाही हे खटकले.

**—दत्ता श्री. टोळ**



सूर्यास्ताच्या अंतिम किरणापासून सूर्योदयाच्या प्रथम किरणापर्यंत एकांकिकेतील स्त्री कलावंत

छोटया मंडळींना शिस्त लावण्याचा कार्यक्रम आय. एन्. टी. नाटयशाळा



# ऐन पावसाळ्यात टच ऑफ ब्राइटनेस

मुंबईच्या पावसाळी कुंद हवेतच छोटया छोटया नाटयसंस्थांची, येणाऱ्या सरकारी नाटयस्पर्धेची तयारी चालली आहे. सहा ऑगस्टपर्यंत कागदोपत्री नाटक निश्चित करायचे आहे. त्यामुळे जुन्या नाटकाची नवी रूपांतरे, इंग्रजी नाटकाचे स्वैर मराठीकरण, कुठे अनेक वर्षे अपुरे पडलेले नाटक पुरे करणे – कुठे नव्या नाटकाचा पहिला अंक नमुन्यादाखल सादर करणे, याची धामधूम सुरू आहे. इकडे, येणाऱ्या नाटयस्पर्धेची तयारी चालू झाली आहे आणि तिकडे ' रविंद्र नाटयमंदिरा 'त गतवर्षीच्या स्पर्धेतील निवडक कलावंतांच्या सरकारी नाटय शिबिरात विजया मेहता आणि व्यवस्थापक नाना गांगुली यांची धावपळ चालू आहे. व्याख्यानसत्रांतून बाहेर पडून शिबिरार्थी सदानंद रेग्यांचे ' जयकेतु ' visual enactment च्या पद्धतीने बसवीत आहेत. एकूण हल्ली रेग्यांना दिवस चांगले आले आहेत. ' गोची ' गाजते आहे. तोच ' जयकेतु 'चा हा प्रयोग. आणि ' सेंट्रल लायब्ररी 'च्या पायऱ्यांवर करण्यात येणारा ' इडिपस 'चा प्रयोग तालमीत आहे. कुणीतरी स्पर्धेसाठी ' ब्रान्द ' घेणार अशीही वार्ता आहे !

पायऱ्यांवरून आठवण झाली...श्रावण महिना दूर असतानाच बाबुलनाथच्या पायऱ्या चढून आम्ही I. N. T. च्या वर्कशॉपमध्ये गेलो. बाहेर पाऊस आणि देवळातल्या घंटांचा आवाज...वर्कशॉपमध्ये नाटयशाळेत आलेल्या छोटयांचा किलबिलाट ! वनलता मेहता पदर कसून छोटयांना शिस्त लावीत होत्या. त्यांना म्हटले आज संध्याकाळचा कार्यक्रम ? आमच्या ' मूरखराज 'मध्ये भूमिका करणाऱ्या कलावंतांवर इतर विद्यार्थी ' केस करून ' खटला चालवणार आहेत. मनात आलं

प्रत्येक व्यावसायिक निर्मितीतील कलावंतांना असं पिंजऱ्यात उभं राहावं लागलं तर...
मनसुखभाई जोशी एका भल्यामोठ्या पिंजऱ्याशी खटाटोप करीत होते. एका संध्याकाळच्या गमतीसाठी नक्कीच तो तयार केलेला नसणार...

' मनसुखभाई ' टच् ऑफ ब्राइटनेस 'च्या तालमी कुठे चालल्या आहेत ?'

'अरे...तुम्ही कसं ओळखलंत ? हा त्याचाच सेट उभा करतोय, तालमी बिर्लाला चालल्या आहेत.'

हे I. N. T. चे वर्कशॉप मराठी माणसाच्या हेव्याचा विषय आहे. अलिबाबाच्या गुहेसारखे – असंख्य गोष्टींनी भरलेले. नाटकाचे विविध सामान नीट लावून ठेवलेले – भिंतीवर चित्रविचित्र मुखवटे – नव्या सेटस्‌ची ठोकाठोक चाललेली आहे. आमच्या प्रायोगिक संस्था मागच्या प्रयोगाचा सेट ठेवायला जागा नाही म्हणून त्याला सरळ काडी लावतात. न रहावून मी मनसुखभाईंना म्हटले, ' काय छान जागा आहे !'

' हो, पण दरवेळी ८५ पायऱ्या चढाव्या लागतात.'


' टच् ऑफ ब्राइटनेस 'च्या तालमीकडे जाताना आधीच पाहिलेला सेट मनात उभा होता.


प्रताप शर्मा : हे नाव उच्चारल्यानंतर आज ' फिर भी ' आठवतो. पण अनेक वर्षांपूर्वी या पोरगेल्या नाटककाराच्या ' Touch of Brightness ' या नाटकाने मुंबईत खळबळ माजवली होती. बाळासाहेब देसाईंच्या ऐन कारकिर्दीत राष्ट्रकुल नाट्यमहोत्सवासाठी निवडले गेलेले हे नाटक मुंबईतच अडविण्यात आले. कारण या नाटकात वेश्यांचे जग-पोलिस-मुंबईच्या रस्त्यावरील जीवन, याचे विदारक चित्रण होते. भारताच्या अब्रूरक्षणार्थ पदमसी, झुलवेलानी, विजया मेहता, फ्रेडी मेहता यांचे पासपोर्ट अडवण्यात आले. पु. ल. देशपांड्यांसारख्या मातब्बर असामीने



प्रताप शर्मा म्हटल्याबरोबर आज फिर–भी आठवतो पण अनेक वर्षांपूर्वी या पोरगेल्या नाटककाराच्या त्या नाटकाने मुंबईत खळबळ उडवून दिली होती.

टच ऑफ ब्राइटनेस तालीम चालू असताना....
प्रताप रॉय आणि फरिदा वकील





वेश्यांसाठी पिंजरा

‘लोकसत्ते’तून नाटकाविरुद्ध आपला आवाज उठवला. मुंबईतील कलाकार महोत्सवाला जाऊ शकले नाहीत. पण नंतरच्या वर्षात इंग्लंड व इतर ठिकाणी मान्यवर संस्थांनी या नाटकाचे अनेक प्रयोग केले. B. B. C. वरील Third Programme वर रविशंकरच्या पार्श्वसंगीतासह ते सादर केले गेले. अनेक वर्षांनी, भारतीय न्यायालयात नेहमीप्रमाणे सरकारचा पराजय झाला – लेखक विजयी झाला. प्रताप शर्मांचे नाटक कायद्यातून मुक्त झाले ! मध्यंतरीच्या या वर्षात शर्मांना स्वतःविषयी विश्वास वाटू लागला – यावेळी नाटकाचे दिग्दर्शन स्वतःच करायचे त्यांनी योजले आहे.

‘बिर्ला क्रिडा केंद्रा’त तालमीच्या जागी प्रताप शर्मा भेटले त्यावेळी जरा दिलगिरीच्याच सुरात ते म्हणाले, ‘पदमसी अनुभवी कलावंत आहे – पण मला हे नाटक माझ्याच पद्धतीने करायचे आहे.’


आम्ही गेलो त्यावेळी बिर्लाच्या आलिशान वातावरणात एका कोठीवालीचा दरिद्री संसार मांडलेला होता. प्रताप शर्मा एका झक्क ‘अम्मा’ दिसणाऱ्या मुलीला विडी ओढायला शिकवत होते.

‘या नाटकात काम करायला स्त्री कलावंत कसे मिळाले ?’ या प्रश्नाला सौ. शर्मांकडून उत्तर आले, ‘नको तितक्या अभिनेत्री या नाटकात काम करायला तयार होत्या. अजूनही सारखे फोन येतात.’

शर्मा चटकन् म्हणाले, ‘अहो मुख्य प्रश्न मला Sophisticated नटी नकोच. ज्या इंग्रजी भारतीय भाषेच्या ढंगाने बोलतील अशाच मुली मी निवडल्या.’

दीना पाठक-तारक मेहता यांची वाट पहात सगळे थांबले होते. तोपर्यंत प्रताप शर्मा छोट्या प्रवेशातील बारिक-सारिक प्रतिक्रियांवर सफाईचा हात फिरवीत होते. त्या तालमीच्या ठिकाणी असणारा जुना हॅण्डलवाला फोनो, शर्मांनी दाखवलेले काही रंगीत तालमीचे फोटो पाहाता पाहाता प्रभातच्या ‘माणूस’चे, ‘न्यू थिएटर्स’च्या चित्रपटांच्या वातावरणाचे स्मरण झाले. येत्या ऑगस्टमध्ये ‘टच् ऑफ ब्राइटनेस’ आणि डॉ. लागू बसवित असलेले एलकुंचवारांचे ‘गार्बो’ पाहायला मिळणार या अपेक्षेच्या आनंदात बिर्लामधून आम्ही बाहेर पडलो. कधीतरी ‘गार्बो’च्या तालमीकडे वळायला हवे हा पत्रकारी विचार होताच मनात !

सिगरेट अशी ओढायची.... दीना पाठक, तारक मेहता, डॉली ठाकूर



# अवांतर

**–प्रतिनिधी**

## हेमाजी दौऱ्यावरून परतल्या

आज एकदम टॉपला असलेला नंबर एकचा नायक कोण ? असा प्रश्न विचाराल तर मंडळी उत्तर द्यावे लागेल, आज एकदम टॉपची जागा रिकामी आहे. बाबू मोशाय राजेश खन्ना यांनी जागा खाली करून ठेवली आहे आणि त्या जागेवर अद्यापी कोणी हक्क सांगितलेला नाही. गुड्डीबरोबरची शादी आणि जंजीरचे तुफानी यश यामुळे अभिताभ बच्चनने भली मोठी उडी मारली असली तरी अजून तो त्या जागी पोचलेला नाही. आता नायीकांच्या बाबतीत म्हणाल, तर मात्र एकमुखी जबाब आहे. हेमा मालिनी एकदम टॉप !!

तर अशी ही एकदम टॉपला असलेली सपन सुंदरी अमेरिका, कॅनडा, वेस्ट इंडिजचा दौरा करून परत आली. आता ही एवढी मोठी नायीका दौऱ्यावरून आल्यावर बाईंनी तिकडे काय पराक्रम केले, हे तमाम मंडळींना समजलेच पाहिजे. या हेतूने बाईंच्या मातोश्रींनी एक झकास फिल्मी पत्रकारांना ' रुचेल ' अशी शानदार पार्टी दिली. आता एवढी मजबूत खळखळती पार्टी असल्यावर मंडळींच्या लेखण्या सरसावल्या नाहीत तरच नवल. बाई दौरा यशस्वी करून आल्या पण तिथल्या भारतीयांनी म्हणे त्यांना खासा इंगा दाखवला.

परंपरागत भारतीय नृत्याचे दर्शन घडवण्यासाठी आपल्या सवंगड्यांसह हेमाजी या दौऱ्यावर गेल्या. भारतीय शास्त्रशुद्ध नृत्य हेमाजींना आवडत असले, तरी परदेशामध्ये त्यांची इमेज आहे ती एक चित्रपट नायीका म्हणूनच. स्वभाविकपणे पडद्यावर बाई जशा नाचतात, तसले राजा-जानी टाईप नृत्य झाले पाहिजे, अशी आरोळी काही कार्यक्रमाला आलेल्या भारतीयांनीच ठोकली. व्हँकूव्हरच्या कार्यक्रमामध्ये तर कहरच झाला. हेमाजींनी अंगसे अंग लगाले थाटाचे बॉल नृत्य करावे अशी बहुधा प्रेक्षकांची आपेक्षा असावी. त्यांनी काय करावे, मंडळी चक्क एका



गटाने रंगमंचावर दाखल झाली आणि एकच गोंधळ उडाला. अर्थात नोंदण्यासारखे किस्से हेच. कारण बाकीच्या कार्यक्रमांना उदंड गर्दी, बाईंचे भरपूर कौतुक. पुन्हा पुन्हा कार्यक्रम सादर करण्याची फर्माईश. या एकंदर प्रकाराचे तात्पर्य काय : भारतीय कुठेही गेला, अगदी सातासमुद्रापलिकडे जरी गेला तरी त्याच्या मूळ वृत्तीमध्ये फरक पडत नाही.

हो ! दौऱ्यातील आणखी एक योगायोगाचा भाग म्हणजे हेमाजींच्या या दौऱ्याच्यावेळी फिल्मी दुनियेतले मशहूर बिहारी बाबू शत्रुघ्न सिन्हा हेमाजींच्या या दौऱ्याचेवेळीच अमेरिकेमध्ये हजर होते आणि दोन-तीन कार्यक्रमांना त्यांनी जातीने उपस्थिती लावली.

आणि दुसरी नोंदण्यासारखी गोष्ट म्हणजे आमेरिकेमध्ये स्थायीक झालेल्या पद्मिनीच्या घरी हेमाजी आणि सोबतचे कुटुंबीय यांनी यथेच्छ पाहुणचार झोडला आणि अस्सल ' शाकाहारी ' मेजवानीची मौज लुटली.

### छे ! मी मुळी आत्महत्याच केली नाही

खाजगी आयुष्य ही वास्तविक पाहता ज्याची त्याची खाजगी बाब. पण आमच्या फिल्मी सिताऱ्यांचे खाजगी आयुष्य हेच त्यांच्या सार्वजनिक आयुष्यापेक्षा जास्त चर्चेचा विषय. त्यामुळेच जुहूच्या एका हॉटेलामध्ये जेव्हा रेखाबाई चक्क बेशुद्ध पडल्या तेव्हा तेथेच चित्रीकरणाच्या निमित्ताने आलेल्या गुरुदत्त फिलमस्च्या मंडळींची एकच धावपळ उडाली. ' आरोप ' या चित्राचे चित्रीकरण थांबवून आत्मारामजींनी बाईंना हॉस्पिटलमध्ये पोचवले. त्यांच्या घरी ही वार्ता कळवली. आता ही असली वार्ता लपून थोडीच राहणार. चक्क ' न्यूज एजन्सी ' मार्फत ती सर्वत्र वितरीत झाल्याने ज्या कोणापर्यंत ती पोचायला पाहिजे होती त्या मंडळींपर्यंत जाऊन अचूक पोचली. मर्यादित आत्महत्येच्या प्रयत्नामध्ये असलेल्या बाई जेव्हा शुद्धीवर आल्या त्यावेळी त्यांच्याही



परदेश दौरा संपवून हेमाजी सेटवर दाखल झाल्या.
हेमा मालिनी, दुर्गा खोटे, नारंग, रजिता ठाकूर नव्या शॉटची चर्चा.

. . . तर मी इथे आलोच नसतो.
रेखाची प्रामाणिक कबूली आणि मेहरासाहेब अडचणीत.



कानावर स्वतःच्या आत्महत्येची बातमी गेली. बातमीचा पुरेसा गवगवा झाल्यावर बाईंनी घोषणा केली-मी केली ती आत्महत्या नव्हतीच. अन्न विषबाधा झाल्यामुळे आपल्याला ग्लानी आली आणि अकारण आत्महत्येची हूल उठली. आता एवढा जबरदस्त खुलासा केवळ पत्रक काढून थोडाच पोचणार आहे. त्यासाठी पत्रकार परिषद हवीच ?

'आपण केली ती आत्महत्या नव्हती '– हे सांगण्यासाठी– बाईंनी शानदार पत्रकार परिषद घेतली. या परिषदेच्या वेळी उमदा, आणि सध्या– सर्वांना हवाहवासा वाटणारा विनोद मेहरा हजर होता. मागून खाजगीमध्ये बोलताना तो म्हणाला, रेखा असले काही करणार आहे अशी कल्पना मला असती तर मी आलोच नसतो. रेखाने काय केले ? तिने याच पत्रकार परिषदेमध्ये चक्क सांगून टाकले, आपले विनोद मेहरावर प्रेम आहे. आता हे असे– उतू जाणारे प्रेम असल्यामुळे स्वाभाविकपणे लग्नाची घोषणा होईल अशी अपेक्षा होती. तथापी तसे– काहीच झाले नाही. कदाचित अजीर्ण होण्याइतकी लग्ने अलिकडील काळामध्ये झाली असल्यामुळे विवाह घोषणा झाली नसावी. विनोद तर म्हणतो अजून– आपल्याला लग्नच करायचे नाही ! दोन–चार वर्षांनी बघू. आम्हाला प्रश्न इतकाच पडतो की या पत्रकार परिषदेने नेमके साधले काय ?

## गेला महिना

महिनाभरामध्ये पाहिलेल्या चित्रपटावरुन पुन्हा एकदा नजर टाकली की मंडळी कशी झकास बनवाबनवी करतात याचा प्रत्यय येतो. प्रभात, किमत, छलिया, अनामिका, बिन्दीया और बन्दूक– हे अलिकडील काही चित्रपट. आता प्रभातचेच बघा. हाच चित्रपट एखाद्या समर्थ दिग्दर्शकाने कितीतरी धारदार केला असता. पण सिकंदर खन्ना यांनी विषयाला भडकपणा दिल्याने त्यातले चैतन्यच हरपले. जया कौसल्यावर चित्रीत केलेले अखेरचे नृत्यगीत आठवा. तद्दन फिल्मी, एकदम बंडल ! सती सावित्रीचे रूप घेऊन त्या घटकेपर्यंत वावरणारी सरिता एकदम एखादी सराईत तवायफ नाचावी अशा थाटामध्ये नृत्य करू लागते. आता ही ग्रामकन्या अशी एकदम तरबेज कशी झाली असला प्रश्न आपण विचारायचा नाही. पैसा मिळवणारा मनुष्य खर्च करण्याच्या बाबतीत व्यवहारिक राहीला नाही तरी मूर्खही होणार नाही. बाईची एक रात्रीची शेज मिळावी म्हणून किती पैसा खर्च करावा ? लाख रुपये– राम दयाळ यांच्या प्रभातमध्ये हा नमुना पण पहावयास मिळतो. बिन्दीया और बन्दूक हे जोमिन्दर यांचे चित्र म्हणजे फिल्मीमंडळींनी चंबळ खोऱ्यावर चढवलेला अजून एक केविलवाणा हल्ला ! दुर्गा नावाची ग्रामकन्या दरोडेखोर बनून आपल्यावर

जंजीरचे अनपेक्षित यश आणि जया बरोबरची शादी यामुळे सध्या चर्चेचा विषय असलेला अभिताभ बच्चन – आणि बऱ्याच काळच्या अनुपस्थितीनंतर पडद्यावर येत असलेली नूतन – सौदागर मधे





बिंदीया और बंदूक मधे आशा सचदेव आणि वरझा मुराद.
आपल्या फिल्मी मंडळींनी चंबळच्या खोऱ्यावर चढवलेला आणखी एक हल्ला.

अत्याचार करणाऱ्या मंडळींवर सूड उगवते. ज्या शंकरबरोबर दुर्गाचे लग्न होणार असते तो शंकरही पोलीस इन्स्पेक्टर म्हणून नेमका याच भागामध्ये येतो. बन्दूक बाजूला पडते. बिन्दीया चमकू लागते. गुडी गुडी धरतीचा छानदार शेवट पहावयास मिळतो. किमत आणि छलिया– हे दोन्ही चित्रपट एकदम टाकाऊ. या सगळ्या मालिकेमध्ये अनामिका कितीही सदोष असले तरी त्यातल्यात्यात सरस उतरले आहे. संजीव जयाची झकास जोडी आणि पूर्वार्धातील वेधक चित्रण, त्याला संगीताची बहारदार जोड. यामुळे अनामिका खपून गेले. पण अनामिकेचा पूर्वेतिहास जाणून घेण्याच्या ईर्षेने देवेंद्र ज्या वेळी पिच्छा पुरवू लागतो त्या वेळेपासून प्रेक्षकांचा छळ सुरू होतो.


आणि तो जवळ जवळ अखेरपयन्त चालू नन्दा, वाहिदा रेहमान, आशा पारेख, साधना यांचा जमाना तसा आता संपल्यातच जमा आहे. छलिया हे नन्दाचे अगदी अलिकडील चित्र. चित्राला रुपेरी पडद्यावर येण्यास तसा बराच उशीर झाला. शत्रुघ्न व नवीन निश्चल, यांच्याबरोबरच नंदा या चित्रपटामध्ये काम करून गेली आहे. चित्र जसे चैतन्यहीन. तशाच भूमिकाही. एकच गोष्ट प्रकर्षाने जाणवली की या बाई आता विवाह करतील तर फार बरे.

काहीशा मागे सरकलेल्या मंडळींमध्येच नूतनचाही समावेश करावा लागेल. अनुराग मधील छोटयाशा परंतु प्रभावी भूमिकेने


तिचे पुनरागमन झाले. आणि या भूमिकेचे चांगले स्वागतही झाले. आता सौदागर या चित्रामध्ये अभिताभ बच्चन–नूतन ही जोडी एकत्र येत आहे. दोन समर्थ कलाकार आमने सामने येत असलेल्या या चित्राची हवा तर मोठी छान निर्माण झाली आहे.

सेन्सॉर बोर्ड– ज्या झपाटयाने चित्रपट फेटाळून लावत आहे त्या झपाटयाने मंडळी अक्षरश: अवाक होऊन गेली आहेत. ये सच है ! हे चित्र पुष्कळसा भाग नव्याने चित्रीत करून सेन्सॉर बोर्डाला दाखवण्यात आले. तथापी– अनितीचा पुरस्कार करणारे अप्रशस्त चित्र म्हणून सेन्सॉर बोर्डाने प्रशस्तीपत्रक देण्याचे साफ नाकारले.

# दोन आगामी



रणधिर कपूर आणि रेखा 'कच्च्या चोर'मधे



'कच्चे धागे'त विनोद खन्ना आणि मौसमी चतर्जी

## दारासिंगला दणका

फिल्मी दुनियेमधील भीम पुरुष दारासिंग या दुनियेमध्ये तसे आता जुने झाले आहेत. या धंद्याला कितपत अक्कल लागते याची त्यांना कल्पना असल्याने पडद्यावरील मागणी कमी झाल्यावर दाराजी निर्मिती व दिग्दर्शन क्षेत्रामध्ये उतरले. शेख मुजीब यांच्या आशिर्वादाने त्यांनी मेरा देश मेरा धर्म (खरं म्हणजे धरम) हे चित्र सुरू केले. चित्र पूर्ण होत आल्यावर त्यांनी तडाखेबंद जाहिराती झळकवल्या आणि गेल्या आठवड्यामध्ये हे चित्र जेव्हा सेन्सॉरबोर्डाला दाखवण्यात आले त्या वेळी बोर्डाने भारत बांगला देश मधील मैत्रीचे संबंध लक्षात घेता या चित्राला मान्यता देता येणार नाही असे निर्मात्याला कळवले. आता भीमकाय दारासिंगाला हा निरोप कशा पद्धतीने कळवला ते एक सेन्सॉर बोर्डच जाणे

प्राण जाये पर वचन न जाये व इंटर नॅशनल क्रूक – या चित्रावरही गुन्हेगारीचा गौरव करण्याचा आरोप ठेवण्यात आला व चित्राला मंजुरी नाकारण्यात आली.

या भयानक प्रकाराने मंडळी हादरली आहेत, चित्रपटामध्ये सत्यनारायणाची पूजा करणारा कलाकार मुसलमान असेल तर त्यालाही उद्या बंदी येईल. रामायणामध्ये रावणाचा वध दाखवला तर श्रीलंका विरोध करील म्हणून रावणाचे हननही गौरवपूर्ण पद्धतीने करावे लागेल.

तात्पर्य– सेन्सॉरच्या या नवीन आक्रमक धोरणाने निर्मितीखाली असलेल्या चित्रपटांची अवस्थाही केविलवाणी झाली आहे. पटकथेच्या चोपड्या घेऊन निर्माते वाळकेश्वरी बोर्डाच्या ऑफीसकडे धाव घेत आहेत. आणि चित्रित करण्यात येणाऱ्या प्रसंगांना चित्रिकरणापूर्वी मंजुरी घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. स्क्रिप्ट सेन्सॉरशिपचा नवीन प्रकार रुजू झाला आहे असाच याचा अर्थ.

‘सिंहकाका, माणसानं आधी शहाणं व्हावं आणि मागून म्हातारं व्हावं !’
पण सम्राट सिंह... आधी म्हातारे झाले आणि मग.... सत्तेच्या लालसेने, वैभवाच्या वासनेने आणि पिसाट कामांधतेने एका रौद्रभीषण हत्त्याकांडाला सुरुवात झाली. ज्याची पहिली शिकार ठरले स्वत:

स म्रा ट सिं ह

शेक्सपियरच्या अमर नाट्यकृतीचे साहित्यसम्राट आचार्य अत्रे यांच्या
ज्वलंत लेखणीतून उतरलेले समर्थ रूपांतर

# सम्राट सिंह

शुभारंभाचे दोन प्रयोग

**प्रयोग क्रमांक १ : शिवाजी मंदिर, सोमवार दि. १३ ऑगस्ट दुपारी ३॥ वाजता**
**प्रयोग क्रमांक २ : शिवाजी मंदिर, सोमवार दि १३ ऑगस्ट रात्रौ ८॥ वाजता**
**प्रयोग क्रमांक ३ : साहित्य संघमंदिर मंगळवार दि. १४ ऑगस्ट रात्रौ ८॥ वाजता**

दिग्दर्शन : **पुरुषोत्तम दारव्हेकर**

नेपथ्य : दत्ता चौंडणकर

प्रमुख भूमिका : **मास्टर दत्ताराम**

**बाबा वैशंपायन, बापुराव माने, शशिकांत निकते, दिनेश करमरकर, गुलाब कोरगांवकर, सुमन आरेकर, भारती गोसावी, बाळ गोसावी, जयंत सावरकर, रामचंद्र कुलकर्णी, श्रीकृष्ण सात्रीकर, रघुनाथ पराडकर, मनोहर सप्रे, मुकुन्द गोखले, शशिकांत पेंडसे, दशरथ भानुशाली**

निर्माते : **अत्रे नाटचमंदिर**, शिवशक्ती, वरळी, मुंबई – १८

[ RADICAL ]




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**